रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८९ ▌अंक ११३ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

## रायगडसाठी २४ तास धोक्याचे

**ठाणे :** कोकण किनारपट्टीवरील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यांना पुढील २४ तासांसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या जिल्ह्यांतील आपत्कालीन यंत्रणेला सज्ज राहण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत. यावेळी कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, ठाणे जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ, ठाणे महापालिकेचे आयुक्त सौरभ राव, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, पालघर जिल्हाधिकारी इंदुराणी जाखड, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि मुंबई, नवी मुंबई, कल्याण-डोंबिवली, उल्हासनगर, मिरा-भाईंदर, वसई-विरार, भिवंडी या महापालिकांचे आयुक्त दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. ३० सप्टेंबर २०२५

किंमत ४ ₹


आजचा रंग गुलाबी








## वेधक

### बारावी परीक्षा अर्ज भरण्यास मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना परिक्षा अर्ज भरण्यास देखील अडचणी निर्माण होत आहेत. दरम्यान, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्यास आता २० ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्य परीक्षा मंडळाने घेतला आहे. राज्यातील इयत्ता बारावीच्या विद्यार्थी-विद्यार्थीनींना परीक्षा अर्ज भरण्याची ३० सप्टेंबर २०२५ रोजी शेवटची मुदत होती. मात्र मराठवाडा, नाशिक, सोलापूर, अहिल्यानगर आणि राज्यात होत असलेली अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मुदतीत परीक्षेसाठी अर्ज भरणे शक्य नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी, पालकांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांना संपर्क करून अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत विनंती केली होती.

### श्री सिद्धीविनायक मंदीराकडून मदत

**मुंबई :** राज्यात अतिवृष्टीमुळे शेतकरी, सामान्य लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातून खरीप हंगाम केले आहे. काही ठिकाणी लोकांच्या घरात पाणी शिरले असून संपूर्ण संसारच उद्ध्वस्त झाले. गेल्या कित्येक वर्षांत अशा प्रकारचा पाऊस झाला नसल्याचे सांगितले जात आहे. पावसाचा सर्वाधिक तडाखा यावेळी मराठवाड्याला बसला. सध्याची ही परिस्थिती लक्षात घेऊन शेतकरी, सामान्यांच्या मदतीसाठी अनेक हात पुढे येत आहेत. श्री सिद्धीविनायक मंदीर न्यासानेही एक मोठा निर्णय घेतला. मंदीर न्यासाने अतिवृष्टीग्रस्तांसाठी तब्बल १० कोटींचा निधी देण्याची घोषणा केली आहे.श्री सिद्धीविनायक मंदीर न्यासाने मदतीचा निर्णय घेतल्यानंतर मंदिर न्यासाचे कोषाध्यक्ष आचार्य पवन त्रिपाठी यांनी याबाबतची सविस्तर माहिती दिली.

### कामोठ्यातून ११ लाखांचे दागिने चोरीला

**पनवेल :** कामोठे येथील सेक्टर ३५ मधील गृहनिर्माण सोसायटीतील एका सदनिकेतून ११ लाखांचे दागिने चोरीला गेले. ही चोरी नक्की कधी झाली व कोणी केली याची माहिती तक्रारदार महिलेला कळू शकली नाही. या सोसायटीमध्ये गरब्याचे आयोजन केले असून यासाठी महिला आणि त्यांचे कुटुंबिय दरवाजा उघडा ठेऊन गेले होते. त्यावेळी ही घटना घडली. या प्रकरणी शनिवारी कामोठे पोलीस ठाण्यात अनोळखी चोरट्याविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ११ लाख रुपयांचे सोने नेमके घरात कोणत्या ठिकाणी ठेवले, याची माहिती चोराला कशी मिळाली? असे प्रश्न या चोरी प्रकरणाचा शोध घेणाऱ्या पोलिसांसमोर आहेत. नवी मुंबई पोलिसांची गुन्हे शाखा, गुन्हे प्रकटीकरण विभाग या चोरी प्रकरणी शोध सुरू आहे.

# पावसामुळे शेतकरी संकटात

## 1388 शेतकऱ्यांना फटका | 400 हेक्टर क्षेत्र बाधित

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

राज्यासह रायगड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पाऊस पडत आहे. शेतांमध्ये पाणी साचल्याने भातशेती पाण्याखाली गेली आहे. या पावसात भात पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील ४७३ हेक्टरहून अधिक भात पीक क्षेत्र बाधित झाले असून एक हजार ३८८ हून अधिक शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला आहे. हातातोंडाशी आलेला घास गेल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे.

यंदा पावसाने वेळे अधीच हजेरी लावली. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापासून पाऊस सुरु झाला. शेतांमध्ये पाणी साचले. त्यामुळे पेरणी करण्यासाठीदेखील अडचणी निर्माण झाल्या होत्या. काही ठिकाणी रोपे पाण्यात कुजून गेली. त्यामुळे दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर ओढावले होते. त्यातूनही मार्ग काढत शेतकऱ्यांनी भाताची रोपे तयार करून लावणीला सुरूवात केली. परंतु यंदा रोपे कमी पडल्याने शेतीचा काही भाग लावणीविनाच राहिला असल्याचे चित्र दिसून आले. यावर्षी भातपीक तयार झाले.

पान ५ वर



### २६ दिवसात २४ हेक्टरचे नुकसान

जिल्ह्यामध्ये एक ते २६ सप्टेंबर या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमध्ये दहा गावे बाधित झाली आहेत. २४.१ हेक्टर क्षेत्रातील भात पिकांचे ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झाले आहे. ८१ शेतकऱ्यांना त्याचा फटका बसला असल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली.

> दोन दिवस झालेल्या पावसात ३३ टक्के पेक्षा अधिक भात पिकांचे नुकसान झाले आहे. कर्मचाऱ्यांमार्फत नुकसानीची पाहणी करण्याचे काम सुरु केले आहे. त्याचा अहवाल तयार करण्याचे काम सुरु केले आहे.
> – प्रविण थिगळे, उपसंचालक कृषी विभाग

> यावर्षी मे महिन्यापासून पाऊस सुरु झाला. तब्बल पाच महिने पाऊस पडला आहे. भातपीक कापणी योग्य तयार झाले आहे. कापणीची तयारी ठेवण्यात आली होती. परंतू गेल्या अनेक दिवसांपासून पाऊस पडत आहे. शेत पाण्याने भरली आहेत. तयार झालेले भातपीक आडवे पडले आहे. त्यामुळे भात पिकांवर त्याचा परिणाम होण्याची भिती आहे. हातातोंडाशी आलेले घास जाण्याची शक्यता आहे. पाऊस असाच सुरू राहिल्यास भात पिकांचे नुकसान होणार असून रब्बी हंगामदेखील लांबणीवर जाईल.
> – सतीश म्हात्रे, शेतकरी

# जोड प्रकल्पांची कामे संथगतीने

## नवी मुंबई विमानतळ परिसरात वाहतूक कोंडीची शक्यता

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे लवकरच उद्घाटन होणार आहे. त्या अनुषंगाने प्रस्तावित रस्ते जोडणीचे प्रकल्प सुरू आहेत, पण बहुतांश कामे संथगतीने सुरू असल्याने प्रवाशांचा मार्ग खडतरच असणार आहे.

मुंबईकरांची वाढती गरज भागवण्यासाठी स्वतंत्र आंतरराष्ट्रीय विमानतळाची मागणी सातत्याने होती. त्यामुळे १९९० च्या दशकापासून नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या. आता विमानतळाचे काम अंतिम टप्प्यात असल्याने मेट्रो तसेच जलमार्गाने जोडले जाणार आहे, परंतु जलमार्गाच्या कामाला वेळ लागणार आहे. रस्ते मार्गे विमानतळावर पोहोचण्यासाठी अटल सेतू वगळता इतर जलद मार्ग नसल्याने प्रवाशांना गैरसोईंना सामोरे जावे लागणार आहे.

पान ५ वर

### रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य

पुणे, रायगड जिल्ह्यातून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे येणाऱ्या प्रवाशांना खड्ड्यातून वाट काढावी लागणार आहे. मुंबई-पुणे महामार्गाकडून येणाऱ्या मार्गिकांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. पळस्पे फाट्यावर मार्ग काढताना नाकीनऊ येणार आहेत. डोंबिवली, कल्याण, भिवंडी, ठाणे परिसरातून विमानतळावर येणाऱ्या प्रवाशांची अडचण होणार आहे.

# रेंटल बाईक विरोधात संघर्ष

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबागमध्येबेकायदेशीररित्या दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय चालत आहे. या व्यवसायाविरोधात रिक्षा चालक व मालक आक्रमक झाले आहेत. या रेंटल बाईक विरोधात संघर्ष सुरू झाला आहे. अलिबाग शहर, तालुका रिक्षा चालक व मालकांनी पेणचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांची भेट घेऊन हा व्यवसाय बंद करण्याची मागणी केली. शेकापच्या राज्य महिला आघाडी प्रमुख ज्येष्ठ विधीज्ञ अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली हा लढा पुकारण्यात आला.

संबंधित

पान ५ वर



**अ‍ॅड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा चालक एकवटले**

**रिक्षा चालकांनी घेतली उपप्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांची भेट**

# वैद्यकीय महाविद्यालयाला नोटीस

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

प्रशासकीय, तांत्रिक तसेच शिक्षणाच्या गुणवत्तेसंबंधित त्रुटी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला आढळून आल्या. त्यामुळे त्रुटींची पुर्तता करण्यासाठी अलिबागमधील शासकीय वैद्यकिय महाविद्यालयालासह इतर जिल्हयातील महाविद्यालयांना नोटीस बजावण्यात आली. महाविद्यालयाच्या वेबसाईटवर ही नोटीस प्रसिध्द करण्यात आली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते संजय सावंत यांनी दिली.

अलिबागमधील शासकीय वैद्यकीय

पान ५ वर

**■ त्रुटींची पूर्तता करण्यासाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाचे आदेश**

> प्रवेश होण्यापूर्वी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगामार्फत तपासणी केली जाते. भरतीसह तांत्रिक गुणवत्तेशी संबंधित त्रुटी काढण्यात आल्या. त्याची पूर्तता करण्यात आली आहे. भरती प्रक्रिया शासनाची आहे.
> – डॉ. पूर्वा पाटील, अधिष्ठाता

# तंत्रमंत्राच्या नादात तीन कोटींचा चुना

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

तंत्रमंत्रातून करणी काढण्याच्या बहाण्याने एका मौलवीने नेरूळमध्ये राहणाऱ्या एका तरुणाकडून तब्बल तीन कोटी १० लाख रुपये उकळले आहेत. याप्रकरणी नेरूळ पोलिसांनी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

दारावे गावातील तेजस घोडेकर (२२) याची आई भारती घोडेकर नऊ वर्षांपासून आजारपणामुळे अंथरुणाला खिळून आहे. तेजसने अनेक रुग्णालयांमध्ये उपचार करून पाहिले; मात्र काहीही उपयोग झाला नाही. २०१९ मध्ये सीवूड्स-दारावे गावातील दर्ग्याविषयी त्याला माहिती

पान ५ वर

**■ मौलवीकडून विशेष पूजेच्या नावाखाली केली फसवणूक**

### एसटीच्या ३४ आगार प्रमुखांवर कारवाई

**नागपूर :** राज्यात अतिवृष्टीमुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. यावेळी एसटीच्या अधिकाऱ्यांनी आपल्या मुख्यालयात उपस्थित राहणे बंधनकारक असताना देखील एसटी महामंडळाच्या २५१ पैकी ३४ आगारातील आगरप्रमुख हे आपल्या कर्तव्यावर हजर नसल्याचे एका गोपनीय अहवालामध्ये पुढे आले आहे. या अधिकाऱ्यांवर महामंडळाकडून कारवाईचे संकेत मिळत आहे. त्याबाबत परिवहन सूचनाही दिल्या गेल्या आहे.

# ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडली

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठवाड्यासह राज्याच्या अनेक भागांत गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक पुरते हवालदिल झाले आहेत. उभ्या पिकांसह शेतातील सुपीक मातीही वाहून गेली आहे, तर अनेक ठिकाणी जनावरे दगावली आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी राज्य सरकारला राज्यातील पूरग्रस्तांना कशाप्रकारे मदत करावी, याबाबत आवाहन करत काही महत्त्वाच्या सूचना दिल्या आहेत.अतिवृष्टीमुळे शेतीपिकांचे आणि घरांचे मोठे नुकसान झाले आहे, विशेषतः मराठवाड्यात सर्वाधिक फटका

पान ५ वर

**पंचनाम्याला मुदतीचे बंधन नको; शरद पवारांच्या राज्य सरकारला पाच सूचना**

**शासनाचे वेधले लक्ष | अलिबाग-वडखळ महामार्गाची दुरवस्था**

# खड्ड्यांमध्ये पोहून अनोखे आंदोलन

**। रायगड । प्रतिनिधी ।**

अलिबाग-वडखळ महामार्गाची दुरवस्था दिवसेंदिवस भीषण होत असून वाहनचालक व प्रवासी पुरते हैराण झाले आहेत. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडून त्यामध्ये पावसाचे पाणी साचले आहे. या डबक्यांमधून वाहन चालविताना अपघातांचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रवास केवळ कष्टदायक नव्हे तर जीवघेणा ठरत आहे.

आज एका वाहनचालकाने या डबक्यांमध्ये पोहून अनोखे आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधले. या आंदोलनाद्वारे संबंधित तरुणाने लोकप्रतिनिधी व शासनाचा निषेध नोंदविला. त्याने प्रवाशांना होणाऱ्या त्रासाकडे लक्ष वेधत तातडीने रस्ता दुरुस्ती करण्याची मागणी केली.

अलिबाग हे प्रसिध्द पर्यटन स्थळ असून येथे देश-विदेशातून पर्यटक मोठ्या संख्येने येतात. मात्र या मार्गावरील खड्डेमय रस्त्यामुळे पर्यटक देखील त्रस्त झाले आहेत. त्यामुळे स्थानिक जनता, पर्यटक व प्रवासी यांचे मोठे नुकसान होत आहे. शासनाने या गंभीर प्रश्नाकडे तातडीने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी सर्वसामान्यांची मागणी आहे.






## जाहीर नोटीस

पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांचे कोर्टात कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये

कुळ दावा क्र. ०२/२०२५

१. श्री. देविदास नारायण पाटील
२. श्री. हिरामण नारायण पाटील
३. श्री. रमेश नारायण पाटील
४. श्रीम. नामुबाई नारायण पाटील
५. श्रीम. प्रभावती कमळाकर पाटील — अर्जदार
६. श्रीम. धनुबाई नारायण पाटील ऊर्फ धनुबाई सुरेश पाटील (मयत)तर्फे वारस
 ६/१. श्रीम. सुवर्णा चंद्रकांत घरत
 ६/२. श्रीम. सुलभा अविनाश पाटील
 ६/३. श्रीम. शुभांगी संजय म्हात्रे
 ६/४. श्रीम. सांनाली अतिष पाटील
 ६/५. श्रीम. श्यामला रविंद्र म्हात्रे

सर्व रा. आंबिवली, ता.पेण, जि.रायगड

विरुध्द

जमिनमालक
१. श्री. जयंत गोविंद पाटील — सामनेवाला
रा. आंबिवली, ता.पेण, जि.रायगड

तमाम जनतेस कळविण्यांत येते आहे की, अर्जदार श्री. देविदास नारायण पाटील व इतर ९. रा. आंबिवली, ता.पेण, जि.रायगड यांनी पेण येथील मे. तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण पेण यांच्या कोर्टात खालील वर्णन केलेल्या मिळकतीची कुळ कायदा कलम ३२ ग अन्वये खरेदी किंमत ठरवून मिळणेबाबत दावा दाखल केलेला आहे.

जिल्हा व तुकडी रायगड, पोट तुकडी व तालुका पेण, जिल्हा परिषद रायगड, पंचायत समिती पेण तसेच तलाठी सजा वळक यांचे हद्दीतील अर्जदार यांची मिळकत खाली वर्णन केल्याप्रमाणे आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| गाव | गट नं./ हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | एकूण क्षेत्र (हे.आर.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| आंबिवली, ता.पेण | १०८ | ०-९८-४०,पो.ख. ०-०५-०० | १-०३-४० | २०.५६ |
| आंबिवली, ता.पेण | ११४ | ०-१८-००,पो.ख. ०-०३-०० | ०-२१-०० | ०.५८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीचे कुळ कायदा कलम ३२ ग खालील दाव्याचे संदर्भात सामनेवाला यांस नोटीसा काढण्यांत आलेल्या आहेत. सामनेवाले तसेच अनुसूचित निर्दीष्ट केलेल्या मिळकतीस जिथे जिथे ज्यांचा ज्यांचा हितसंबंध असेल त्यांस अर्जदार हे वरील मिळकतीस कुळ असल्याबाबत/नसल्याबाबत हरकत घेण्याची झाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी हरकत मा. तहसिलदार पेण यांच्या समोर प्रत्यक्ष हजर राहून अथवा वकीलामार्फत दाखल करावी. दिलेल्या मुदतीत कोणाचीही हरकत दाखल न झाल्यास दाव्याचे कामकाज एकतर्फी चालवून कोर्ट निकाल देऊ शकते. याची समज घ्यावी.

ठिकाण :- पेण
दिनांक :- २३/०९/२०२५

सही/-
**(तानाजी शेजाळ)**
तहसिलदार तथा अप्पर तहसिलदार
शेतजमिन न्यायाधिकरण पेण

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे मेचकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ५६/३ | ०.७२.०० पो.ख. ०.२४.०० एकूण ०.९६.०० | ०.३० | श्री. गौतम चक्रवर्ती |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून होणाऱ्या ११ (अकरा) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ३०/०९/२०२५

सही/-
**ॲड. उषा जे. कांबळे**
कर्जत, 'पुष्प विमल' निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे,
मो.नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसने कळविण्यात येत आहे की, मौजे. राठीची वाडी, ता. पेण, जि. रायगड येथील खालील वर्णन असणाऱ्या व ७/१२ सदरी नावाची नोंद असलेले शेतकरी यांचा मालकी हक्क व ताबाकब्जा आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे. सदर शेतजमिन आमचे आशिल कायम स्वरुपात विकत घेत आहेत. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं/गट नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| मौजे. राठीची वाडी, ता. पेण, जि.रायगड | २४ | २ | ४-३६-९६ पो.ख. ०-८३-०४ एकुण ५-२०-०० पैकी काजल किरण घरत हिचे नावे असलेली ०-५३-०० ऐवढी जमिनीचे क्षेत्र विकत घेत आहेत. | २८=९० |

सबब वर नमुद शेतजमिन मिळकतीवर वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारच्या हक्क हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, एम.ओ.यु. साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, ॲटचमेंट, लीज वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून २१ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर वर नमुद मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

दिनांक :- २९/०९/२०२५

**ॲड. सचिन बी. कोंडीलकर,**
शॉप नं. १४२, म्युनसीपल कॉम्प्लेक्स,
जुना भाजी मार्केट जवळ, पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६.
मो. ९८३३३०६३६१.

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे परहूर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक जयराम नानू ठाकूर यांचेकडून विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| परहूर ता. अलिबाग जि. रायगड | १८४ | क्षेत्र ०.३०.१० पो.ख. ०.०४.०० एकूण ०.३४.१० | ८.६२ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागीदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व विनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दिनांक : २६/०९/२०२५

सही/-
**ॲड. प्रिया नंदकुमार पाटील**
६/००२, राज रत्ना पार्क
ब्रह्मांड कॉम्प्लेक्स, जे.बी. रोड
ठाणे वेस्ट
मो.नं. ८८७९४९७३०२

दि. ३०/०९/ २०२५

## जाहिर नोटिस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचा बोलणी विद्यमान मालक यांचेसोबत झालेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे,

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) | मालकाचे नांव |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे ता.अलिबाग | ६३ | ०-३९-०० पो.ख ०-०३-५० एकुण ०-४२-५० | ४.६९ | बळवंत अनंत पाटील यशवंत अनंत पाटील |
| खारपेढांबे ता.अलिबाग | ६६ | ०-२६-५० पो.ख. ०-००-८० एकुण ०-२७-३० | ४.०० | बळवंत अनंत पाटील यशवंत अनंत पाटील अनुसया अनंत पाटील |
| खारपेढांबे ता.अलिबाग | ६२ | ०-११-९० पो.ख ०-००-२० एकुण ०-१२-१० | १.१२ | तेजस मारूती पाटील, वगैरे |
| खारपेढांबे ता.अलिबाग | ६९ | ०-५५-४० पो.ख.०-०१-६० एकुण ०-५७-०० | ८.३१ | तेजस मारूती पाटील, वगैरे |

वर नमुद केलेली मिळकत या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. पुनित रविंद्र पाटील,**
मु.पो.हाशिवरे,
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा. नं. ८१४९५१६०३५


# वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे याची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळवण्यात येते की, आमचे अशिल श्री. रविंद्र मधुकर राजे रा.ऐ-२०१, स्नेहंकील अपार्टमेंट, बी-कॅबीन रोड, पटेल कॉम्प्लेक्स जवळ, नियोग नगर, अंबरनाथ खालील वर्णनाची मिळकत १) दिनेश बाळू सरावते, रा. पुष्पा विमल निवास, नाना मास्तर नगर, मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड २) श्री. प्रतिक सुरेश गायकवाड रा. मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड यांना कायमची विक्री करण्याचे ठरविले असून त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे गुंडगे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| ६६ | ६ | ५.३१.८० पो.ख. ०.००.०० एकूण ५.३१.८० | १०.६५ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हाला ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणत्याही प्रमाणे हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

दिनांक : ३० सप्टेंबर २०२५

**ॲड. शुभांगी आनंद साळवी**
पत्ता : सरमोकादम बंगलो, गाळा नं. २
दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर
ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१
मो.नं. ९९६७८३४६१८

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन श्री. नंदलाल माधवजी ठक्कर यांनी दिनांक २६ नोव्हेंबर २००९ रोजीचे नोंदणी अनुक्रमांक ७६८६/२००९ अन्वयेचे नोंदणीकृत खरेदीचे दस्तऐवजाने कायमची खरेदी केलेली असून माझे अशिल यांनी सदरील मिळकत श्री. नंदलाल माधवजी ठक्कर यांचेकडून खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी किंवा श्री. नंदलाल माधवजी ठक्कर यांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे चई, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|
| | | हे.आर.पॉ | रुपये | पैसे |
| १७ | ५अ | १-१८-०० | ० | ७२ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१

सही /-
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ३०/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्ती बरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ (चौदा दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालका बरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे चई, ता. कर्जत जि. रायगड येथील शेत जमीन मिळकत :-**

| मालकाचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | हे.आर.-पॉ | रुपये | पैसे |
| नंदलाल माधवजी ठक्कर | १५ | ४अ | ०-५१-०० | ० | २८ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४,
पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट,
कर्जत नगरपालीका कार्यालयाशेजारी,
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१

सही / -
**ॲड. जयेश संभाजी म्हसे**
दिनांक :- ३०/०९/२०२५
मो.नं. ९०२८९८२२७७
ई मेल: adv.jayeshmhase@gmail.com

## जाहीर पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की,

मौजे अंत्राट तर्फे वरेडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत त्या मिळकतीचे मालक ब्रिजेश प्रताप आर सिंग रा - फ्लॅट नंबर १००१, शेठ रेसीडेन्सी, गवपंदा, मुलंड मुंबई यांची खालील वर्णन केलेली जमीन मिळकती त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ है.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १८ | २ | एकुण क्षेत्रफळ ०.६५.०० हे. आर. चौ.मी. | ०.४२ |
| ३० | ८/क | एकुण क्षेत्रफळ २.४८.०० हे. आर. चौ. मी. पैकी वरील वर्णन केलेले मालक यांचे नावे असलेली मिळकतीचे क्षेत्र - १.००.०० हे.आर.चौ.मी. | ०.७३ |

वर वर्णन केलेली जमीन मिळकती त्या मिळकतीचे मालक ब्रिजेश प्रताप आर सिंग यांनी आमचे आशिलास सदरच्या मिळकती या कायमच्या खरेदीखताने विकत देण्याचे ठरवलेले आहे. तरी सदर मिळकतीबाबत कोणाचाही हक्कहितसंबंध, तोंडी अथवा लेखी करार असल्यास तसेच सदरील व्यक्तीचा अगर, संस्थेचा, खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यारपत्र, फरोक्त, वगैरे हक्क असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात (१४) दिवसांचे आत खाली सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकती दाखल कराव्यात. दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

दिनांक ३०/०९/२०२५

**ॲड. भारत अंकुश सावंत**
(बी कॉम. एल. एल. बी)
पत्ता - मु पो मोठे वेणगाव
ता. कर्जत जि. रायगड
संपर्क क्रमांक ९५५२२९६६२२

## जाहीर नोटीस

प्रो.जमा.रु.
नि.नं. १०/ड

अर्जदाराचे वकील
श्री. पवार. एम. एम.
ने. ता. २९-१०-२०२५

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७/२०२५

**पाली येथील मे. दिवाणी न्यायाधीश क स्तर यांचे न्यायालयात,**

श्रीम. राजेश्री राजाराम कदम — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील राजाराम आनंदराव कदम हे नेरुळ, नवी मुंबई येथील डॉ. डी. वाय. पाटील हॉस्पिटल, या दवाखान्यात वयाच्या ६५ व्या वर्षी कोरोना आजारपणात दि. ३०/०८/२०२० रोजी मयत झाले आहेत. त्यांचे नावे नावे मृत्यूसमयी आर.टी.ओ. पेण, जि. रायगड यांचे नोंदी दफ्तरी मोटार कार/जीप शेवरोलेट तवेरा NEO 3 LS P10A आहे. सदर मोटार कार/जीपचा रंग एम व्हाईट, मोटार कार/जीपचा नोंदणी क्र. मोटार कार /जीपचा नंबर एम.एच. ०६ बीई ६६८०, मोटार कार/जीपचा चासिस नं. MA6ABCB5EEH001790, मोटार कार/जीपचा इंजिन नं- 3BP176008, मोटार कार/जीपचा मॉडेल - CHEVROLET TAVERA, NEO 3 LS P10A, दि. २८/३/२०१४ रोजीचा आहे. या वर्णनाची मोटार कार/जीप हा या अर्जाचा विषय असून, अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील यांचे नावे आर.टी.ओ. पेण कडे नोंदणी केलेली आहे. सदर गाडीचे मालकीचे कागदपत्र अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील यांचे नावे आहेत. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील यांचे मृत्यूपश्चात अर्जदार क्र. १ ते ३ हेच सरळ कायदेशीर वारस आहेत असा वारस/उत्तराधिकारी दाखला (सक्सेशन सर्टिफिकेट) मिळणेकरिता आणि सदर वर नमूद केलेली मोटारकार/जीप अर्जदार क्र. ३ यांचे नावे करण्याकरिता तसेच इतर शासकीय व निमशासकीय कामांकरिता अर्जदार यांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

तरी वारस/उत्तराधिकारी दाखला (सक्सेशन सर्टिफिकेट) मिळण्याच्या अर्जाकामी अन्य कोणाचीही कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास, कोणतीही हरकत नाही असे समजून, अर्जदार यांना सक्सेशन सर्टिफिकेट देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

माझे सहीने व कोर्टाच्या शिक्क्यासह आज दि. २९/०९/२०२५ रोजी जाहीर केले.

| सही /- | सही/- |
|---|---|
| **कनिष्ठ लिपीक,** | **सहा. अधिक्षक** |
| **दिवाणी न्यायालय क स्तर पाली- रायगड** | **दिवाणी न्यायालय क स्तर पाली-रायगड** |

## ग्रुप ग्रामपंचायत जासई
## मु. पो. जासई, ता. उरण, जि. रायगड
## जाहिर निविदा

ग्रुप ग्रामपंचायत जासई हद्दीतील विकास कामे खालील कोष्टकात नमुद केलेल्या निधितून करण्याकरीता विहीत मुदतीमध्ये ठेकेदारांकडून व मान्यता प्राप्त पुरवठा दाराकडून मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.नं | कामाचे नाव | निधी उपलब्धता | अंदाजपत्रकीय रक्कम | १% इसारा रक्कम | टेंडर फॉर्मची किंमत | कामाचा काळावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जासई अंतर्गत माउली नगर ( बंजारवाडी) येथे बोअरवेल मारणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ बंधित | १,४९,९२२ | १,४९९/- | ५००/- | ६ महिने |
| २ | जासई अंतर्गत डुंबा अदिवासी वाडी येथे बोअरवेल मारणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ बंधित | १,४९,९२२ | १,४९९/- | ५००/- | ६ महिने |
| ३ | जासई अंतर्गत रेल्वे कॉलनी येथे बोअरवेल मारणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ बंधित | १,४९,९२२ | १,४९९/- | ५००/- | ६ महिने |
| ४ | ग्रामपंचायत जासई अंतर्गत ग्रा.पं. कार्यालयाचे छप्पर दुरूस्ती करणे व पाण्याची साठवण टाकी दुरूस्ती करणे | ग्रामनिधी | २,२५,२५४ | २,२५२/- | ५००/- | ६ महिने |
| ५ | जासई बौध्दवाडी विहार प्रांगणात ओपनजिम साहित्य बसविणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५/२०२६ बंधित | २,००,००० | - | - | ३ महिने |
| ६ | संगणक देखभाल दुरूस्ती व नविन खरेदी करणे | १५ वा वित्त आयोग सन सन २०२५/२०२६ बंधित | १,००,००० | - | - | ३ महिने |

**अटी व शर्ती**

१. निविदा मोहोर बंद पाकिटात मा. सरपंच, ग्रामपंचायत जासई याचे नावे दिनांक ३०/०९/२०२५ ते ०६/१०/२०२५ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेमध्ये ग्रामपंचायत कार्यालयात स्विकारण्यात येतील.
२. नोंदणीकृत तसेच GST धारक ठेकेदार व पुरवठादार असावा.
३. कोणत्याही एक किंवा सर्वच निविदा स्विकारण्याचा किंवा नाकरण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवला आहे.
४. ग्रामपंचायत कार्यालयात प्राप्त झालेल्या निविदा दिनांक ०७/१०/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता ग्रामपंचायत कार्यालयात मा. सरपंच यांचे समक्ष उघडण्यात येतील.
५. कोणत्याही नामंजूर निविदेसंदर्भात संबंधीत ठेकेदारास कुठलाही पत्र व्यवहार केला जाणार नाही.
६. सदर कामाचे अंदाजपत्रक व तांत्रिक मान्यतेचे आदेश ग्रामपंचायत, कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

ठिकाण :- जासई
दिनांक:- ३०/०९/२०२५

| **ग्राम पंचायत अधिकारी** | **सरपंच** |
|---|---|
| **ग्रुप ग्राम पंचायत जासई** | **ग्रुप ग्राम पंचायत जासई** |

## मिळकतीचा फेर जाहीर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा फेर जाहीर लिलाव बुधवार दिनांक ०८-१०-२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. फेर लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करिता फेर जाहीर लिलावात भाग घेण्याकरिता अनामत रक्कम रु. २५,०००/- (अक्षरी पंचवीस हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतिम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून (७ दिवस) दिनांक ०८-१०-२०२५ रोजी परंतु फेर लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने फेर जाहीर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचेकडून अनामत रक्कम भरुन घेवून त्यास फेर जाहीर लिलावात बोली लावण्यात अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय फेर जाहीर लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या फेर लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशील खालीलप्रमाणे :-**

| अ.क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | कर्जदार<br>१.श्री.सुप्रेश काशिनाथ बिर्जे<br>मु.पो.आगरदांडा,ता.मुरुड,जि.रायगड<br>जामिनदार<br>२.श्री.शिवराम बापू लोकरे,<br>मु.आपटा, पो.आपटा, ता. पनवेल जि. रायगड<br>३.श्री.तेजेस नंदकुमार अंबुकर,<br>मु.थेरोंडा हनुमानवाडी, पो.चौल ता. मुरुड, जि. रायगड | अर्ज क्र./कलम/ १०१/८८/९/३/२३ | ४९,००,०००/- | मुरुड नगरपरिषद भूमापन क्र. १४०/२ब/२ क्षेत्र ०-०१-५८ हे.आर व भूमापन क्र.१४०/२ ब ३ क्षेत्र ०-०५-०७ पो.ख.०.००.३५ हे.आर |

**स्थावर मालमत्ता फेर जाहीर लिलावाच्या अटी व शर्ती**
**अटी व शर्ती**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्याठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रु. २५०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मूल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्वीकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्वीकारणे अथवा न स्वीकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नाव लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रकमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेंत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करुन) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्तेसंदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रकमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदारांकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रकमेतून कमी करणेंत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उद्घोषणेप्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपुर्द केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारावर परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधित तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपूर्ण रक्कम भरुन विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रकमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

दिनांक :- ३०-०९-२५

सही/-
**(श्री. मधुकर मामु ढेबे)**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी)**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि. अलिबाग**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी जिल्हा रायगड**

# भातशेती पाण्याखाली





■ तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

■ तात्काळ पंचनामे करण्याचे शासनाचे आदेश

। कर्जत । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे कर्जत तालुक्यामधील ९० टक्के शेतकऱ्यांची भातशेती पाण्याखाली गेली असून, पूर्ण संपूर्ण कापणीसाठी आलेले भात जमीन दोस्त झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाले आहे. वर्षातून एकदाच भाताचे पीक घेतले जाते. त्यातच संपूर्ण शेतकऱ्याची वर्षभराची मेहनत ही अशी जमीनदोस्त झाल्यामुळे शेतकरी त्रस्त झाला आहे.

तालुक्यातील सहा मेपासून सुरू झालेला पाऊस आज सगळ्यात न थांबल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी शेती लावली नाही, परंतु ज्यांनी लावली आहे त्यांचे शंभर टक्के नुकसान झाले आहे. दरम्यान, कर्जत तहसीलदार यांच्याकडून महसूल विभाग, कृषी विभाग आणि ग्रामपंचायत विभाग यांची बैठक घेऊन उद्यापासून पंचनामे करण्याचे आदेश दिले आहेत.

कर्जत तालुक्यात दोन दिवस वादळी वारे आणि सोबत आलेला पाऊस यामुळे भाताच्या शेतीमध्ये उभे असलेले पीक संकटात आले आहे. भाताचे पीक शेतामध्ये कोसळले असल्याने भाताची शेती करणाऱ्या बळीराजा संकटात सापडला आहे. त्यामुळे शासनाने तात्काळ नुकसान ग्रस्त शेतीचे पंचनामे करावेत अशी मागणी कर्जत तालुक्यातील सर्व सामाजिक संघटना आणि राजकीय पक्षांनी केला आहे. त्यानंतर कर्जत तहसीलदार यांच्याकडून भाताच्या पिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी सर्व यंत्रणा कामाला लावली आहे. त्यासाठी आज कर्जत तहसीलदार डॉ. धनंजय जाधव यांनी कर्जत तालुक्यातील कृषी विभाग, महसूल विभाग आणि ग्रामपंचायत विभाग यांची बैठक घेतली. त्या बैठकीत भात पिकाच्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. त्यासाठी गावपातळीवर टीम तयार करण्यात आल्या असल्याची माहिती तहसीलदार यांच्याकडून देण्यात आली. गाव पातळीवर तलाठी, ग्रामपंचायत अधिकारी आणि कृषी सहायक या तिघांची टीम पंचनामे शेतात जाऊन करणार आहेत.

> **अचानक झालेल्या पावसामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झाले आहे. सरकारने याकडे लक्ष देऊन सरसकट पंचनामे करावे सरसकट शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करावी, ही आमच्या शेतकऱ्यांची मागणी आहे**
>
> **– चंद्रकांत जाधव, पोलीस पाटील**

> **दरवर्षी आमच्या शेतीचे असे नुकसान होते. परंतु, शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत नाही. त्यामुळे सरकारने याकडे लक्ष देऊन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी. तहसीलदारांनी महसूल खात्याला आदेश देऊन पंचनामे करून तात्काळ शेतकऱ्याला भरपाई द्यावी, अशी आमची मागणी आहे.**
>
> **– मोरेश्वर जाधव, शेतकरी**



# हा नागरी सत्कार मी आयुष्यभर विसरणार नाही

## अभिनेते अशोक सराफ यांचे गौरवोद्गार

। चिरनेर । प्रतिनिधी ।

महाराष्ट्राच्या जनतेने मला भरभरून प्रेम दिले. त्याचबरोबर यापूर्वी माझे अनेक सत्कार झाले आहेत. परंतु, यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेने केलेला हा महासन्मान मी आयुष्यात कधीच विसरणार नाही, असे भावनिक उद्गार महाराष्ट्र भूषण तथा पद्मश्री अभिनेते अशोक सराफ यांनी काढले.

यमुना सामाजिक शैक्षणिक संस्थेमार्फत उलवे नोड येथील भूमीपुत्र भवन येथे चतुरस्त्र अभिनेते अशोक सराफ व निवेदिता जोशी सराफ यांचा सपत्नीक नागरी सन्मान रविवारी (दि.२८) आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते आपल्या सत्काराला उत्तर देताना बोलत होते. यापुढे अशोक सराफ यांनी मी महेंद्र शेठ घरत यांच्या प्रेमात पडलो असल्याचा उल्लेख आपल्या भाषणातून केला. त्यानंतर त्यांनी त्यांची अभिनय वाटचाल कशी सुरू झाली. याविषयी सांगताना, अभिनय क्षेत्रात जी काही माझी वाटचाल सुरू आहे. ती केवळ रसिक प्रेक्षकांमुळेच. रसिक प्रेक्षक माझे मायबाप आहेत. माझ्या आयुष्यात निवेदिता आली आणि आयुष्यच पार बदलून गेले, उजळून गेले. सर्वांनाच अशा बायका मिळतात असे नाही, असेही ते म्हणाले. मी रसिकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचे काम प्रामाणिकपणे केले, मला महाराष्ट्राच्या जनतेने भरभरून प्रेम दिले. यापूर्वी माझे अनेक सत्कार झालेत; परंतु हा नागरी सत्कार मी आयुष्यभर विसरणार नाही, असे शेवटी त्यांनी भावनिक उद्गार काढले.

मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनते अशोक सराफ यांच्या चाहत्यांच्या तुफान गर्दीने भूमीपुत्र भवन खचाखच भरून गेले होते. यावेळी नरेंद्र बेडेकर निर्मित बहुरूपी अशोकच्या मेजवानीने रसिक मंत्रमुग्ध झाले. या सोहळ्याला माजी मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, खासदार सुनील तटकरे,माजी खासदार रामशेठ ठाकूर तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

# निवडक



## ताडवागळेत मोफत आरोग्य शिबीर

**अलिबाग** : लायन्स क्लब अलिबाग-पोयनाड आणि नारायणी नवरात्रौत्सव मंडळ, ताडवागळे यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २८ सप्टेंबर रोजी ताडवागळे येथील नारायणी देवी मंदिर, स्व. आत्मारामभाई पाटील सभागृहात भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबीर, नेत्रचिकित्सा आणि मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर यशस्वीरित्या पार पडले. लायन्स क्लब अलिबाग-पोयनाडचे अध्यक्ष गुरुनाथ माळी (राष्ट्रपतीपदक विजेते माजी पोलीस उपनिरीक्षक), उपाध्यक्ष विनोद पाटील आणि खजिनदार नीलम माळी, प्रदीप सिनकर, प्रमोद राऊत, अरविंद अग्रवाल यांनी तसेच, नारायणी नवरात्रोत्सव मंडळाचे अध्यक्ष किरण पाटील, उपाध्यक्ष संतोष म्हात्रे, सहाय्यक दर्शन म्हात्रे, खजिनदार संदेश पाटील आणि सदस्य कोलटकर यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या शिबिरासाठी लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि दोस्त फाऊंडेशन मुंबई यांचे सहकार्य लाभले. शिबिरात परिसरातील शेकडो नागरिकांनी आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

## एक शिक्षकी शाळांवर संकट

**पाली/वाघोशी** : सुधागड तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळा या एक शिक्षकी शाळा म्हणून कार्यरत आहेत. मात्र, नुकत्याच झालेल्या शिक्षकांच्या बदल्यांमुळे या शाळांमधून शिक्षक कमी झाले असून, काही शाळा पूर्णपणे शिक्षकांविना सुरू आहेत. त्यामुळे विद्यार्थी मार्गदर्शनाविना वाऱ्यावर पडले असून, तालुक्याची शिक्षण व्यवस्था विस्कळीत झाल्याची स्थिती निर्माण झाली आहे. यासंदर्भात बहुजन विद्यार्थी संघटनेचे रायगड जिल्हा अध्यक्ष अमित गायकवाड यांनी जिल्हा शिक्षण अधिकारी यांना निवेदन दिले आहे. एकमेव शिक्षक असलेल्या शाळांमध्ये शिक्षकांच्या बदल्यांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात आले असून, गुणवत्तापूर्ण व दर्जेदार शिक्षण मिळणे कठीण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. सुधागड हा अतिदुर्गम भाग असून, येथे शिक्षण क्षेत्रात अपेक्षित प्रगती झालेली नाही. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना शिक्षक न मिळाल्यास शिक्षणाचा दर्जा खालावण्याची शक्यता आहे. तातडीने या शाळांवर पूर्णवेळ शिक्षकांची नेमणूक करावी, अन्यथा बहुजन विद्यार्थी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा गायकवाड यांनी दिला आहे.

## माहेरवाशिणींचा भावांकडून सन्मान

**खोपोली** : जय महालक्ष्मी सेवा संस्थेच्या रौप्य महोत्सवानिमित्ताने बीडखुर्द गावात नवरात्रौत्सवात माहेरवाशिणींचा सन्मान सोहळा शनिवार, दि.२७ सप्टेंबर रोजी संपन्न झाला. सन्मान सोहळ्यासाठी सोहळ्यासाठी मुंबई, पुणे, ठाणे, पनवेल अशा विविध शहरांतून ८० ते ९० माहिरवाशींनी आपल्या माहेरात आल्या होत्या. यामध्ये अबालवृध्दांचा समावेश होता. जय महालक्ष्मी सेवा संस्थेच्यातीने आयोजित कार्यक्रमात भावांनी बहिणी आणि आत्यांना सन्मानचिन्ह देवून सन्मानित केले आहे. खालापूर तालुक्यातील बीडखुर्द गावात जय महालक्ष्मी सेवा संस्था मागील २४ वर्षांपासून नवरात्रौत्सवासह विविध कार्यक्रम,सामाजिक उपक्रम राबवत असते. यंदा संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली. नवरात्रीत माहेरवाशिणींचा ओटी भरून सन्मान करणे, हे भारतीय संस्कृतीत स्त्रीत्वाचा, तिच्या मातृत्वाचा, सौभाग्याचा सृजनशील शक्तीचा आदर गौरव करण्याचा एक पारंपरिक मार्ग आहे, अशी भावना लक्षात घेऊन आपल्या माहेरवाशीण लेकींचा सन्मान करण्याची संकल्पना जय महालक्ष्मी सेवा संस्थेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर मांडवकर, अनंता मांडवकर, उपाध्यक्ष संतोष तेलिंगे, खजिनदार राकेश सुगदरे, सहखजिनदार तेजेस काशिद, सहसचिव सुजित तेलिंगे, सर्व पदाधिकारी आणि ग्रामस्थांनी राबवत आगळावेगळा कार्यक्रम आयोजित केला होता.

## जिल्हाध्यक्षपदी पुकराज सुथार

**उरण** : भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या निर्देशानुसार, प्रवासी राजस्थान प्रकोष्ठाने उत्तर रायगड जिल्ह्यासाठी अध्यक्षपदी पुकराज सुथार यांची नियुक्त केली आहे. त्यांनी या संधीबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आ. महेश बालदी, भाजपा रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश सदस्य रविशेठ भोईर यांचे आभार मानले. पक्षनेतृत्वाने माझ्यावर दाखविलेला विश्वास आणि वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनामुळे मला ही महत्त्वाची जबाबदारी मिळाली आहे. मी संपूर्ण निष्ठा, समर्पण आणि कष्टपूर्वक काम करत भाजपा पक्षाच्या हितासाठी कार्यरत राहीन, असा विश्वास पुकराज सुथार यांनी व्यक्त केला.

# ६ ऑक्टोबरला भूमीपुत्रांचा मोर्चा

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उद्घाटन घटिका जसजशी भरत आली आहे, तसे विमानतळ नामकरण हालचाली वेग धरत आहेत. नवी मुंबई विमानतळाला राष्ट्रीय नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे नाव नाही तर दिले, तर विमानतळाचे उद्घाटन होऊ देणार नाही. त्यामुळे विमानतळाला दिबांचे नाव देण्यात यावे म्हणून येत्या ६ ऑक्टोबरला समस्त भूमीपुत्रांच्यावतीने एक धडक मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी भूमिका घेण्यात आली आहे. याबाबत रविवारी कोपरखैराणे येथे बैठक पार पडली असून, याच बैठकीत ६ ऑक्टोबरच्या मोर्चाचा निर्णय एकमताने घेण्यात आला आहे.

# नैना प्रकल्पाला गती

■ १२ टाऊनशीप उभारण्यात येणार

। उरण । प्रतिनिधी ।

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून पहिल्या विमानाचे उड्डाण आता हाती येण्याच्या टप्प्यावर आहे. त्यामुळे विमानतळ प्रभावित क्षेत्रातील नैना प्रकल्पाला गती मिळाली आहे. पहिल्या टप्प्यात पनवेलमधील २३ गावांच्या ३७ चौरस किमी क्षेत्रात तब्बल १२ नगररचना योजना (टीपी स्कीम) राबवून १२ टाऊनशिप उभारल्या जाणार आहेत. या टाऊनशिपसाठी पायाभूत सुविधा उभारणीसाठी तब्बल ६,५०० कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली असून, अनेक कामे प्रत्यक्ष सुरू झाली आहेत.

सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शांतनु गोयल यांनी नुकताच टीपी स्कीम ११ मधील रस्त्यांच्या सीमांकन कामांचा आढावा घेतला. नैना क्षेत्रासाठी पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजनही करण्यात आले आहे. उल्हास नदीवरील रखडलेले कोंढाणा धरण सिडकोने ताब्यात घेतले असून, या प्रकल्पामुळे नैना क्षेत्रातील तहान भागणार आहे.

तथापि, लॅण्ड पुलिंग मॉडेलमुळे मूळ शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या केवळ ४० टक्के क्षेत्रफळाचे विकसित भूखंड परत मिळणार असल्याने काही शेतकरी या योजनेला विरोध करत आहेत. तरीदेखील या प्रकल्पामुळे परिसराचा आर्थिक व सामाजिक विकास होणार असल्याचे सिडकोने स्पष्ट केले आहे आणि शेतकऱ्यांनी प्रकल्पासाठी सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

# स्वच्छता हीच खरी सेवा : महेश भैसे

। रसायनी । प्रतिनिधी ।



स्वच्छता हीच खरी सेवा आहे, आपला परिसर प्लास्टिक मुक्त आणि स्वच्छ ठेवल्यास तीच खरी सेवा होईल, असे प्रतिपादन भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण विभाग पुणे संचालक महेश भैसे यांनी केले.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत भारतीय भूवैज्ञानिक संस्था भारत सरकार पुणे विभाग आणि ग्रुप ग्रामपंचायत चौक यांच्या सहकार्याने इरसाल वाडीच्या पायथ्याशी असलेल्या नम्राची वाडी येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. त्याप्रसंगी महेश भैसे मार्गदर्शन करताना बोलत होते. ग्रुप ग्रामपंचायत चौक सरपंच रितू ठोंबरे यांनी उपस्थित सर्व टीमचे स्वागत करून ग्रामपंचायत यांना स्वच्छता अभियान राबविण्यात मदत आणि मार्गदर्शन केल्याबद्दल आभार व्यक्त केले. स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यापूर्वी इरसाल वाडी दुर्घटनाग्रस्तांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण ही भारत सरकारची एक वैज्ञानिक संस्था आहे. भारत सरकारच्या खनिज मंत्रालयाच्या अंतर्गत येते. या संस्थेची स्थापना १८५१ साली करण्यात आली. तिचे मुख्य कार्य राष्ट्रीय भूवैज्ञानिक डेटा आणि खनिज संसाधनांचे मूल्यांकन करणे, तसेच भू-तांत्रिक आणि भू-पर्यावरणीय अभ्यास करणे आहे.

आपल्या सेवा पंधरवडाची माहिती देताना स्वच्छता आणि कार्यक्षमता सुधारणे, सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ आणि सौंदर्यपूर्ण बनवून जनतेसाठी चांगले वातावरण निर्माण करणे, सफाई मित्रांचे महत्त्व सांगणे व त्यांच्या योगदानाची दखल घेणे, स्वच्छता आणि पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी उत्सव हिरवे आणि स्वच्छ उपक्रम यावर भर देणे, स्वच्छतेच्या महत्त्व पटवून देणे यासाठी जनजागृती करून लोकांना स्वच्छ भारताच्या ध्येयात सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा उद्देश असल्याची माहिती महेश भैसे यांनी दिली. वेळी नम्राची वाडी, नवीन इरसाल वाडी येथे स्वच्छता करण्यात आली. यावेळी प्लास्टिक कचरा संकलन करण्यात आले. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान ग्रुप ग्रामपंचायत चौक येथे सुरू असून हे अभियान एक सेवाव्रत अभियान म्हणून राबविण्यात येत असल्याचे ग्राम पंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी दिली. तर सेवा पंधरवडा माध्यमातून जनहिताची कार्य मार्गी लागली जात आहेत, असे महसूल मंडळ अधिकारी माणिक सानप यांनी सांगितले.

या अभियानात भाग घेऊन ग्रुप ग्रामपंचायत चौक यांचे कर्मचारी, नम्राची वाडी ग्रामस्थ यांच्याबरोबर मोठ्या प्रमाणात श्रमदान केले. ग्रामपंचायत सदस्य लक्ष्मी वाघ, महसूल अधिकारी अक्षय गावडे, अंकुश वाघ, ग्रामस्थ उपस्थित होते.

# २२.५ लाखांचे लोखंडी पाइप गायब

■ सीसीटीव्ही फुटेजमध्ये गँग उघड

■ पोलिसांचा सर्जिकल स्ट्राईक सुरू

। उरण । प्रतिनिधी ।

तालुक्यातील जासई ते जेएनपीटी मार्गावर सराईत टोळीने थेट हायड्राचा वापर करून तब्बल २२ लाख ५० हजार किमतीचे लोखंडी पाइप चोरल्याची थरारक घटना उघडकीस आली आहे. ९ सप्टेंबर रोजी ही चोरी घडली असून, परिसरात चांगलीच खळबळ उडाली आहे. परंतु, सदरचा हायड्रा व ट्रेलर जप्त करण्यात आला नसल्याचे समजते.

याप्रकरणी मुख्य आरोपी विक्रम तुपसाखरे (२८) आणि अहेसानुल्ला शेख यांचा सहभाग स्पष्ट झाला आहे. दोघेही फरार असून, पोलिसांचा श्वास रोखणारा पाठलाग सुरू आहे. पोलीस तपासात आरोपींनी गुन्ह्यातील माल वेगवेगळ्या ठिकाणी विक्रीस काढल्याचे उघड झाले आहे. अहेसान शेख याने चोरीचा माल तब्बल तीन ठिकाणी विकला. त्यातून नऊ पाइप वेगवेगळ्या खरेदीदारांकडून जप्त करण्यात आले आहेत.

गुन्हे शाखेच्या कारवाईतून बखतावर खुलारी आणि अमीरउल्ला चौधरी यांच्या ताब्यातून अर्धे पाइप तुकडे आणि तब्बल ७.५ लाख रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. मात्र, ही मंडळीदेखील फरार आहेत. चोरीतील मालाची किंमत व रोख रकमेची उलाढाल मिळून तब्बल २२ लाख ५० हजारांपर्यंत पोहोचत असल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे. दरम्यान, या प्रकरणातील तौसीब, अमीरउल्ला, तौफिक खान आणि पुष्पराज कदम यांना पोलिसांनी नोटीस बजावली आहे. या सर्वांचा चोरीतील माल विक्री व पैशांच्या व्यवहाराशी संबंध असल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे.

या गुन्ह्याचा तपास डीसीपी अमित काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. फरार आरोपींना पकडण्यासाठी गुन्हे शाखेच्या पथकांनी सर्वतोपरी मोहीम उघडली असून, सीसीटिव्ही फुटेजसह तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपींचा शोध घेतला जात आहे. पोलिसांच्या या सर्जिकल स्ट्राईकमुळे लोखंडी गँगला लवकरच गजाआड केले जाईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. दरम्यान, वाढत्या चोऱ्यांच्या घटनांमुळे भीतीचे वातावरण परसले आहे. आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

## वादळी वाऱ्यामुळे समुद्र खवळला | मत्स्यविभागाकडून सतर्कतेचा इशारा



# शेकडो बोटी किनारी विसावल्या

। मुरुड जंजिरा । प्रतिनिधी ।

गेल्या काही दिवसांपासून दडी मारलेल्या पावसाने गेले दोन दिवस तुफानी वाऱ्यांसह पाऊस धो धो पडत असल्याने ऐन नवरात्रोत्सवात जनजीवन विस्कळीत झाले असून, बाजारपेठ ठप्प झाली आहे. दरम्यान, समुद्रात वारा व लाटा असल्याने मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये, असे सांगण्यात आले आहे. त्यामुळे मुरुड किनारी शेकडो बोटी विसावल्याचे चित्र दिसून येत आहे. उद्यापर्यंत वादळ सांगितल्याने परवा सकाळी बोटी पुन्हा खोल समुद्रात जाणार आहे, अशी माहिती कोळी बांधव प्रकाश सरपाटील यांनी दिली.

दोन दिवसांत ९७ मिमी इतक्या, तर आतापर्यंत २५२६ मिमी पावसाची नोंद झाली आहे, अशी माहिती मुरूड तहसीलदार कार्यालयातील संदेश वाळंज यांनी दिली. राज्यात नवरात्रोत्सव सुरू आहे. तरुणांमध्ये उदंड उत्साह आणि आनंदाचा वातावरण असते. परंतु पावासाने सर्व बक्ष्याबोळ करुन टाकल्याने भक्तगणांचा व तरुणांचा हिरमोड झालेला पाहायला मिळत आहे.भारतीय हवामान विभागाकडून महाराष्ट्राच्या किनारपट्टीवर पुढील २४ तासांसाठी हवामानविषयक इशारा प्राप्त झालेला आहे. त्यानुसार येत्या २४ तासात किनारपट्टीलगतच्या जिल्ह्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आलेला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याच्या किनारपट्टीलगत ४९ ते ५० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे.

> **सर्व बंदरांवर मच्छिमारांना सावधानतेचा इशारा देण्यात आलेला आहे. सर्व मच्छिमार सहकारी सोसायटींना तसेच व्हॉट्सॲप मेसेजद्वारेही कळविण्यात आले आहे की, मच्छिमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये.**
>
> **– अक्षय साळुंखे, परवाना अधिकारी, मुरुड मत्स्यविभाग**



# पंतप्रधान, तुम्हीसुध्दा?

आशिया चषक जिंकल्याबद्दल भारतीय संघाचे अभिनंदन. पण त्याचे बेजबाबदार राजकारण करणाऱ्या सर्वच बेतालांचा तितकाच तीव्र निषेध. बेताल व बेजबाबदारांच्या या गर्दीमध्ये नरेंद्र मोदींनी आपलाही आवाज मिसळावा हे भारताचे सर्वात मोठे दुर्दैव. वाईट गोष्ट अशी की, या देशात कोट्यवधी लोक असे तयार झाले आहेत की, जे काही चालू आहे ते योग्य नाही हे समजण्याची अक्कलच गमावून बसले आहेत. भारत आणि पाकिस्तान यांच्यात १९४७ पासून शत्रुत्व आहे. पूर्वी हॉकी आणि आता क्रिकेट या खेळांमध्ये ते सुप्त रीतीने प्रकट होत असे. पण मैदानावरचे खेळ हे रणभूमीवरच्या लढाया नसतात, ते खेळाच्या भावनेने खेळायला हवेत हे शहाणपण कमी-अधिक प्रमाणात दोन्ही बाजूंकडे कायम होते. त्यामुळेच प्रेक्षकांच्या भावना कितीही ताणल्या गेल्या तरी सामना संपल्यानंतर खेळाडू एकमेकांशी हास्यविनोद करू शकत होते. अनेक जण तर एकमेकांचे चांगले मित्र होते. दोघांच्या संबंधात चढउतार आले त्याचे प्रतिबिंब मैदानावर पडत राहिले. दोन्ही देशात आततायी राजकीय नेत्यांची कमी नाही. ते कायम भडकाऊ भाषणे करीत असतात. पण दोन्ही बाजूंच्या सत्तेतल्या नेत्यांनी आजवर किमान मर्यादा पाळली. त्यांनी या सामन्यांना युद्धाचे रुप देण्याचा घातकी मूर्खपणा कधी केला नाही. यंदाच्या आशिया चषकामध्ये तो मोठ्या प्रमाणात घडला. पहलगाम हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मुळात भारताने पाकिस्तानसोबत खेळूच नये असे ठाकरे शिवसेनेप्रमाणे अनेकांचे म्हणणे होते. पण खरे तर त्यांना भाजपचा ढोंगीपणा त्यांना उघड करायचा होता. भाजपवाले विरोधात होते तेव्हा काँग्रेसला अडचणीत पकडण्यासाठी अशी भूमिका घेत असत. आता सत्तेत असताना मात्र यांची भूमिका एकदम बदलली. वास्तविक, बीसीसीआय भाजपच्या ताब्यात आहे. अमित शाह यांचे चिरंजीव आयसीसीचे अध्यक्ष आहेत. पण अशा स्पर्धांमधून मिळणाऱ्या प्रचंड पैशावर पाणी सोडणे या बनियांच्या जिवावर आले. त्यांनी या स्पर्धेत खेळण्याचा निर्णय घेतला. पण मग एकदा ते केल्यावर हा खेळ आहे, यात राजकारण आणू नका अशी स्वच्छ भूमिका घ्यायला हवी होती. पण तिथेच हे पचकले.

## जे पाकिस्तानचे तेच आपले

पहिल्या साखळी सामन्यानंतर भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करायला नकार दिला. इतकेच नाही तर त्या सामन्यात मिळालेला विजय ऑपरेशन सिंदूरच्या युद्धसैनिकांना अर्पण केला. हे सर्व भारत सरकारच्या सांगण्यावरूनच चाललेले होते. परवा सूर्यकुमार यादवला या विधानाबद्दल आयसीसीने दंड केला. पण एक तर यादवसकट सर्व खेळाडूंना इतका पैसा मिळतो की असल्या किरकोळ दंडामुळे त्यांना काहीही फरक पडत नाही. शिवाय, उद्या कदाचित बाहेर कोणालाही न कळता, हा दंड बीसीसीआयच्याच तिजोरीतून भरला जाईल. पाकिस्तानी लोकांनीही पुरेपूर नालायकपणा केला. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसिन नक्वी हेच त्यांच्या क्रिकेट बोर्डाचेही अध्यक्ष आहेत. शिवाय सध्या ते एशिया क्रिकेट कौन्सिलचेही प्रमुख आहेत. त्यांनीही भडकाऊ वक्तव्ये व कृती केल्या. अंतिम सामन्याच्या आधी त्यांनी हा अंतिम दिवस असल्याचे म्हटले. सोशल मिडियावरच्या पोस्टमध्ये त्यांनी पाकिस्तानी खेळाडूंना वैमानिकांच्या पोषाखात दाखवून पार्श्वभूमीव लढाऊ विमाने उडत असल्याचे दृश्य दाखवले. त्याचा बदला म्हणून भारतीय खेळाडूंनी त्यांच्या हस्ते आशिया चषक स्वीकारायला नकार दिला. तर नक्वी यांनी हा चषक काही काळ गायबच करून टाकला. शेवटी भारतीय खेळाडूंनी चषकांविनाच जल्लोष केला. हा सर्व म्हटले तर पोरकट व म्हटले तर गंभीर असा तमाशा झाला. हे कमी म्हणून की काय महामहीम नरेंद्र मोदी यांनी भारताचा विजय म्हणजे ऑपरेशन सिंदूरप्रमाणेच असल्याचे ट्विट केले. आपण देशाचे पंतप्रधान आहोत, एखादे गल्लीतले कार्यकर्ते किंवा एखाद्या गावातल्या टोळीचे प्रमुख नव्हे हे जणू ते विसरले. यामुळे सूर्यकुमार यादवने भारत सरकारच्याच सांगण्यावरून ते वादग्रस्त विधान केले होते यावर शिक्कामोर्तब झाले. आता पुढचे दोन दिवस देशभरातले भाजपचे कार्यकर्ते मोदींच्याच विधानाची री ओढतील व पाकिस्तानच्या नावाने तमाशे करतील. पहलगाममध्ये अतिरेकी कोठून आले व त्यावेळी तेथे सुरक्षा का नव्हती हे यांनी आजतागायत सांगितलेले नाही. शिवाय ट्रम्प यांनी घोषणा करताच इकडे युद्ध का थांबवले याचेही स्पष्टीकरण आजपर्यंत मिळालेले नाही, याचा सर्वांनाच सोईस्कर विसर पडेल.

## सुमार संघ, सुमार कामगिरी

भारतीय खेळाडूंप्रमाणे पाकिस्तानी खेळाडूंनीही नादानपणा केला. साहेबजादा फरहान याने अर्धशतक झाल्यानंतर बॅटमधून बंदुकीसारख्या गोळ्या झाडल्याची एक्शन करणे किंवा रौफ याने प्रेक्षकांकडे पाहून विमाने पडल्याचे हावभाव करणे हे तितकेच आक्षेपार्ह होते. त्याबद्दल त्याच्यावरही कारवाई झाली. उद्या नक्वी यांच्यावरही बहुदा काहीतरी कारवाई होईलच. पण आता खुद्द पंतप्रधानांनी क्रिकेटच्या मैदानावरचे हे ऑपरेशन सिंदूर झाले असे म्हटल्यावर पाकिस्तानी संधी मिळताच आणखी भडक प्रतिक्रिया देतील यात शंका नाही. अंतिम सामन्यात भारताचे पाच गडी बाद झाले म्हणजे पाच राफेल पाडण्यासारखेच आहे असे कोणी म्हणाले तरी आश्चर्य वाटायला नको. तेव्हा यापुढे एकवेळ पाकिस्तानशी खेळू नका, पण असले तमाशे थांबवा असे म्हणायची वेळ आली आहे. खेळ हे आनंदासाठी खेळले जातात व ते निरोगी समाजाचे लक्षण आहे. त्यात युद्ध आणणे हे गैर आहे. सर्व खेळाडूंना या कार्याला जुंपणे हे त्याहूनही खतरनाक आहे. खेळात हारजीत चालू असते. उद्या एखाद्या सामन्यात भारत हरूही शकतो. त्यावेळी आपण युद्धात हरलो असे म्हणणार का? दुर्दैवाने आता हा भलत्याच ठिकाणी युद्ध आणण्याचा ज्वर खेळाडू, प्रेक्षक आणि खेळाचे समालोचक यांच्यामध्येही फैलावला आहे. विशेषतः हिंदीतून समालोचन करणारे लोक पाकिस्तानविषयी ज्या त्वेषाने काल बोलत होते ते खेळाची मजा घालवून टाकणारे होते. दरम्यान, भारताने आशिया चषक जिंकला असला तरी आपल्या संघाची कामगिरी सुमार होती. पाकिस्तानचा संघ अगदीच फालतू असल्याने आपली इज्जत काल वाचली असे म्हणायला हवे. संपूर्ण मालिकेत अभिषेक शर्मा, तिलक वर्मा यांच्यासारख्या एकदोघांचा अपवाद वगळता इतरांची कामगिरी म्हणावी अशी झाली नाही. सूर्यकुमार यादव तर फलंदाज म्हणून पूर्ण फेल गेला. तो कर्णधारपदी का आहे असाही प्रश्न पडावा. बुमराविरुद्ध खूप धावा निघाल्या व त्याने बळीही फार घेतले नाहीत. आपले क्षेत्ररक्षण अनेक सामन्यात शाळकरी दर्जाचे होते. भारतात गेली पंधरा वर्षे आयपीएलचा उरुस भरवला जातो. पण इतके होऊनही आपला देशासाठी खेळणारा संघ इतक्या सामान्य दर्जाचा असावा हे आश्चर्यकारक आहे. बुमरा गेला तर त्याची जागा घेणारा हुकुमी गोलंदाज आपल्यापाशी नाही. बांगलादेश व श्रीलंकेच्या किरकोळ संघांनीही आपल्याला चांगलेच झुंजवले व एक सामना तर सुपर ओव्हरमध्ये गेला. पाकिस्तानसोबतही एका क्षणी अवघड स्थिती होती. हे चांगले लक्षण नाही.

---

विचार

# महागाई आटोक्यात, पण दिलासा हवा

*अलिकडेच किरकोळ महागाईचे आकडे जाहीर झाले. जुलैच्या तुलनेत ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई पुन्हा एकदा दोन टक्क्यांच्या पुढे गेली. तथापि, याबद्दल काळजी करण्याची गरज नाही. तज्ज्ञांचा विश्वास आहे की चालू आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के असू शकते. ते मागील अंदाजांपेक्षा कमी आहे. दुसरीकडे, रिझर्व्ह बँक चालू आर्थिक वर्षात ईएम आयकपातीच्या स्वरूपात हा फायदा सामान्य जनतेला देऊ शकते.*




**हेमंत देसाई**

गेल्या अनेक महिन्यांपासून महागाईचे आकडे कमी होत असताना, अन्नधान्याच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्टमध्ये एकूण महागाईचे आकडे वाढले आहेत. असे असूनही काळजी करण्याची गरज नाही, असे म्हणायला जागा आहे. 'क्रिसिल' या संशोधन आणि रेटिंग फर्मने म्हटले आहे, की २०२५-२६ या आर्थिक वर्षात 'कोअर इन्फ्लेशन' ३.२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. तो त्यांच्या पूर्वीच्या ३.५ टक्के अंदाजापेक्षा कमी आहे. 'क्रिसिल'ने त्यांच्या ताज्या अहवालात म्हटले आहे, की चालू आर्थिक वर्षात ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) मध्ये १.४ टक्के घट दर्शवते. त्यामुळे आर्थिक सुलभतेसाठी सकारात्मक वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. अहवालात म्हटले आहे, की रिझर्व्ह बँक या वर्षी व्याजदरात २.५ टक्के कपात करू शकते. 'क्रिसिल'च्या मते जागतिक स्तरावरील अडचणी वाढत असताना कमी महागाई आणि कमी व्याजदरांमुळे अर्थव्यवस्थेत देशांतर्गत मागणी वाढेल. अहवालात असेही म्हटले आहे, की खरीप हंगामात अतिवृष्टी ही एक जोखीम आहे. त्यामुळे पंजाबसारख्या प्रमुख बागायती आणि अन्नधान्य उत्पादक प्रदेशांना च्डथळा येऊ शकतो. अन्न महागाई कमी पातळीपासून वाढू लागली आहे; परंतु तरीही ती मुख्य चलनवाढीपेक्षा कमी आहे.

ऑगस्टमध्ये किरकोळ महागाई मासिक आधारावर २.०७ टक्क्यांवर पोहोचली. ही वाढ प्रामुख्याने भाज्या, मांस आणि माशांच्या वाढत्या किमतींमुळे झाली. मागील महिन्यात जुलैमध्ये ती १.६१ टक्के होती. ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय) मध्ये सलग नऊ महिन्यांच्या घसरणीनंतर महागाईमध्ये ही वाढ झाली आहे. नोव्हेंबर २०२४ पासून ती कमी होत होती. तथापि, वार्षिक आधारावर ग्राहक किंमत निर्देशांका (सीपीआय)वर आधारित महागाई कमी झाली आहे. गेल्या वर्षी ऑगस्टमध्ये ती ३.६५ टक्के होती. या कालावधीत अन्न महागाई शून्यापेक्षा खाली म्हणजेच ०.६९ टक्क्यांनी घसरली. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने (एनएसओ) म्हटले आहे, की ऑगस्ट २०२५ मध्ये एकूण महागाई आणि अन्नधान्याच्या महागाईत प्रामुख्याने भाज्या, मांस आणि मासे, अंडी, तेल आणि चरबी, वैयक्तिक काळजी आणि अन्न उत्पादनांच्या किमती वाढल्यामुळे वाढ झाली. सरकारने रिझर्व्ह बँकेला दोन टक्के मार्जिनसह महागाई चार टक्के राखण्याचे आदेश दिले आहेत. ग्रामीण भारतातील महागाई जुलैमधील १.१८ टक्क्यांवरून ऑगस्टमध्ये १.६९ टक्क्यांपर्यंत वाढली. शहरी भागात महागाई २.४७ टक्के होती, जी मासिक आधारावर २.१ टक्के होती. केरळमध्ये सर्वाधिक ९.०४ टक्के महागाई होती तर आसाममध्ये सर्वात कमी म्हणजे उणे ०.६६ टक्के होती.

भारतीय जनतेला अमेरिकेसोबतच्या वाढत्या व्यापारयुद्धाच्या झळा बसण्याची शक्यता आहे. अमेरिकेने पन्नास टक्के व्यापार शुल्क लागल्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रांमधील भाववाढीचा दर वाढण्याची शक्यता आहे. मात्र दुसरीकडे, केंद्र सरकारने वस्तू व सेवाकरात, म्हणजे जीएसटीत लक्षणीय कपात केल्यामुळे दिलासादेखील मिळू शकतो. असे असले तरी वाढत्या महागाईची चिन्हे ऑगस्ट महिन्यातच दिसू लागली हे समजून घेतले पाहिजे. भाज्या, मांस आणि माशांसह ठरावीक अन्नपदार्थांच्या किमती वाढल्यामुळे ऑगस्ट २०२५ मध्ये किरकोळ महागाई दराने २.०७ टक्क्यांची पातळी गाठली आहे. ग्राहक किंमत निर्देशांकावर आधारित महागाईचा दर जुलैमध्ये १.६१ टक्क्यांपर्यंत घसरला होता. तर ऑगस्ट २०२४ मध्ये तो ३.६३ टक्के इतका नोंदवला गेला होता. एनएसओ म्हणजेच राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने दिलेल्या आकडेवारीनुसार ऑगस्ट २०२५ मध्ये भाजीपाला, मांस, मासे, अंडी, तेल, वैयक्तिक निगा उत्पादने यांच्या किमतीत वाढ झाली. त्यामुळे अन्नधान्य भाववाढीसह मुख्य महागाई दरात वाढ झाली. ऑगस्टमध्ये भाजीपाल्याच्या किमतीत जवळपास १६ टक्के वाढ झाली. सर्वसामान्य लोकांना रोजच्या जेवणात भाजी लागते. त्यामुळे ही दरवाढ चिंताजनक म्हणावी लागेल. मांस आणि माशांच्या किमती दीड टक्के दराने वाढल्या, तर दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचा महागाई दर ऑगस्टमध्ये २.६ टक्के होता. कपडे आणि पादत्राणांच्या महागाईचा दर जुलैमधील अडीच टक्क्यांवरून किंचित घसरला. इंधन आणि ऊर्जा क्षेत्रातील भाववाढही घसरून २.४ टक्क्यांवर पोहचली. जुलैमध्ये ती २.७ टक्के होती. केंद्र सरकारने रिझर्व्ह बँकेला किरकोळ महागाई दर चार टक्क्यांच्या पातळीवर मर्यादित राखण्याचे निर्देश दिले आहेत. अन्नधान्य महागाईचा दर जुलै २०२५ च्या तुलनेत ऑगस्ट २०२५ मध्ये १०७ आधारबिंदूंनी वाढला आहे. ग्रामीण भागात तर अन्यधान्याची भाववाढ शहरांपेक्षा जास्त असून सरकारला याची दखल घ्यावी लागेल. विशेष म्हणजे कम्युनिस्टांच्या केरळमध्ये ऑगस्टमध्ये सर्वाधिक एकत्रित महागाई ९.०४ टक्के तर कर्नाटकमध्ये ३.८१ टक्के होती. आर्थिक विकास होतो, तेव्हा काही प्रमाणात चलनवाढ होतेच. परंतु कोणत्या वस्तूंची आणि किती प्रमाणात किंमतवाढ होते, हे पाहणे महत्त्वाचे असते. भाववाढीची झळ गोरगरीब वर्गाला कमीत कमी लागावी, असा विचार करावाच लागतो.बरोबर नऊ वर्षांपूर्वी म्हणजे २०१६ मध्ये चलनवाढीचा दर चार टक्क्यांच्या मर्यादेत रहावा, असे धोरण ठरवण्यात आले. त्याचा टॉलरन्स बँड, म्हणजेच सहनशीलतेची मर्यादा खालच्या पातळीवर दोन टक्के आणि वरच्या पातळीवर सहा टक्के अशी निश्चित करण्यात आली. केंद्र सरकार आणि रिझर्व्ह बँकेनेच हे धोरण ठरवले. परंतु दर पाच वर्षांनी या धोरणाचा आढावा घ्यायचा, असेही ठरले होते. या धोरणाचा फेरआढावा मार्च २०२४ च्या आत पूर्ण झाला पाहिजे, अशी अपेक्षा होती. जानेवारी २०१४ पासून म्हणजेच केंद्रात नवे सरकार येण्यापूर्वीपासूनच येण्याच्या अगोदर सहा महिने भारतीय रिझर्व्ह बँकेने घाऊक किमतींपेक्षा किरकोळ किंमतवाढीवर लक्ष केंद्रित करण्यास सुरुवात केली. हे धोरण यशस्वी ठरले असून, त्यामुळे किरकोळ पातळीवरची महागाई टप्प्याटप्प्याने कमी झाली आहे. २०१२-१३ मध्ये किरकोळ किंमत निर्देशांकावर आधारित भाववाढ दहा टक्के होती. ती चालू आर्थिक वर्षात ३.१ टक्क्यांवर आली. या संपूर्ण वर्षात चलनफुगवट्याचा सरासरी दर अडीच टक्क्यांवर येईल, अशी आशा आहे. याचे कारण भरपूर पाऊस झाला आहे आणि वस्तू आणि सेवाकराचे दर कमी झाले आहेत.उच्च गतीने निरंतर आर्थिक विकास साधायचा असेल, तर चलनफुगवटा कमी पातळीवर आणि स्थिर स्वरूपाचा असणे आवश्यक ठरते. वस्तूंच्या किमती झपाट्याने वाढत गेल्यास ग्राहकांची खरेदीशक्ती कमी होत जाते. दुसरीकडे, किमतीत अत्यल्प वाढ होत असल्यास कारखानदारांचा उत्पादनातील रस कमी होतो. रिझर्व्ह बँकेचे माजी कार्यकारी संचालक जनक राज हे बँकेच्या एमपीसी, म्हणजेच मॉनेटरी पॉलिसी कमिटीचे सदस्यदेखील होते. त्यांच्या मते सध्याचा टॉलरन्स बँड कायम ठेवला पाहिजे. रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर पूनम गुप्ता यांनीही विद्यमान धोरणाचे समर्थनच केले आहे. मात्र एमपीसीचे २०१६ ते २०२० या काळात सदस्य असलेले अर्थतज्ज्ञ रवींद्र ढोलकिया यांच्या मते चलनफुगवट्याची चार टक्क्यांची मर्यादा ही खूप कमी आहे. विकसित भारताच्या दृष्टिकोनातून साडेपाच टक्के चलनफुगवटा ही मर्यादा योग्य राहील. याउलट एमपीसीवर काम केलेल्या काही सदस्यांनी चलनफुगवट्याचे लक्ष्य हे अडीच टक्क्यांपर्यंत खाली आणण्याची गरज असल्याचे म्हटले आहे. रिझर्व्ह बँकेने 'हेडलाइन इन्फ्लेशन'वर (इंधनासह सर्व माल आणि वस्तूंच्या किमतीची पातळी) भर द्यावा की फक्त अन्नेतर वस्तूंच्या महागाईवर भर द्यावा, याबद्दलही मतभेद आहेत. मात्र या सगळ्यापलीकडे राजकीय वास्तवाचा विचार करूनच निर्णय घेतले जातात. ८० कोटी जनतेला मोफत अन्नधान्य दिले जात असून 'लाडकी बहीण' धाटणीच्या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. याचा अर्थ अजूनही बहुसंख्य जनतेला भाववाढीशी झुंजावे लागत आहे. दैनंदिन गरजा भागवण्यासाठी त्यांच्या खिशात पुरेसे पैसे नाहीत, हे कठोर वास्तव आहे.

---

चर्चा आजची

# जगाचा पोशिंदा संकटातच

**प्रमोद जाधव**

जगाचा पोशिंदा म्हणून बळी राजा म्हणजे शेतकऱ्याकडे पाहिले जाते. या शेतकऱ्याच्या नशीबी कायमच संकट ठरलेले आहे. तरीदेखील हा शेतकरी कधीही रडत बसत नाही. पुन्हा आशेचे किरण घेऊन वेगळ्या उमेदीने कामाला लागून लागवड करण्यावर भर देतो. त्यामुळे आज जगातील प्रत्येक व्यक्ती दोन वेळा तरी पोटभर अन्न खातो. परंतु या शेतकऱ्याच्या समस्यांवर अजूनही गांभीर्याने पाहिले जात नाही. ही मोठी चिंताजनक बाब आहे.

रायगड जिल्ह्याला पुर्वी भाताचे कोठार म्हणून ओळखले जात होते. जिल्ह्यातील नागरिक भातशेतीसह वाल, पावटा आदी पिकांची लागवड करून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालवित होते. येथील शेतकरी पहाटे शेतावर जाऊन आपली शेतीची कामे करीत होता. त्यामुळे दहा वर्षापुर्वी भाताचे लाखो हेक्टर क्षेत्र जिल्ह्यामध्ये होते. एक लाख २४ हजार हेक्टर असणारे क्षेत्र कमी होऊ लागले. त्याचे कारण म्हणजे जिल्ह्यात लहान मोठ्या उद्योगांनी पाऊल टाकण्यास सुरुवात केली. आपल्या मुलांना रोजगार मिळेल, या आशेने शेतकऱ्यांनी जमीनी विकल्या. मात्र आजही जिल्ह्यातील तरुण रोजगाराविनाच आहेत अशी परिस्थिती आहे. प्रकल्पाच्या नावाखाली जमीनी विकत घेतल्या. परंतु त्याठिकाणी कोणताही प्रकल्प उभा केला नाही.त्यामुळे पिकत्या जमीनी ओसाड झाल्या. या जमीनी नापिक राहिल्या असल्याचे चित्र आजही आहे सध्या जिल्हयामध्ये भाताचे क्षेत्र ८७ हजार हेक्टर इतके आहे. येथील ९५ टक्के शेतकरी पावसावर अवलंबून भातशेती करतात. उरलेले पाच टक्के शेतकरी दुबार पीक घेऊन भात पिकांची लागवड करतात.

लॉकडाऊनच्या काळात उद्योग धंदे बंद पडल्याने अनेक तरुण बेकार झाले.त्यामुळे या तरुणांनी आपल्या शिक्षणाचा उपयोग उद्योग व्यवसाय सूरू करण्यावर भर दिला. काही शेतकरी भातपीकांची लागवड करण्यावर भर देऊ लागले. तर काही शेतकरी आंबा या फळ पिकांसह इतर कडधान्यांची लागवड करण्यावर भर देऊ लागले. शेतकऱ्यांना आर्थिक बळ मिळावे, म्हणून कृषी विभागामार्फत फळ पिक लागवडीची जनजागृती करण्यात आली. त्यामुळे आंबा फळ पिक लागवडीचे क्षेत्र साडेबारा हजार हेक्टरवरून १५ हजार हेक्टरपर्यंत पोहचले. शेतकऱ्यांनी भात पिकांसह आंबा पिक लागवड करण्यावर भर दिला. मात्र अवकाळी पाऊस, बदलत्या वातावरणाने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला. आंबा तयार होण्याच्या वाटेवर असताना वातावरणात बदल होतो. त्यामध्ये आंबे गळू पडणे, व इतर फळ रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याचे संकट शेतकऱ्यांवर कायमच येत आहे. गतवर्षी आंबा उत्पादकांना अवकाळी पावसासह बदलत्या वातावरणाचा फटका मोठा बसला. ऐन उन्हाळ्याच्या हंगामात पाऊस पडल्याने तयार झालेला आंबा गळून पडला. त्यामुळे आंबा उत्पादक शेतकरी मोठ्या संकटात सापडला होता. यावर्षी पावसाने सुरुवात लवकर केल्याने भातपिक उत्पादक शेतकऱ्यांनाही या संकटाला सामोरे जावे लागले. शेती मशागतीची कामे अंतिम टप्प्यात असताना पाऊस पडला. या पावसामुळे शेतकऱ्यांची धावाधाव सुरु झाली. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस पडला. कोरडी पडलेल्या नद्या, नाल्या पाण्याने ओसंडून वाहू लागले. अनेक भागात पुरपरिस्थिती निर्माण झाली होती. शेतंही पाण्याने भरून गेली होती. हा पाऊस जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत सुरू राहिला. त्यानंतर काही दिवस विश्रांती घेतल्यानंतर पावसाचा जोर पुन्हा सुरू झाला.मात्र पेरणी करण्यासाठी शेतकऱ्यांना अडथळे निर्माण झाली. काही शेतकऱ्यांनी रो पध्दतीने पेरणी केली. परंतु लावणीसाठी भाताची रोपे कमी पडली. त्यामुळे काही शेतकऱ्यांनी पुर्ण शेतांमध्ये रोपांची लागवड करता आली नाही. रोपांअभावी अनेक शेतांचा भाग मोकळा सोडण्यात आला.

यातून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी सांभाळण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांच्याकडील संकट काही कमी होण्याचे चित्र दिसून आले नाही. जिल्ह्यामध्ये भात पिक चांगले झाले. रोपांची उगवण चांगली झाली. रोपांना कणश्या येऊ लागल्या. त्यामुळे शेतकरी सुखावून गेला होता. परंतु दात्या नावाचे संकट आले. शेतातील उंदीराने कणश्या खाऊन रोपांचे नुकसान केले. त्यानंतर करपा, तुडतुड्या सारख्या रोगाचा प्रादुर्भाव वाढला. शेतकऱ्यांवर समस्या निर्माण झाल्या तरी शेतकरी दुःख धरत बसला नाही.कापणीसाठी शेतकरी सज्ज झाला असताना अचानक गेल्या चार दिवसांपासून पाऊस पुन्हा सुरु झाला. या पावसाने शेकडो हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. शेतकरी मेटाकुटीला आला आहे. पण त्यांचे दुःख सांगणार कोणाला अशी परिस्थिती जिल्ह्यातील शेतकऱ्यांची झाली आहे. संकटामागून संकटे येत असतानाही जिल्ह्यातील शेतकरी रडत बसला नाही, सरकारकडून काहीतरी अनुदान मिळेल, याची वाट बघत बसला नाही, तर स्वतःहून शेतामध्ये उतरून शेतात साचलेल्या पाण्याचा निचरा करण्यासाठी काम करू लागला. एका बाजूला दुःख असतानाही त्याचा गाजावाजा न करता, रडत नाही, बसला, तर लढत बसला. या जिल्हयातील शेतकऱ्यांच्या समस्यांकडे प्रशासनाने आणि शासनाने खऱ्या अर्थाने बघणे गरजेचे आहे.

---

लोकसंसद

## हिंदू देवतांची अश्लील चित्रे अजून का प्रदर्शित होत आहेत?

एक बातमी वाचनात आली की नवरात्रोत्सवामध्ये कुलाबा येथील 'मस्कारा' या कलादालनातील एका चित्रप्रदर्शनामध्ये कलेच्या नावाखाली श्री महाकालीदेवी आणि भगवान शिव यांची नग्न, अश्लील आणि कामुक चित्रे लावण्यात आली आहेत. या प्रदर्शनात लावण्यात आलेली देवी देवतांच्या चित्राना मानवी स्वरूपात दाखविण्याचा किळसवाणा प्रकार घडला आहे. त्याचे उदात्तीकरण या कलादालाने ही चित्रे प्रदर्शित करून केला आहे. या प्रकरणी धार्मिक भावना दुखावल्यावरून अधिवक्ता विशाल नाखवा यांनी कुलाबा पोलीस ठाण्यात तक्रार प्रविष्ट (दाखल) केली असून तक्रारीवरून हिंदूंच्या देवतांची अश्लील चित्रे काढणारे चित्रकार टी. वेंकण्णा आणि 'मस्कारा' कलादालनाचे मालक अभय मस्कारा यांच्या विरोधात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या दोघांना अटक करण्याची मागणी समाजातून करण्यात येत आहे. म्हणूनच पोलिसांनी मुंबई येथील मस्करा कलादालनापुढे संरक्षण देण्यात आले आहे. या चित्रकाराला आणि त्याचे प्रदर्शन भरविण्यात आलेल्या कलादालनाला कायमचे कुलूप लावले तर बरे होईल. आपल्या देवतांचे वैरी आपणच होऊ नये यासाठी अश्या पद्धतीने चित्रे रेखाटणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जरब बसावी अशी शिक्षा या दोन्ही जणांना होईपर्यंत त्याचा पाठपुरावा करणे हेच आपले कर्तव्य आहे. **- श्री आल्हाद माळगांवकर, पनवेल**

## मदत नको पण राजकारण आवरा

मराठवाड्यातील पूरस्थितीने जनतेचे हाल झाले असताना नेतेमंडळींनी मदतीसाठी पुढे येण्याऐवजी राजकारणाचाच खेळ मांडलेला दिसतो. पूरग्रस्त भागात लवाजम्यासह दौरे, मदतीच्या नावाखाली संचवाटपाचे फोटोसेशन, तुटपुंज्या मदतीचा गाजावाजा हा प्रकार सतत सुरू आहे. मुख्यमंत्री विरोधकांना ''राजकारण करू नका'' म्हणतात, पण त्यांच्या पक्षातीलच नेते राजकीय विधाने करून हा सल्ला पायदळी तुडवतात. भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शिवसेनेला (उबाठा) दसरा मेळावा रद्द करून त्याचा खर्च पूरग्रस्तांना द्यावा अशी मागणी केली. खरी गोष्ट अशी की, जर सर्व पक्षांनी उत्सवांचा गाजावाजा थांबवून तो खर्च थेट मदतीसाठी वळवला असता तर जनतेला मोठा दिलासा मिळाला असता. आणखी एक कटू वास्तव म्हणजे नेते, कलाकार आणि पक्षीय मंडळी जनतेकडून मदतीचे आवाहन करतात, आणि सर्वसामान्य माणूस आपल्या परीने धावून येतोही, पण ज्यांच्याकडे प्रचंड आर्थिक सामर्थ्य आहे त्यांनीच (काही अपवाद वगळता) हात आखडता घेतलेला दिसतो. संकटाच्या काळात पद, पैसा आणि प्रभावाचा खरा उपयोग करून जनतेला मदत करणे हीच खरी जबाबदारी आहे. **- दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

दिनविशेष

# आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन

जगभरात सर्वत्र विविध भाषा बोलल्या जातात. आणि आता आपली भाषा सोडून इतर भाषा येणेही गरजेचे झाले आहे. आणि इथेच त्या भाषेचा अनुवाद आणि अनुवादकर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे आजचा हा खास दिवस त्यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. आता कोणीही कोणत्याही भाषेत लिहिलेले पुस्तक वाचू शकतो. कोणत्याही भाषेत तयार झालेले चित्रपट समजू शकतात. इतर लोक त्यांच्या भाषेत काय म्हणतात ते समजू शकते. त्याला ती भाषा येत नसली तरी. आता लोकांना काही कळत नसेल तर भाषांतरामुळे हे सर्व शक्य आहे. त्यामुळे तो लगेच गुगलवर भाषांतर करतो. कोणाला स्पॅनिश भाषेतील चित्रपट बघायचा असेल तर. म्हणून तो त्यासाठी भाषांतरित सबटायटल्स इन्स्टॉल करण्याचा प्रयत्न करतो. ३० सप्टेंबरला जगभरात आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जाणार आहे. जीवनातील भाषांतराचे महत्त्व समजून घेण्यासाठी हा खास दिवस आहे. ३० सप्टेंबर रोजी जगभरात आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो. जगात अनेक लोक भाषांतरकार म्हणून काम करत आहेत. त्या सर्वांचा सन्मान करण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. तिथे त्याचा इतिहास बोलायला हवा. त्यामुळे हा दिवस सेंट जेरोमची पुण्यतिथी म्हणून साजरा केला जातो. सेंट जेरोम हे बायबलचे भाषांतरकार आहेत.

सेंट जेरोम हे अनुवादकांचे संरक्षक आणि संत म्हणून ओळखले जातात आणि त्यांच्या स्मरणार्थ त्यांच्या पुण्यतिथीला आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो. सेंट जेरोम हे ईशान्य इटलीचे धर्मगुरू होते. त्याने लॅट्रीनमधून बायबलच्या अनेक हस्तलिखितांचे ग्रीकमध्ये भाषांतर केले. त्याने हिब्रू गॉस्पेलचे काही भाग ग्रीकमध्ये भाषांतरित केले. इंटरनॅशनल ट्रान्सलेशन डे, इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर म्हणजेच ने जगभरातील अनुवादकांच्या समुदायाला एकत्र आणण्यासाठी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली. इंटरनॅशनल फेडरेशन ऑफ ट्रान्सलेटर किंवा ची स्थापना १९५३ साली झाली. १९९१ मध्ये, अनुवादकांच्या आंतरराष्ट्रीय महासंघाने जगभरातील अनुवादक समुदायाची ओळख वाढवण्यासाठी हा दिवस आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन म्हणून साजरा करण्यास सुरुवात केली. अनुवादक वेगवेगळ्या भाषांतील साहित्य, ज्ञान आणि विचार यांची देवाणघेवाण सुलभ करतात. ते विविध संस्कृती आणि समुदायांना जोडण्याचे काम करतात, ज्यामुळे जागतिक संवाद, समजूतदारपणा आणि सहकार्य वाढते. या दिवसाचा उद्देश अनुवादाच्या माध्यमातून भाषांतर आणि भाषिक अडथळे दूर करून ज्ञानाचा प्रसार करणे आहे. शिक्षण, विज्ञान, तंत्रज्ञान, व्यापार, कला आणि राजकारण अशा विविध क्षेत्रांत अनुवादकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. अनुवादाच्या माध्यमातून लोक एकमेकांच्या भाषा, संस्कृती आणि परंपरांचा आदर करतात आणि जागतिक एकात्मता वाढते. भारताबद्दल बोलायचं झालं तर, उत्तरेत राहणाऱ्या नागरिकांना दक्षिणेतील भाषा येत नाहीत, पण तरीही त्यांनी बनवलेले चित्रपट सर्वत्र लोकप्रिय आहेत. कारण हे चित्रपट इतर अनेक भाषांमध्ये डब केले जातात. जेणेकरून भारताबरोबरच बाहेरच्या देशांनाही हे दक्षिणेचे चित्रपट पाहता येतील. यासोबतच इतर देशांतील अनेक चित्रपट भारतीय भाषांमध्ये अनुवादित केले जातात. जेणेकरून आपण ते चित्रपट पाहू शकू. मग जेव्हा राजकारणाचा विषय येतो तेव्हा आपलं मत मांडण्यासाठी आणि इतरांना समजून घेण्यासाठी अनुवादकाची गरज असते. पाहिले तर जगातील देशांना जोडण्यात अनुवादक महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. या योगदानाचा गौरव करण्यासाठी मआंतरराष्ट्रीय अनुवाद दिनफ सुरू करण्यात आला आहे. २४ मे २०१७ रोजी, संयुक्त राष्ट्र महासभेने ३० सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा करण्याचा ठराव मंजूर केला. तेव्हापासून जगभरात ३० सप्टेंबर रोजी आंतरराष्ट्रीय अनुवाद दिन साजरा केला जातो.

# राज्यातील मासेमारी पूर्णतः ठप्प



। चिरनेर । प्रतिनिधी ।

वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे मागील दोन महिन्यांपासून सलग आठव्यांदा धोक्याचा इशारा देणारा तीन नंबरचा बावटा लावण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील मासेमारीसह गेटवे-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, गेटवे-मांडवा, मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या सागरी मार्गावरील प्रवासी सेवा शनिवार (दि.२७)पासूनच पुन्हा एकदा ठप्प झाली आहे.

वादळी वारे, खराब हवामान आणि अतिवृष्टीचा फटका राज्यातील मच्छीमारांना मागील दोन-तीन महिन्यांत सलग आठव्यांदा बसला आहे. शनिवारपासूनच धोक्याचा इशारा देणारा देणारा तीन नंबरचा बावटा विविध बंदरात लावण्यात आला आहे. यामुळे राज्यातील मासेमारी ठप्प झाली आहे. तीन नंबरच्या बावट्यामुळे कसारा, ससुनडॉक, करंजा आणि राज्यातील विविध बंदरात हजारो मच्छीमार बोटींना नांगरुन ठेवण्यात आल्या आहेत. यामध्ये करंजा बंदरातील सुमारे ४०० बोटींनी नांगर टाकला आहे. अशी माहिती करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली.

तीन नंबरच्या बावट्यामुळे खबरदारीची उपाययोजना म्हणून गेटवे ऑफ इंडिया-एलिफंटा, गेटवे-जेएनपीए, गेटवे-मांडवा सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक शनिवारपासूनच बंद करण्यात आली असल्याचे गेटवे मुंबई जलवाहतूक संस्थेचे सेक्रेटरी इक्बाल मुकादम यांनी सांगितले. तर मोरा-भाऊचा धक्का, करंजा-रेवस या दरम्यानची सागरी प्रवासी वाहतूकही शनिवारपासूनच बंद करण्यात आली असल्याची माहिती भाऊचा धक्का येथील बंदर विभागाचे निरीक्षक सुशील साटेलकर यांनी दिली. यामुळे सागरी मार्गावरील प्रवासी, पर्यटक वाहतूक कोलमडली आहे.

## मच्छीमारांना नुकसान भरपाई देण्याची मागणी

मागील दोन -तीन महिन्यांपासून विविध प्रकारची वादळे, अतिवृष्टी, खराब हवामानामुळे मासेमारी सलग आठ वेळा बंद ठेवावी लागली आहे. मासेमारी हंगामातच मासळी व्यवसाय सातत्याने बंद ठेवण्याची दुर्दैवी पाळी येऊन ठेपल्याने मच्छीमारांना लाखो रुपयांच्या आर्थिक नुकसानाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांप्रमाणेच कृषीचा दर्जा दिलेल्या राज्यातील सर्वच मच्छीमारांनाही शासनाने तातडीने आर्थिक नुकसान भरपाई जाहीर करण्याची मागणीही करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी वृत्तपत्राच्या माध्यमातून केली आहे.

## रस्त्यावरील पाण्यामुळे वाहतूक संथगतीने


सतत कोसळणाऱ्या पावसामुळे उरण परिसरातील जासई उड्डाणपूलाच्या सर्व्हिस रोड, जासई-गव्हाणफाटा, जेएनपीए-पळस्पे राष्ट्रीय महामार्गावरील जेएसडब्लू कंपनी समोर, नवघर व परिसरातील अन्य ठिकाणच्या रस्त्यावर पावसाचे पाणी साचले आहे. त्यामुळे वाहतूक संथगतीने सुरू होती. मात्र उरण व जेएनपीए परिसरात वाहतूक कोंडींची समस्या निर्माण झाली नसल्याचे उरण वाहतूक नियंत्रण विभागाचे वपोनि अतुल दहिफळे व जेएनपीए वाहतूक नियंत्रण विभागाचे वपोनि जी.एम. मुजावर यांनी सांगितले.

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० सप्टेंबर

१) श्रीम.सुनिता मधुसूदन नाईक अलिबाग, ३०-९-१९३८
२) श्री. शरद शंकर बोभाटे कोळीवाडा, अलिबाग, ३०-९-१९५०
३)श्रीम.आयरीन एझेक आवासकर अलिबाग ३०-९-१९५२
४)श्री.सुभाष हरिभाऊ शेडगे चेंढरे, अलिबाग ३०-९-१९५७

### सुवर्णकण



स्वभाव बदलत नाही हे खरे आहे पण त्या स्वभावाला चांगला आकार देणे कठीण नाही त्यासाठी गरज असते ती सबुरीची आणि सातत्याने प्रयत्नांची

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

## चिपळुणात जुगार अड्ड्यावर छापा

**चिपळूण :** बिगरपरवाना सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकला. या कारवाईत जुगाराचा खेळ चालविणाऱ्या एका प्रौढावर चिपळूण पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विनायक शांताराम उमासरे (वय ४०, रा. उक्ताड-कानसेवाडी, चिपळूण) असे संशयिताचे नाव आहे. ही कारवाई शनिवारी (दि.२७) सायंकाळी पेठमाप येथे करण्यात आली. तसेच, या कारवाईमध्ये चिपळूण पोलिसांनी ७५२ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

## दादासाहेब सरफरे विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे यश

। संगमेश्वर । प्रतिनिधी ।

बुरंबी पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे दादासाहेब सरफरे विद्यालय आणि बुरंबी पंचक्रोशी कनिष्ठ महाविद्यालय बुरंबी या विद्यालयाने स्वस्तिक युवा प्रतिष्ठान देवरुख आयोजित तालुकास्तरीय सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्राथमिक गटात प्रथम क्रमांक पटकवला आहे. प्रशालेतील कार्तिकी सप्रे, ईश्वरी सुवरे,अंतरा सप्रे, मिलिंद पवार व कुणाल सावंत या इयत्ता ५ वी ते ७ वी उच्च प्राथमिक गटातील विद्यार्थ्यांनी सामान्यज्ञान प्रश्नमंजुषा विभागात प्रथम क्रमांक पटकावला. यासाठी शिक्षक संदीप जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष राजाराम गर्दे, उपाध्यक्ष दिलीप मोरे, सरचिटणीस शरद बाईत, खजिनदार महेश जाधव, सचिव ललितकुमार लोटणकर, संचालक दिनेश जाधव, सचिन मोहिते, मुख्याध्यापक प्रकाश वीरकर, पर्यवेक्षक महावीर साठे यांनी अभिनंदन केले. दादासाहेब सरफरे विद्यालय कला, क्रीडा स्पर्धेत जिल्हा, विभाग आणि राज्य पातळीवर चमक दाखवत असते. सर्वच उपक्रमात विद्यालयाचे विद्यार्थी आपले नैपुण्य दाखवत असतात. त्याच्या यशाबद्दल पंचक्रोशीतून ग्रामस्थ, पालकांकडूनदेखील कौतुक होत आहे.

## 'या' कार्डधारकांचे रेशन बंद

**खेड :** ई-केवायसी अपूर्ण असल्याने खेड तालुक्यातील तब्बल ८३८ शिधापत्रिकाधारकांना दणका देत रास्तधान्य दुकानावरून दिले जाणारे धान्य थांबवले आहे. सणासुदीच्या तोंडावर पुरवठा विभागाने धक्का दिला आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाकडून सातत्याने सूचना करण्यात आली आहे. मात्र, या सूचनेकडे कानाडोळा करण्यात आला आहे. त्यामुळे या कार्डधारकांचे रेशन बंद करण्यात आले आहे. तसेच, ६ महिने धान्य दुकानातून उचल न करणाऱ्या कार्डधारकांनाही जिल्हा पुरवठा विभागाने दणका देण्यात आला आहे.

## पुरात वाहून शेतकऱ्याचा मृत्यू

। पालघर । प्रतिनिधी ।

पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील कळमदेवी परिसरातील रायपूर येथील एका शेतकऱ्याचा पुराच्या पाण्यात पडून मृत्यू झाला. ही दुर्दैवी घटना रविवारी (दि.२८) घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, रायपूर येथील रहिवासी सदानंद भुरभुरा (५५) हे रविवारी सकाळी शेतीची पाहणी करून घरी परतत होते. त्यावेळी मुसळधार पावसामुळे नदीला प्रचंड पूर आला होता. नदी ओलांडण्याच्या प्रयत्नात त्यांचा पाय घसरला व ते पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले. सकाळपासून ते घरी परतले नसल्यामुळे कुटुंबियांनी त्यांचा शोध घेतला असता दुसऱ्या दिवशी सोमवारी (दि.२९) सकाळी कळमदेवी येथील शिलोंडा ग्रामपंचायत हद्दीत नदीकाठी त्यांचा मृतदेह आढळून आला. या घटनेचा पंचनामा करण्यात आला असून शासनाच्या नियमानुसार संबंधित कुटुंबाला नुकसानभरपाई मिळावी यासाठी प्रक्रिया सुरू करण्यात येत असल्याची माहिती स्थानिक प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दि. २७/०९/२०२५

**जाहीर नोटिस**

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील नमुद केलेल्या मिळकती कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतींचा साठेकरार विद्यमान मालक मारूती रामदास पाटील, वगैरे यांचेसोबत झालेला आहे. सदर मिळकती या निर्वेध व बोजाविरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतींबाबत विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहिर नोटीस प्रसिध्द करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे,

-: मिळकतींचे वर्णन :-

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| आंबेपूर ता. अलिबाग | ११६ | ०-१०-०० पो.ख. ०-०१-०० एकूण क्षेत्र ०-११-०० | ०.१९ |
| आंबेपूर ता. अलिबाग | ११७/२/अ/४ | ०-५६-९० पो.ख. ०-०६-१० एकूण क्षेत्र ०-६३-०० | १५.८७ |
| आंबेपूर ता. अलिबाग | ११७/३ | ०-०७-०० पो.ख. ०-००-०० एकूण क्षेत्र ०-०७-०० | ०.३६ |

वर नमुद केलेल्या मिळकती या जाहिर नोटिसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतींसंदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या मुळ सही शिक्याची कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून होणाऱ्या ७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधन कारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

**ॲड. आशिष नरेंद्र म्हात्रे**
मु.पेझारी (पळी आंबेघर) पो. पोयनाड
ता. अलिबाग, जि. रायगड.
मोबा.नं. ९२७३२७३८४३/९६३७२७००१९

# यु.ई.एस. स्कूलमध्ये गरबा डे साजरा



। उरण । प्रतिनिधी ।

यु.ई.एस.स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स ॲण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये शनिवारी(दि.२९) गरबा डे उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, उपाध्यक्ष. मिलिंद पाडगांवकर, मानद सचिव ॲड. राजेंद्र भानुशाली, सहसचिव ॲड. अपूर्वा ठाकूर, सदस्य व माजी मानद सचिव आनंद भिंगार्डे, सिनियर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व पीटीए सदस्य यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमास उपस्थित असलेल्या मान्यवरांनी दुर्गामातेच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीप प्रज्ज्वलन केले. त्यानंतर श्रीफळ वाढवून गरबा डेला सुरुवात झाली. इयत्ता ९वी व १० वी तसेच ज्युनियर व सिनियर कॉलेजच्या विद्यार्थी व विद्यार्थीनींनी संगीताच्या तालावर बेधुंद व मनमोहक असे गरबानृत्य सादर करुन गरबा डेचा मनमुराद आनंद लुटला. उत्कृष्ट नृत्य करणाऱ्या व उत्कृष्ट वेशभूषा करणाऱ्या विद्यार्थ्यांना व शिक्षकांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन स्कूल, ज्यु. व सिनियर कॉलेजच्या शिक्षिकांनी केले.

पान १ वरून

## पावसामुळे शेतकरी संकटात

काही ठिकाणी कापणीसाठी शेतकरी सज्ज झाले होते. काही ठिकाणी भातांच्या रोपांना कणश्या आल्या. परंतु गेल्या दोन दिवसांपासून पडत असलेल्या पावसाने शेतकऱ्यांवर मोठे संकट उभे केले आहे. शेत पाण्याने भरली. तयार झालेली रोपे पाण्याखाली गेले आहेत. त्यामुळे हातातोंडाशी आलेला घास जाण्याची भिती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. २७ व २८ सप्टेंबर असे दोन दिवस पडलेल्या पावसात ४७३ हेक्टरहून अधिक भात पिकांच्या क्षेत्राचे नुकसान झाले. अलिबाग, पेण, खालापूर, उरण, सुधागड (पाली), श्रीवर्धन, महाड आदी तालुक्यातील ८३ हून अधिक गावांतील एक हजार ३८८ हून अधिक शेतकऱ्यांना या पावसामुळे फटका बसला. या शेतकऱ्यांचे ३३ टक्केपेक्षा अधिक नुकसान झाल्याची माहिती कृषी विभागाकडून देण्यात आली आहे.

त्यामध्ये अलिबाग तालुक्यातील २६ गावांतील ७४७ शेतकऱ्यांना पावसाचा फटका बसला आहे. २३६ हेक्टर क्षेत्र बाधीत झाले आहे. तालुक्यातील कार्ले परिसरातील चरी आदी परिसरातील शेतकऱ्यांना अधिक फटका बसला असल्याची माहिती प्रभारी तालुका कृषी अधिकारी तथा मंडळ कृषी अधिकारी हिंदुराव मोरे यांनी दिली. शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी कृषी विभागाचे कर्मचारी कामाला लागले आहेत. शेतांवर जाऊन नुकसानीचे पंचनामे करण्याचे काम केले जात असल्याचे सांगण्यात आले आहे.

**रब्बी हंगाम लांबणीवर?**

जिल्ह्यात सतत पाऊस सुरु राहिल्यास जमीनीत ओलावा कायम राहिल. त्यामुळे रब्बी हंगामात होणाऱ्या पिकांची लागवड करण्यास अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे. बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव पिकांवर होऊ शकतो. त्यामुळे रब्बी हंगाम लांबणीवर जाण्याची भिती व्यक्त केली जात आहे. कांदा, इतर भाजीपाला पिकांची लागवड एक महिना उशीरा होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

## जोड प्रकल्पांची कामे संथगतीने

रोडपाली येथील खाडीवर नवीन उड्डाणपूल बांधण्याचे काम सुरू असले तरी त्याला वेळ लागणार असल्याने सध्या वाहतूक मंदावलेली आहे.कळंबोली सर्कलचे ७०० कोटी खर्च करून विस्तारीकरणाचे काम हाती घेण्यात आलेले आहे, पण यासाठीचा कालावधी मोठा आहे. त्यामुळे विमानतळ सुरू झाल्यानंतर वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागणार आहे.विमानतळाकडे येण्यासाठी ठाणेपासून इलेव्हेटेड रोडचा प्रस्ताव आहे. वॉटर टॅक्सीसाठी जेट्टी बांधावी लागणार आहे. कोस्टल रोडचे काम अपूर्ण असून, मुंबई, नवी मुंबई मेट्रोसेवा सुरू होण्यासाठी काही वर्षे लागणार आहेत.

## वैद्यकीय महाविद्यालयाला नोटीस

महाविद्यालयाच्या इमारतीचे काम उसर येथे सुरु आहे. ५२ एकर क्षेत्रामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय बांधले जाणार आहे. या ठिकाणी रुग्णालय, वसतीगृह सुसज्ज असे कार्यालय असणार आहे. त्यामुळे सध्या वैद्यकीय महाविद्यालयाचा कारभार जिल्हा रुग्णालयाच्या जागेत सुरु आहे. याठिकाणी प्रशासकीय इमारत बांधण्यात आली असून कुरुळ येथील आरसीएफ कर्मचारी वसाहतीमध्ये विद्यार्थ्यांचे वसतीगृह आहे. गेल्या चार वर्षापासून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यात आले आहे. आतापर्यंत चारशेहून अधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून काही विद्यार्थी शिक्षण घेऊन जिल्हा रुग्णालयात प्रशिणार्थी डॉक्टर म्हणून काम करीत आहेत. सध्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश सुरू आहे. प्रवेशाची दुसरी फेरी सुरु आहे. लवकरच ही प्रक्रिया पूर्ण होणार असल्याची माहिती महाविद्यालयाकडून देण्यात आली आहे.

मात्र या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामकाजासह तांत्रिक शैक्षणिक गुणवत्तेबाबत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाला (एनएमसी) त्रुटी आढळून आल्याची माहिती समोर आली आहे. निकषांची पूर्तता न केल्याने कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. आयोगाच्या तपासणीत महाविद्यालयात अनेक मुख्य तांत्रिक, प्रशासकीय आणि शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित गंभीर त्रुटी आढळल्या असून त्यांचे दुरुस्तीचे आदेश देण्यात आले. आयोगाने महाविद्यालयाला पुढील चार महिन्यांच्या आत या त्रुटींची पूर्तता करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

**राज्यातील ३० महाविद्यालयांचा समावेश**

राज्यातील ३० वैद्यकीय महाविद्यालयांनी निकषांची पूर्तता केली नसल्याचे आढळले आहे. यामुळे या महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. यामध्ये गतवर्षी मान्यता मिळालेल्या १० शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांपैकी मुंबई, अंबरनाथ, अमरावती, हिंगोली, वाशिम, गडचिरोली, जालना, बुलढाणा आणि भंडारा या नऊ संस्थांसह सोलापूरमधील डॉ. वैशंपायन मेमोरियल वैद्यकीय महाविद्यालय, बारामती, रत्नागिरी, अकोला, चंद्रपूर, गोंदिया, उस्मानाबाद, सातारा, अलिबाग, जळगाव, मिरज, नंदुरबार, परभणी, सिंधुदुर्ग, नागपूरमधील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, यवतमाळमधील वसंतराव नाईक वैद्यकीय महाविद्यालय, कोल्हापूरमधील राजश्री छत्रपती शाहू महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धुळ्यातील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, पुण्यातील आर्मड् फोर्स वैद्यकीय म हाविद्यालय, नांदेडमधी डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मुंबई महानगरपालिकेचे शीव रुग्णालय यांचा समावेश आहे.

**आयोगाचा निर्णय आणि पुढील कारवाई**

२०२४-२५ शैक्षणिक वर्षातही या त्रुटींद्वारे कित्येकदा सशर्त नवीकरण करण्यात आले होते.यंदा या त्रुटी कायम असल्याने, आयोगाने महाविद्यालयाला पुढील चार महिन्यांच्या आत या त्रुटी दुरुस्त करण्याचा आदेश दिला आहे. चार महिन्यांनंतर पुन्हा तपासणी करून गरज भासल्यास कडक कारवाई होणार आहे. महाविद्यालयाला या निर्णयाविरुद्ध ६० दिवसांच्या आत अपील करण्याचा अधिकार आहे.

## ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडली

बसला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील रविवारी मराठवाड्यातील सात जिल्ह्यांसह सोलापूर जिल्ह्यातील पावसाच्या आणि मदतीच्या स्थितीचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. तसेच अधिकारी वर्गाला महत्त्वाच्या सूचना केल्या. आता शरद पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारला पाच प्रमुख सूचना केल्या आहेत.राज्यातील अनेक भागांत अतिवृष्टीमुळे शेतकरी व सामान्य नागरिकांचे अपरिमित नुकसान झाले आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था अक्षरशः कोलमडून पडली आहे. शहरी भागांनाही याची झळ पोहोचली आहे. ह्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने आपत्ती निवारणाची काही महत्त्वपुर्ण कामे तातडीने हाती घ्यावीत, असे मी सुचवू इच्छितो. या संकटात शासकीय यंत्रणा झोकून देऊन काम करत आहे. जनतेने धीराने घ्यावे. यापूर्वीही अशा संकटांतून मार्ग काढून आपण उभे राहिलो आहोत. तसे यावेळी ही पुन्हा उभे राहू, याचा मला विश्वास आहे, असेही शरद पवार यांनी सांगितले.

**शरद पवारांनी केलेल्या सूचना**

पंचनामा प्रक्रियेसाठी ठराविक मुदतीचे बंधन नसावे.
नुकसानभरपाई सोबत पुनरुज्जीवन कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे.
साहित्य वाटपाचा कार्यक्रम हाती घ्यावा
शेतकरी हिताचे निर्णय
मानसिक व सामाजिक आधार

## रेंटल बाईक विरोधात संघर्ष

विभागातील अधिकारी यांना निवेदन देण्यात आले असून कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. वाढत्या बेकारीमुळे अनेक तरुण घरी बसले आहेत. परंतु काही तरुणांनी स्वतःचा व्यवसाय चालविण्यासाठी पुढाकार घेतला. कर्ज काढून रिक्षा घेतली. या व्यवसायातून कुटूंबाचा उदरनिर्वाह चालविण्याचे काम रिक्षा चालक व मालक करीत आहेत. स्थानिकांसह पर्यटकांची ने आण करण्याचे काम रिक्षाद्वारे केले जाते. अलिबागमध्ये नोकरीनिमित्त येणारे कर्मचारी, कामगार तसेच पर्यटकांमार्फत रिक्षा चालकांना रोजगार मिळत आहे. मात्र अलिबाग शहरासह परिसरात भाड्याने दुचाकी देण्याचा व्यवसाय गेल्या अनेक वर्षापासून सुरु आहे. भाड्याने दुचाकी देण्याच्या व्यवसायाला परवानगी नसतानाही काही मंडळी खुलेआमपणे हा बेकायदेशीर व्यवसाय चालवित आहेत. त्याचा परिणाम अलिबागमधील रिक्षा चालकांच्या व्यवसायावर होत आहे. त्यामुळे रिक्षा चालक मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय चालविणारे मालक धनदांडगे व सेवानिवृत्त अधिकारी आहेत. त्यांच्याविरोधात कारवाई करण्याची मागणी रिक्षा चालक व मालकांनी केली आहे. हा व्यवसाय बंद करावा अशी मागणी सातत्याने होत आहे. दुचाकी भाड्याने देण्याच्या व्यवसायाविरोधात ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. मानसी म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली रिक्षा चालक व मालकांनी एल्गार पुकारला आहे. पेण येथील उपप्रादेशिक परिवहन अधिकारी महेश देवकाते यांची सोमवारी भेट घेण्यात आली. दुचाकी भाड्याने देण्याचा व्यवसाय बेकायदेशीर चालत आहे. याची माहिती देण्यात आली. या अवैध व्यवसायावर कारवाई करावी अशी मागणी केली. रिक्षा चालक व मालक पर्यटनावर अवलंबून राहून रिक्षा चालविण्याचा व्यवसाय करतात. रेंटल बाईक विरोधात कारवाई केली नाही, तर आगामी काळात उग्र आंदोलन केले जाईल. शेवटच्या क्षणापर्यंत रिक्षा चालक व मालकांसोबत राहिन, अशी ग्वाही यावेळी ॲड.मानसी म्हात्रे यांनी दिली.

## तंत्रमंत्राच्या नादात तीन कोटींचा चुना

मिळाली होती. वडिलांसोबत त्याने मौलवी मुस्तफा शेख ऊर्फ कांबळेची भेट घेतली होती. मुस्तफाची मुलगी सफीनाने तेजसला आईवर करणी केल्याचे सांगत ५० हजार रुपये घेतले. नंतर तिचा भाऊ आहात शेखने संपर्क साधत तंत्रविद्येतून आई बरी होईल, असे सांगून विश्वास संपादन केला. काश्मीर विशेष पूजाविधीसाठी तब्बल तीन कोटी १० लाख खर्च केले, पण आईच्या प्रकृतीत फरक पडला नसल्याने तेजसने डिसेंबर २०२४ मध्ये पैसे परत मागितले. त्या वेळी आहात शेखने १९ लाख रुपये परत केले; मात्र उर्वरित रक्कम मागितल्यावर तेजससह त्याच्या कुटुंबाला करणी करून ठार मारू, अशी धमकी दिली होती. नेरूळ पोलिसांनी मौलाना मुस्तफा शेख ऊर्फ कांबळे, त्याचा मुलगा आहात शेख, मुलगी सफीना नानू शेख, जावई नानू शेख, वसीम शेख, वडील रफिक शेख यांच्याविरोधात फसवणूक तसेच अंधश्रद्धा निर्मूलन कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला आहे.

# निवडक



## नारायण सोनवणेंचा सन्मान

**माथेरान :** कर्जतमधील शेळके हॉल येथे रविवारी (दि.२८) प्राथमिक शिक्षक पेण प्राथमिक सहकारी पतपेढी जिल्हा रायगड यांची वार्षिक सभा पार पडली. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. कर्जतचे उपसभापती मनोहर थोरवेही यावेळी उपस्थित होते. यावेळी आदर्श शिक्षक, अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये नारायण सोनवणे (माथेरानकर), शिक्षण विस्तार अधिकारी पंचायत समिती, कर्जत यांचा शैक्षणिक कार्याच्या योगदानाबद्दल विशेष सन्मान मोहन पाटील, चेअरमन आणि मा. खैरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी पतपेढीच्या वार्षिक कामाचे सर्व उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले.



## चाईल्ड केअर संस्थेतर्फे नवदुर्गांचा सन्मान

**उरण :** चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगडतर्फे अनेक वर्ष विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्यातील दरवर्षी दिले जाणारे नवदुर्गा सम्मान हा एक उपक्रम संस्थेचे संस्थापक विकास कदू यांच्या नेतृत्वाखाली आयोजित केला जातो. तसेच या वर्षीही नवदुर्गा सन्मान रायगड २०२५ हा पुरस्कार रायगड जिल्हातील विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना देण्यात आले. यामध्ये कनिष्का नाईक (महिला पोलीस) टाकीगाव उरण, प्रा. अपूर्वा देसाई (योग शिक्षिका) महड रायगड, प्रतीक्षा सचिन चव्हाण (सामाजिक कार्य), शीतल शैलेश दर्णे (शालेय सेविका) केगांव उरण, करुणा ढोरे (समाजसेविका) पनवेल, हदया जाधव (गायिका) कळबूसरे उरण, सीमा मोरे (संपादिका, पत्रकार) पोलादपूर, निकिता पाटील (अभिनेत्री) बोकडवीरा उरण, डॉ.वनिता पाटील (वैद्यकीय) बोकडवीरा, उरण या महिलांना सन्मान चिन्ह, ट्रॉफी, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. तसेंच याप्रसंगी रायगडमध्ये वेगवेगळ्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा रायगड विशेष सन्मान पुरस्कार देऊन गुण गौरव करण्यात आले.



## आयुष्मान भारत, आभा कार्ड शिबीर

**माथेरान :** महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत व अधीक्षक कार्यालय माथेरान बी. जे. हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने इंदिरा गांधीनगर येथे आयुष्मान भारत कार्ड व आभा कार्ड नोंदणी शिबीर उत्साहात पार पडले. गेल्या महिन्या भरापासून माथेरानमध्ये या मोहिमेला सुरुवात झाली आहे. या शिबिराचे आयोजन करण्यासाठी अधीक्षक सुरेंद्र ठाकूर व डॉ. रूपाली मिसाळ यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तर समित्र ग्रुप माथेरान याचे मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक स्तरावर अनेक नागरिक हॉस्पिटल गावापासून जवळपास तीन किलोमीटर अंतरावर असल्याने अशा शिबिरांना उपस्थित राहू शकत नव्हते. या अडचणीची दखल घेऊन सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सुतार यांनी पुढाकार घेतला व आपल्या विभागातच शिबीर भरविण्याची विनंती केली. या मागणीला अधीक्षक ठाकूर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत इंदिरा गांधी नगर येथील श्री गणेश मंदिरात शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी नागरिकांची आवश्यक कागदपत्रे तपासून त्यांची नोंदणी करून देण्यात आली. आयुष्मान भारत व आभा कार्ड ही केंद्र व राज्य शासनाची महत्त्वाची योजना आहे. प्रत्येक पात्र कुटुंबाला मोफत आरोग्य सुविधा मिळाव्यात हा त्यामागील उद्देश आहे. या शिबिरामुळे इंदिरा गांधी नगर विभागातील अनेकांना योजनांचा लाभ मिळाला.



## तळा येथे विद्यार्थी संवाद कार्यशाळा

**तळा :** मुंबई विद्यापीठ अंतर्गत कार्यरत असणाऱ्या आमच्या द.ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने, शनिवारी (दि.२७) महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी 'आजचा युवक आणि आरोग्य' या विषयावर विद्यार्थी संवाद कार्यशाळा पार पडली. या कार्यशाळेसाठी साधनव्यक्ती म्हणून डॉ. प्रशांत लक्ष्मण गोडगे, वैद्यकीय अधिकारी, ग्रामीण रुग्णालय तळा हे लाभले होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सोनम पवार यांनी केले. पाहुण्यांचा परिचय व स्वागत आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. राजाराम महादेव थोरात यांनी केले.डॉ. प्रशांत गोडगे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना स्वच्छता, संतुलित व सकस आहार, नियमित व्यायाम, योग्य झोप, औषधांचे चांगले-वाईट परिणाम, सर्पदंश व विंचुदंश याविषयी महत्त्वपूर्ण मार्गदर्शन केले.

## रामचंद्र तेलंगे यांचे निधन



**नागोठणे :** नागोठण्याजवळील वांगणी (ता. रोहा) येथील रहिवासी रामचंद्र तुकाराम तेलंगे (९२) यांचे बुधवारी (दि.२४) त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. वांगणी गावचे माजी सरपंच लहू तेलंगे यांचे ते वडील होत. रामचंद्र तेलंगे यांच्या पार्थिवावर वांगणी येथील वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी तारामती, दोन विवाहित मुलगे लहू व दिगंबर, तीन विवाहित मुली जयश्री रटाटे, शुभांगी कदम, अंजना देवकर, सुना, जावई, नातवंडे यांच्यासह मोठा परिवार आहे. रामचंद्र तेलंगे यांचे दशक्रिया विधी शुक्रवार दि. ३ सप्टेंबर रोजी वांगणी येथील तलावाजवळ, तर उत्तरकार्य सोमवार दि. ६ सप्टेंबर रोजी त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याचे तेलंगे कुटुंबियांनी सांगितले. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

महेंद्र खैरे — नववी माळ

# चौलची पांडवकालीन हिंगुलजा देवी



चौलभोवाळे पर्वतवासी दत्त मंदिराचे नजिकच हिंगुलजा देवीचे मंदिर आहे. पुरातन व प्राचीन ऐतिहासीक मंदिरापैकी एक असलेले हिंगुलजा माता मंदिरा सभोवतालची कोरीव लेणी पहाण्याजोगे आहे. चौल-भोवाळे पासून फक्त अर्धा कि.मी. अंतरावरील छोटयाश्या डोंगरात स्थानापन्न आहे. एका सलग पाषाणात कोरलेल्या दगडी मंदिर प्राचीन वास्तुशास्त्राचा उकृष्ट नमुना आहे. डोंगरावर मंदिराचे शेजारी असलेले बारमाही पाण्याचे दोन हौद विशेषः मानले जातात, या हौदात दान केलेले धन काशिला पोहचते अशी आख्यायिका सांगितली जाते. सुमारे १५८ पाय-या चढून गेल्यावर डोगरांचे कुशीत वसलेले मंदिर व्दापारयुगातील पांडवकालीन हिंगुलजा मातेचे मंदिर वसलेले आहे. पांडवाचे दुतातील पराभवानंतर अज्ञातवासाच्या काळखंडात व्दापारयुगातील रेवतीनगर म्हणजेच चौल-रेवदंडा नगरीत ३६० मंदिरे व ३६० तलाव बांधण्याचा संकल्प करून प्रति काशी निर्मितीचे काम पांडवानी हाती घेतले होते. सहा महिने दिवस व रात्र काम करीत असताना पहाटे केंबड आरवू नये असा दंडक ठेवला होता. पहाटे देवीने कोंबडयाचे रूप घेतले, कोंबडा आरवला, त्यामुळे पांडवाना काम सोडून दयावे लागले. आणि त्या कोंबडयावर पांडवानी बाण सोडून जखमी केले, आणि तो बाण हिंगुलजा मातेच्या मंदिराचे मागील बाजूस चिन्हाने दाखविला जातो, हिंगुलजा माता पांडवाची बहिण आहे, अशी पौराणिक आख्यायिका आजही येथील जुनी मंडळी सांगतात असे हिंगुलजा मातेच्या मंदिरात तिन पिढयाची परंपरा असलेले गुरव संतोष काटकर यांनी माहिती दिली. भणसाळी लोकांचे आद्यदैवत हिंगुलजा देवी असल्याचे सांगितले जाते. पौष पौणिमेच्या यात्रेचे निमित्ताने भणसाळी लोक मुंबईहून यात्रेसाठी येतात, येथे राहण्यासाठी त्यांनी निवासस्थान उभारलेले आहे. या मंदिराचा भणसाळी समुहाचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून मंदिराचे सुशोभिकरण तसेच देखभाल केली जाते. सद्या मंदिराचे जिर्णोध्दार होऊन सुंदर असे मंदिर भणसाळी समुहाने ट्रस्टच्या माध्यमातून उभारलेले आहे.

या डोंगरकड्यांच्या आग्नेयेस पायथ्यापासून काही अंतरावर दरवाजा असलेले लहान बौध्द लेणी आहेत. बाहेर काही मीटर उंची रूंदीचे सज्जा असून शेड उभारण्यासाठी भोके आहेत. या लेण्यात कसलेही कोरीव काम नाही किंवा लेख नाही, या गृहेत लागूनच पश्चिमेस काही मिटर अंतरावर दुसरे लेणे आहे. समोरची बाजू तुटलेली असून व्हरांडा अरूंद आहे. दगड चांगला नसल्याने लेण्याचे काम अपुरे ठेवले असावे या दोन लेण्याप्रमाणे पश्चिम बाजूस तितक्याच उंचीवर पश्मिाभिमुख असलेल्या हिंगुलजा देवीच्या मंदिराकडे रस्ता जातो. मंदिरांकडे पायऱ्या चढत असताना पायरीच्या उजव्या बाजूस दगडात कोरलेले एक लेणे आढळते. त्यांच्या वायव्येकडील खोदलेल्या कोपऱ्यांत आशापुरी देवीचे स्थान आहे.

दक्षिणेकडील भिंतीत चौरसाकृती आकराच्या दोन खोल्या आहेत. पश्चिमेकडील समोरच्या भिंतीत खिडकी आहे. लेण्याच्या बाहेर उजव्या बाजूस ३० पायऱ्या चढून गेल्यावर दगडात खोदलेली पाण्याची दोन टाकी आहेत. पायऱ्यांच्या सुरूवातीजवळ थोडे उत्तरेस दरवाजाच्या आत हिंगुलजा देवीचे मंदिर असून त्यांच्या सभोवार अरूंद मार्ग आहे. समोरच्या मोकळया जागेवर अलिकडे सिमेंट क्रांकिटचा सभामंडप बांधला आहे. त्याच्या समोर खुल्या जागेवर तुलशी वृंदावन व दिपमाळा आहे. तेथून लांबवरचा सुंदर देखावा दिसतो. मंदिरापलिकडे जवळच ओळीने पाच लहान बौध्द लेणी असून एका लेण्यात अष्टभुजा देवीची मुर्ती आहे. सात क्रमांकाच्या लेण्याबाहेर स्तुपाचे उठाव शिल्प कोरलेले आहे. त्याच्या घडणीवरून स्तुप सन १५० मधील असावा, या या लेण्याच्या पलिकडे दरवाजातून पाऊन वाटेने पुढील टेकडीवरील दत्त मंदिराकडे जाण्याचा मार्ग आहे.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या

# निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी

### विविध पक्षांची साखर पेरणी सुरु, आरक्षण जाहीर न झाल्याने धाकधूक

। माणगाव । प्रतिनिधी ।

**रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीसाठी महायुती आणि महाविकास आघाडीतील सर्वच पक्षांनी मोर्चेबांधणीला सुरुवात केली आहे. या निवडणुका जानेवारी महिन्यात होणार असल्याने सर्व पक्षांच्या नेत्यांनी विविध सामाजिक उपक्रम, विकास कामे, शासकीय योजना, पारंपरिक सण, पक्षप्रवेश, सामाजिक माध्यमे आणि वैयक्तिक दांडगा जनसंपर्क साधत पक्ष संघटना मजबूत करण्यावर भर दिला आहे.**



पक्ष नेतृत्वाने एकाच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती मतदार संघातील अनेक कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे आदेश देऊन साखर पेरणी सुरू केली आहे. त्यामुळे काही जण गुडघ्याला बाशिंग बांधून तयार आहेत तर काही आरक्षणाच्या प्रतिक्षेत असून त्यांची धाकधूक वाढली आहे.

रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष पदासाठी सर्व साधारण या प्रवर्गासाठी आरक्षण जाहीर झाल्यानंतर इच्छुकांची संख्या वाढत आहे. मात्र जिल्हा परिषद सदस्य आणि पंचायत समिती सदस्य यांचे आरक्षण अद्याप जाहीर झालेले नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवारांची धाकधूक वाढली आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ डिसेंबरच्या आत घेण्याचा आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे निवडणुक आयोग आणि राज्य सरकार दोघेही कामाला लागले आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांची मतदार यादी अंतिम करण्याचे काम वेगाने सुरु असून २७ ऑक्टोबर रोजी अंतिम यादी प्रसिद्ध होणार आहे.

अद्याप सदस्यांचे आरक्षण जाहीर झालेले नाही. ग्रामपंचायतीसह जिल्हा परिषद व पंचायत समित्यांतील सदस्यांचे आरक्षण अद्याप जाहीर झाले नाही. त्यामुळे इच्छुक उमेदवार आरक्षणाची वाट पाहात आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका गेल्या साडेतीन वर्षांपासून रखडल्या आहेत. याबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मुद्यावर सर्वोच्च न्यायालयाने निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्या आदेशाच्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाने निवडणुका घेण्यासाठी प्रक्रिया सुरु केली आहे. २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.

जिल्हा परिषदेच्या निवडणुका डिसेंबरअखेर लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. पण सदस्यांच्या आरक्षणाचे काय हे अजूनही प्रश्नचिन्ह आहे. या महिन्याच्या अखेरीपर्यंत आरक्षण जाहीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यानंतर निवडणुकीचे चित्र लवकरच होणार स्पष्ट होणार आहे. सर्वोच्च न्यायालयात याबाबत सुनावणी झाली. त्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ डिसेंबरच्या आत घेण्याचे आदेश दिले. त्यामुळे निवडणुकांची तयारी सुरु केली आहे.

राजकीय नेते, कार्यकर्ते बुचकळ्यात पडले असले तरी सभा, बैठका घेऊन राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी सुरु केली आहे.

मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सदस्यांचे आरक्षण अद्याप जाहीर झाले नाही. मतदारसंघ निहाय आरक्षण निश्चित झाल्यानंतरच कार्यकर्त्यांना पुढील रणनीती आखता येणार आहे. इतक्या मोठ्या संख्येने आरक्षण जाहीर करणे सोपे नाही.

मात्र, निवडणुका झाल्याशिवाय गत्यंतर नाही. उमेदवारांसाठी इच्छुक उमेदवारांची तयारी सुरु आहे. मात्र, जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या सदस्यांचे आरक्षण अद्याप जाहीर झाले नाही. मतदारसंघ निहाय आरक्षण निश्चित झाल्यानंतरच कार्यकर्त्यांना पुढील रणनीती आखता येणार आहे.

# अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेतर्फे जागृती



। अलिबाग । प्रतिनिधी ।

जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधून, अलिबाग कृषी पर्यटन विकास संस्थेने पर्यटन आणि स्थानिक संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी एका भव्य पर्यटन रॅलीचे यशस्वी आयोजन केले. या रॅलीच्या माध्यमातून संस्थेने अलिबागच्या निसर्गरम भागाचे आणि कृषी पर्यटन स्थळांचे महत्त्व ठळकपणे मांडले.

मांडवा जेटी येथून रॅलीला प्रारंभ झाला. रॅलीचा मार्ग खास अशा पद्धतीने आखण्यात आला होता, ज्यामुळे सहभागी सदस्यांना आणि स्थानिक नागरिकांना परिसरातील नैसर्गिक तसेच कृषी-पर्यटन स्थळांचे विहंगम दर्शन घेता आले. मांडवा जेटीनंतर रॅली रहाटले, सासवणे, आवास, चोंढी, आणि किहिम या महत्त्वाच्या समुद्रकिनारी तसेच ग्रामीण भागातून मार्गस्थ झाली. या प्रत्येक टप्प्यावर कृषी पर्यटनाच्या संधी आणि स्थानिक उत्पादनांची माहिती देण्यात आली. वरसोलीमार्गे ही रॅली शेवटी अलिबाग बीच येथे समारोपासाठी पोहोचली. जिथे संस्थेच्या सदस्यांनी पर्यटन विकास आणि पर्यावरणाच्या संरक्षणाची शपथ घेतली.

या उपक्रमात संस्थेचे अध्यक्ष आमिष शिरगावकर, सुबोध राऊत, शितल कोळी, सुधीर पुरो, राजाराम पडवळ, देवदत्त जोगळेकर, विजय कदम, निमिष परब, शेखर पडवळ, चारुदत्त भोईर, चंद्रकांत भोईर, निनाद काठे, सुधाकर राणे, अल्हाद जाधव, आशिष शिरगावकर, नंदकुमार म्हात्रे, जयेश शिंदे, विलास पाटील, नितीन घरत, महेश पेढवी आदी सहभागी झाले होते.

## कर्जत स्थानकावर थांबा मिळावा

### खा. निकमांना निवेदन



। कर्जत । प्रतिनिधी ।

राष्ट्रपती नियुक्त राज्यसभा खा. उज्वल निकम हे इंद्रायणी एक्सप्रेसने पुण्यातून मुंबईला निघाले होते. तेव्हा त्यांची कर्जत स्टेशनला नितीन परमार यांनी भेट घेऊन त्यांना कर्जत रेल्वे स्थानकावर पुण्याहून येणाऱ्या गाड्यांना थांबा मिळावा याबाबत निवेदन दिले. यावेळी खा. निकम यांनी संसदेच्या अधिवेशनामध्ये या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची प्रत्यक्ष भेट घेऊन बरोबर चर्चा करून आपण दिलेले निवेदन त्यांच्याकडे सुपूर्द करुन योग्य ती कारवाई करण्याच्या संदर्भात त्यांना विनंती करेन असे सांगण्यात आले.

# चौलमळा गावची आई कृष्णादेवी



। चौल । प्रतिनिधी ।

कोकण म्हटलं, की समोर येतो तो इथला निळाशार समुद्रकिनारा, नारळी-पोफळीच्या मोठमोठाल्या बागा अन् त्याचबरोबर प्रसिद्ध असणारी देवी-देवतांची प्रसिद्ध मंदिरे. असेच एक अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथील प्रसिद्ध असे स्वयंभू कृष्णादेवीचे मंदिर. नवसाला पावणारी व भक्तांच्या हाकेला धावणारी देवी म्हणून ओळख असलेल्या कृष्णादेवीच्या नवरात्रोत्सवाला प्रारंभ झाला आहे. चौल पंचक्रोशीसह अनेक ठिकाणांहून भाविक आवर्जून देवीच्या दर्शनासाठी हजेरी लावतात.

चौलमळा येथील ग्रामदेवी कृष्णादेवीचे मंदिर आकर्षक असेच आहे. मंदिराच्या सभोवताली नारळी-पोफळीच्या झाडांची दाट वनराई असून, गर्द झाडीच्या कुशीत मंदिर वसले आहे. पूर्वीच्या कौलारु असणाऱ्या मंदिराचा २००० साली जीर्णोद्धार करुन आरसीसी पद्धतीचे, सुंदर नक्षीकाम केलेले मंदिर उभारण्यात आले आहे. यंदाच मंदराच्या जीर्णोद्धारास २५ वर्षे पूर्ण झाली असून, रौप्यमहोत्सवी वर्ष उत्साहात साजरे करण्यात आले. मंदिराच्या मध्यभागी संगमरवरी प्रभावळरुपी चौथरा तयार करुन त्यावर ग्रामदेवता कृष्णादेवीची मूर्ती प्रतिष्ठापित करण्यात आली असून, बापदेव आणि वाघबाप्पा हे दोन रक्षक तिच्या बाजूला आहेत. येथील प्रथेनुसार मंदिरातील मूर्तीच्या दैनंदिन पूजाअर्चेचा मान गावातील सर्व ग्रामस्थांना प्रत्येक दिवशी देण्यात येतो. देवीची दररोज सांजआरती होते. विविध सण-उत्सवांच्या निमित्ताने देवीची उपासना केली जाते. नवसाला पावणारी देवी असल्याने इथे नेहमीच भक्तांची गर्दी दिसून येते.

नवरात्रात येथे दिमाखदार उत्सव साजरा केला जातो. भाविकांची खण-नारळ, साडी-चोळीने देवीची ओटी भरण्यासाठी गर्दी उसळते. नऊ दिवस येथे कृष्णादेवी युवक मंडळाकडून वेगवेगळ्या कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. चौलमळा प्रासादिक भजन मंडळाकडून अध्यक्ष अल्पेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली देवीचा जागर करण्यात येत आहे. या मंडळाचे बुवा चंद्रकांत नवगावकर (थळ-चालमळा) असून, त्यांना मृदुंगमणी म्हणून अजय वाडकर (चौलमळा), प्रथमेश पाथरे कुरुळ आणि विकास पाटील (ढवर) साथ करीत आहेत.

नवरात्रोत्सवादरम्यान युवक मंडळाकडून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात येते. त्यात लहान मुलांसाठी विविध प्रकारचे फनी गेम्स, चित्रकला स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, संगीत खुर्ची, गीतगायन स्पर्धा, फॅन्सी गरबा, फॅन्सी ड्रेस स्पर्धा आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धा आयोजित करण्यामागे लहान मुलांसह तरुणाईच्या कलागुणांना वाव देणे, एवढाच उद्देश असतो. आणि, त्यासाठी चौलमळा युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व सभासद मेहनत घेतात. नऊ दिवस विनातक्रार आपापली नोकरी-धंदा सांभाळून ही सर्व मंडळी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी झटत असतात. ग्रामस्थ आणि महिला मंडळाचीही त्यांना तेवढीच साथ लाभत आहे.

नवरात्रात नऊ दिवस सकाळी आठ वाजल्यापासून दर्शन व देवीच्या वाडी भरण्याचा कार्यक्रम सुरु होतो. वाडी भरणे म्हणजे देवीला फुलांनी सजविणे. देवीला नऊ दिवस सजविण्याचे काम अनिता नाईक, ज्योती लोहार, अस्मिता पाटील, निलांबरी नाईक, निलेशा मुकादम आदी महिला हौशीने करतात. विजयादशमीच्या (दसरा) दिवशी ढ्सोने लुटणेफहा सोहळा उत्साहात साजरा केला जातो. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने मंदिरात हजर असतात. त्यानंतर रात्री नऊ दिवस आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या स्पर्धकांचा बक्षीस समारंभ पार पडतो. नवरात्र उत्सव यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी चौलमळा गावचे प्रमुख रवींद्र घरत, उपप्रमुख जितेंद्र पाटील, युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक, उपाध्यक्ष तथा भजन मंडळ अध्यक्ष अल्पेश म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य सहकारी मेहनत घेत आहेत.

# कोदिवलेत घर उद्ध्वस्त



। नेरळ । वार्ताहर ।


कर्जत तालुक्यात मुसळधार पावसाने शेतकरी आणि सर्वसामान्यांचे जीवन विस्कळीत झाले असून शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असताना नेरळ जवळील कोदिवले येथील शेतकरी अमर मिसळ यांचे मध्यरात्री घर कोसळल्याची घटना घडली असून त्यांचें मोठे नुकसान झाले आहे.

सततधार पावसामुळे घराला मोठे तडे गेले होते. घराच्याकडेला असलेली जमीन धसल्याने घराचा किचन भाग मुख्य घरापासून वेगळा झाला आणि तो कोसळण्याच्या स्थितीत होता. मध्यरात्री भिंतीचा मोठा आवाज झाल्याने घरातील मंडळी जागी झाली. नागरिकांच्या वेळीच सतर्कतेमुळे घरातील वस्तू बाहेर काढण्यात आल्या, त्यामुळे मोठा अनर्थ टळला शिवाय सामानाची हानी होण्यापासून रोखण्यात आली.

मात्र, या घटनेनंतर शेतकरी मिसाळ कुटुंबाचे घर मोठ्या प्रमाणात उद्ध्वस्त झाले आहे. अगोदरच तालुक्यात भात पिकांचे मोठे नुकसान झाले आहे.त्यातच अमर मिसळ यांच्यावर घर कोसळल्याने संकटाचा डोंगर कोसळला आहे. स्थानिक ग्रामस्थांनी प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांचे शेतीचे झालेले नुकसान आणि मिसळ कुटुंबाला आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी केली आहे.



●नवरात्रीनिमित्त राजिप शाळा गोंधळपाडा येथील विद्यार्थ्यांनी कचरारुपी राक्षसाचा शेवट करुन स्वच्छता पंधरवडानिमित्त लोकांना संदेश देण्यात आला.



●बोर्लीपंचतन येथे सार्वजनिक दुर्गादेवी उत्सव मंडळ कुंभार आळी तसेच बोर्लीपंचतन खालची आळी येथे सिंहावर राक्षसाचा वध करताना देवीचे मनमोहक रूप.



●उरण येथील सार्वजनिक श्री दुर्गा.


कलासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

● १५०० स्के. फुटाची व्यावसायिक जागा भाड्याने देणे आहे. (दवाखाना, ऑफिस, बँक यांना प्राधान्य) संपर्क : ९२८४५५५३७४, संपर्काची वेळ : दुपारी ४ ते रात्री ९

● विज्ञान विषय शिक्षक पाहिजेत. आपण इयत्ता आठवी नववीचे सायन्स शिकवू शकता का? उत्तर होय असल्यास त्वरीत आपला अर्ज सादर करा. shikshaknokri@gmail.com

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## नवरात्रोत्सव २०२५ रंगशक्ती



● आरडीसीसी बँक, वडखळ.



● मोहोपाडा येथील आदित्य लॅबच्या महिला कर्मचारी.



● सीकेटी विद्यालय इंग्रजी माध्यम प्राथमिक विभाग, नवीन पनवेल.



● जय मल्हार ग्रुप, शहाबाज



● राजिप बांधकाम विभागमधील महिला वर्ग.

## परिशिष्ट-१४

## अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (मराठी)

## अधिसूचना

## महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५

क्रमांक कनप/निवडणूक/ कर्जत सार्व.निव./अंतिम प्रभाग रचना/ १८७०/२०२५. दिनांक २६/०९/२०२५. विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कडील आदेश - नपप्र/कार्या २/ स्था.स्व.सं. /निवडणूक २०२५ /१९६७ दिनांक २५/०९/२०२५ महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम, (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०) (यापुढे सदर अधिनियम म्हणून उल्लेखिलेला) चे कलम ९, १० व ३४१ ब अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्रारुप अधिसूचना क्रमांक नपाप्र/कार्या-२/स्था.स्व.स. निवडणूक २०२५/१७७०, दि. १८ ऑगस्ट, २०२५ च्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे कर्जत नगरपरिषद क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती निश्चित केल्या संदर्भात प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांचा काळजी पूर्वक विचार करुन राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, खालीलप्रमाणे अधिसूचित करीत आहेत :-

२. ज्याअर्थी, राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, यांनी राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र नगरपरिषद/नगरपंचायत अधिनियमांच्या कलम ९, १० व ३४१ ब च्या तरतूदी खाली कर्जत नगरपरिषदेच्या बाबतीत निवडावयाच्या सदस्यांची संख्या व प्रभागांची संख्या पुढील प्रमाणे निश्चित केली आहे.

१. एकूण सदस्यांची संख्या .. .. .. २१
२. दोन सदस्यीय प्रभागांची संख्या .. .. ०९
३. तीन सदस्यीय प्रभागांची संख्या .. .. ०१
४. एकूण प्रभागांची संख्या .. .. .. १०

३. त्याअर्थी, आता राज्य शासन अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी, हे राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र किंवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी यांच्या मान्यतेने, महाराष्ट्र नगरपरिषद /नगरपंचायत अधिनियमाचे कलम ९ १० व ३४१ ब अन्वये उक्त नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्र जितक्या प्रभागात विभागण्यात येईल त्या प्रभागांची संख्या व त्यांची व्याप्ती या अधिसूचनेच्या अनुसूचीमध्ये दर्शविल्याप्रमाणे निश्चित करीत आहे.

४. या अधिसूचनेच्या तारखेच्या निकटच्या पुढील सार्वत्रिक निवडणूकीच्या प्रयोजनार्थ ही अधिसूचना अंमलात येईल.

### अनुसूची

| प्रभाग क्रमांक व लोकसंख्या | प्रभागाचे नाव, असल्यास | प्रभागाची व्याप्ती | निवडून द्यावयाची सदस्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १<br>लोकसंख्या<br>एकूण -२८२९<br>अ.जा.-३२२<br>अ.ज.-२७३ | | व्याप्ती :- नानामास्तर नगर भाग, किर्ती साम्यक अपार्टमेंट, गोपाळ को.ऑप, सोणावने, दिना वैद्य, आचार्य इत्यादी घरे इमारती, वैनतेय, गरुड नानामास्तर नगर, गायत्री कृपा, इत्यादी घरे इमारती, गुरुनगर मुद्रे खुर्द, गुलमोहोर रेस्ट हाऊस इत्यादी घरे इमारती, मुद्रे गाव भाग, स्वप्न नगरी, पटेल, मुळे इत्यादी घरे इमारती.<br>उत्तर :- नगरपरिषद हद्द.<br>पूर्व :- उल्हास नदी किनाऱ्याने गुलमोहर रेस्ट हाऊस व मुद्रे स्मशान भुमी पर्यंत.<br>दक्षिण :- मुद्रे स्मशान भुमी पासून हायवे रस्त्याने सार्थक लॉज रस्त्याने विकास योजना रस्ता.<br>पश्चिम :- डि.पी. रोड व पुढे मुरबाड रोड ओलांडून मारुती मंदिर कडे जाणारा रस्ता. | २ |
| २<br>लोकसंख्या<br>एकूण - २७०१<br>अ.जा.- २६९<br>अ.ज.- १५९ | | व्याप्ती :- हायड्रोकॉलनी, सहकारनगर, सेवालालनगर, जुना तारी बंगला, कृषी उत्पादन, बाजारसमिती ,पेट्रोलपंप, यशदा मंगल कार्यालय, नगरपरिषद जलशुध्दीकरण केंद्र, संजय नगरचा भाग, गिरिवन नंदनवन, श्रीराम इबसार कॉलेज, वाघ, शेडगे, इत्यादी घरे व साईनगर, शिवाजीनगर, बदरीनाथ, आवळा सुपारी, मेघनाथ वैद्य, साळवी, बेडेकर पिकल्स, डोंबे हायस्कूल इत्यादी इमारती व घरे, समर्थनगर, सुयोगनगर, पुष्पराज, माधव कुंज, अहूजा, निलधे, दळवी, खानविलकर, बच्चूशेठ राईस मिल व त्या लगतचा भाग इत्यादी घरे व बिल्डींग.<br>उत्तर :- नगरपरिषद सिमा.<br>पूर्व :- नगरपरिषद सिमा.<br>दक्षिण :- न.प. सिमे पासुन नाल्याने वेणगाव रस्त्याचे पुलापर्यंत तेथुन मुख्य रस्त्याने उल्हास नदी पर्यंत.<br>पश्चिम :- उल्हास नदी. | २ |
| ३<br>लोकसंख्या<br>एकूण - २६२०<br>अ.जा.- २११<br>अ.ज.- ११७ | | व्याप्ती :- मुद्रे बुद्रुक, रेव्हून्यु कॉलनी, सम्यक बिल्डींग, हरीद्वार, शिवोम इत्यादी घरे इमारती, नानामास्तर नगरचा भाग, अंबर, आवास, प्रार्थना, वसंत, चिंतामणी, गायत्री दर्शन, गायत्री कृपा, गणेश मंदिर इत्यादी घरे इमारती, जूने परब नाट्यगृह परिसर, आर्किटेक्ट हरपुडे, मराठा मंडळ संस्था, चंद्रोदय, ओमचंद्रोदय, मित्तल, वृंदावन, सुमित, दर्पन, शिशु मंदिर शाळा इत्यादी इमारती व घरे.<br>उत्तर :- नगरपरिषद हद्दीने मुद्रे मारुती मंदिर रोड ते हायवेपर्यंत, पुढे नानामास्तर मधून जाणारा डि.पी. रोडने सार्थक लॉज समोरील रस्त्याने मुरबाड हायवे रस्त्या पर्यंत.<br>पूर्व :- मुरबाड रस्ता<br>दक्षिण :- विशाल अपार्टमेंट जवळील रस्त्याने सुमित अपार्टमेंट कडे जाणारा रस्ता. तेथुन सुमित अपार्टमेंट मागील म्हाडाचे सिमेने दर्पनचे मागून शिशु मंदिर शाळेसह मुख्य रस्त्याला येऊन मुख्य रस्त्याने ओम चंद्रोदय पासुन कृषी संशोधन केंद्रा पर्यत, पुढे शेतकी फार्मचा दक्षिण कंपाऊडने कचेरी कडे जाणारा रस्ता.<br>पश्चिम :- तहसिलकडे जाणारा रस्ता व रेल्वे लाईन | २ |
| ४<br>लोकसंख्या<br>एकूण -२८५९<br>अ.जा.- ४६९<br>अ.ज.- ६१ | | व्याप्ती -आनंद नगर, सप्तपदी, हिल व्हू, ऋषिकेश, तहसिल ऑफिस, पि.डब्लू.डी. ऑफिस, वझे, शिवाजी पुतळा, इत्यादी इमारती व घरे, गोकूळ, मधुमालती, वैद्य राईस मिल सॉ मिल, बौध्द नगर, यशोदत्त, वैद्य बंगला, नंददिप आर्चिस, महात्मा फुले, डाभिया, लक्ष्मी व्हिला, पालशेतकर, सुतार, ठोसर, इत्यादी इमारती व घरे, करमरकर, पाटकर, मनोरे, जाधव, आपटे, जूने आयंगार, जूने दोंदे, सावळी, परिमल, चंदन यांनी बांधलेल्या काही इमारती इत्यादी इमारती घरे, बाम बिल्डींग, अजगरअली, गांगल, दुर्वांकूर, विनायकी, मयूर, डॉ. तिटकरे हॉस्पीटल इत्यादी इमारती घरे, जिल्हा परिषद शाळा क्रमांक १, पोलिस लाईन जुना पाध्ये वाडा इत्यादी घरे व इमारती ,खाटीक आळी भाग, चंदन, मामा शेलार, पोस्ट ऑफिस, आईस फॅक्टरी, अनुसया, विनायकी बोहरी मस्जीद इत्यादी इमारती व घरे,<br>उत्तर :- टेकडी भाग व जी.प. रेस्ट हाऊसकडे जाणारा रस्ता, कृषीकेंद्र कंपाऊड,<br>पूर्व :- विठ्ठलनगर अंतर्गत रस्ता, जाधव सर ते पाटकर पुढे भाऊसाहेब राऊत चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक.<br>दक्षिण :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोस्ट ऑफिस<br>पश्चिम :- खाटीक आळी रस्त्याने पाटील आळीतून रेल्वे गेट ते रेल्वे लाईन ने नगरपरिषद हद्दीपर्यंत. | २ |
| ५<br>लोकसंख्या<br>एकूण - २६८६<br>अ.जा.- ३३३<br>अ.ज.- ३०६ | | व्याप्ती :- भिसेगांवचा भाग, कातकरवाडी, कृषी केंद्र कॉर्टर्स, पॉवर हाऊस इत्यादी परिसरातील घरे इमारती, कृषी संशोधन केंद्र कार्यालय, रेल्वे कॉटर्स, क्रांती नगर झोपडपट्टी, अंबेभवानी मंदीर इत्यादी इमारती व घरे, मराठी शाळा, भिसेगांवचा भाग, औदुंबर सोसायटी, बारटक्के, देवळे, एस.टी. स्टँड इत्यादी घरे व इमारती .<br>उत्तर :- सि.स.न. ५४ चे पश्चिम टोकापासुन न.प. हद्दीने भिसेगांव स.नं. ४ मधील हायवे पासून न.प. हद्दीने रेल्वे लाईन पर्यंत<br>पूर्व :- रेल्वे लाईन<br>दक्षिण :- रेल्वे लाईन पूढे चर्चचे पूर्व कंम्पाऊडने यांचे घरावरुन नंतर बॉम्बे कॉलनी रस्त्याने भिसेगांव कडे जाणारा मुख्य रस्ता पर्यंत तेथून आंबा माता मंदिर रस्त्या पर्यत, पुढे जि.प.प्राथमिक शाळा मागील टेकडी पायथ्याने एस.टी. स्टँड पर्यत भिसेगांव गुडगे रस्त्यापासुन एस. टी. डेपोचे दक्षिणे कडील कंपाऊडने पुढे विकास योजनेतील रस्त्यापर्यं,<br>पश्चिम :- नगरपरिषदेची पश्चिम सिमा | २ |
| ६<br>लोकसंख्या<br>एकूण - २८६२<br>अ.जा.- १४४<br>अ.ज.- ८१ | | व्याप्ती :- पाटील आळी भाग, दत्त मंदीर, कपालेश्वर, प्रथमेश, कदम वाडा, पुरे, मेढी, जोगळेकर वाडा, इत्यादी इमारती व घरे, मयुरा हॉटेल, मटन मच्छी मार्केट इत्यादी घरे व इमारती, व नगरपरिषद कार्यालय, जूने पंचायत समिती कार्यालय, धर्मराज, महावीर पेठ भाग, कपालेश्वर मंदीर, भाविक, जुना डावरे डॉक्टर दवाखाना, इद्रुस, वैद्य फर्निचर, चाचड, जैन मंदिर, लक्ष्मीनारायण मंदीर, स्टेट बँक ऑफ इंडिया, दिवाडकर रेल्वे कॉटर्स, युको बँक दगडे आळी, डागा बिल्डिंग, आंबवणे गुजर वाडा, मुसळे बिल्डींग, करोडे, कपिला, मारुती मंदीर, धापाया मंदीर, इत्यादी परिसर रेल्वे स्टेशन इत्यादी.<br>उत्तर :- जुना रेल्वे गेट, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ते दत्त मंदीर लगतच्या रस्त्याने मारुती मंदीर ते खाटीक आळी बाजारपेठ कडे जाणारा रस्ता. तेथुन पुढे कपालेश्वर मंदिर पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक. पूर्व :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते जुना छत्री केंद्र रस्त्याने उल्हास नदीपर्यंत<br>दक्षिण :- झवेरचंद प्रतापचंद यांचे घरा मागील नदी किनाऱ्याने शनि मंदिरा जवळुन गुंडगे स.न. २३ नदि किनाऱ्या पर्यंत.<br>पश्चिम -स.नं. २३ जवळील रेल्वेलाईनने रेल्वेस्टेशन व रेल्वे लाईन ते जूना रेल्वे गेट पर्यंत | २ |
| ७<br>लोकसंख्या<br>एकूण - २९५०<br>अ.जा.- १४३<br>अ.ज.- ९५ | | व्याप्ती :- विल नगर भाग, अभिनव ज्ञान मंदिर शाळा, दिवाणी न्यायालय, कन्याशाळा, इत्यादी इमारती घरे, जुनी ओटरमल चाळ, जुना दिशा केंद्र, द्वारका अपार्ट, शासकीय वसाहती, पोलिस लाईन, पोलिस स्टेशन, शासकीय रुग्णालय, अमिरा को.ऑप, विद्या विकास मंदिर शाळा, सर मुकादम, टेलिफोन एक्सचेंज, इत्यादी इमारती व घरे, म्हाडा ले आऊट व खुली जागा, विशाल अपार्टमेंट, फडके हॉस्पिटल, डॉ. गायकवाड हॉस्पिटल, शितोळे चाळ, इत्यादी घरे इमारती, आमराई छोट्या पुलाजवळील झोपडपट्टी, शिवसृष्टी, ठक्कर प्रॉपर्टी, भुसारी बिल्डींग, बहार, सुशिला, प्रेमसिंधू, डॉ. डावरे, कर्जत स्मशान भुमी इत्यादी घरे इमारती, भगवान टॉकिज, उगले बिल्डींग, लक्ष्मीकांत वाचनालय, हर्ता अपा. इत्यादी घरे व इमारती.<br>उत्तर - शेतकी फार्म नाला.<br>पूर्व :- कडू चाळ रस्त्याने हायस्कूल रस्ता व तेथून शिशु मंदिरचे पश्चिमेकडून नाला ओलांडून दर्पन, सुमित चे पाठी मागुन म्हाडा ले आऊटने जुना देवघरे घर ते विशाल अपार्टमेंट रस्त्याने उल्हासनदी किना-याने पायपुला पर्यंत.<br>दक्षिण :- पायपुल ते अलंकार टॉकीज रोडने सिध्दीक मंजिल रोडपर्यत तेथुन अलंकार टॉकीज रस्ता ओलंडून शिध्दीक मंजिल समोरील रस्त्याने कर्जत कशेळे रस्ता ने जूने छत्री केंद्र.<br>पश्चिम :- छत्री केंद्र ते डॉ. आंबेडकर चौकातून भाऊसाहेब राऊत चौका मधून साळोखे यांचे घरावरून सत्यम अपार्टमेंट पर्यतचा विठ्ठल नगर अंतर्गत रस्ता | २ |
| ८<br>लोकसंख्या<br>एकूण - ३०७२<br>अ.जा.- ४०४<br>अ.ज.- ४५ | | व्याप्ती :- ब्राम्हण आळी भाग, कोकण आळी भाग, श्री गणेश, लक्ष्मी नारायण इत्यादी इमारती व घरे, सोनार आळी व दहिवली पाटील आळी व शिवाजी नगर भाग, इत्यादी परिसरातील इमारती व घरे. बौध्द नगर, गुरव आळी, इत्यादी परिसरातील इमारती व घरे. विठ्ठल मंदिर, मारुती मंदिर, महालक्ष्मी मंदिर, कलावती आई मंदिर, इंदिरा नगर भाग, ब्राम्हण आळी, इत्यादी परिसरातील इमारती व घरे.<br>उत्तर - वेणगाव रस्त्याने पुढे नाल्याने नगरपरिषद सिमे पर्यंत.<br>पूर्व :- नगरपरिषद हद्द.<br>दक्षिण :- सर्व्हे नंबर २९ ची हद्दीने विकास योजना रस्त्याने.<br>पश्चिम :- सर्व्हे नंबर २९ ची हद्दीने विकास योजना रस्त्याने श्री. खराडे यांचे घरावरून इंदीरानगर रस्त्याने वाळकू घरत यांचे दुकान व पुढे कोंदीवडे रस्त्याने विठ्ठल मंदिर चौक तेथून आर्कीटेक्ट मेढी यांचे घरावरुन जय गणेश अपार्टमेंट पर्यत गल्ली रस्ता. | २ |
| ९<br>लोकसंख्या<br>एकूण - २९५७<br>अ.जा.- २०६<br>अ.ज.- ५८ | | व्याप्ती :- गोठनी, इंदिरा नगर भाग, गणपती मंदिर, सुर्वे प्रॉपटी, सिध्दीक मंजिल, हॅपी होम, भगत चाळ, पुर्वा अपार्टमेंट, ओमकार, यश प्लाझा, खुले नाट्यगृह, इंग्लिश मिडीयम स्कूल इत्यादी इमारती व घरे, इंग्लिश मिडीयम समोरील आमराई झोपडपट्टी, विठाई दर्शन, मल्हार, दतात्रेय, आयोध्या, गायकर इत्यादी इमारती व घरे, इंदिरा नगर भाग, आकुर्ले गाव, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व बामचा मळा.<br>उत्तर :- जुना अलंकार टॉकीज रस्ता व पुढे पाय पुलावरुन दहिवली जुने ग्रामपंचायत कार्यालय वेणगांव कडे जाणारा रस्ता.<br>पूर्व :- वेणगाव रस्त्याने कदम यांचे घरा जवळून विल मंदिर चौकात येणारी गल्ली पुढे शंकर मंदिरा वरुन कोंदिवडे रस्त्याने इंदीरा नगर मधील रस्त्याने पुढे खराडे यांचे घराचे पश्चिम बाजूने पुढे डि. पी. रस्त्याने पुढील सर्व्हे नंबर ३८ चे सिमेने, सर्व्हे नंबर २९ ते सर्व्हे नंबर १२ चे सिमेने नगरपरिषद हद्दी पर्यंत.<br>दक्षिण :- नगरपरिषदेची सिमा<br>पश्चिम :- उल्हास नदी व सिध्दीक मंजील लगतचा पश्चिम रस्ता | २ |
| १०<br>लोकसंख्या<br>एकूण - ४१२७<br>अ.जा.-११९२<br>अ.ज.- २२३ | | व्याप्ती :- फॉरेस्ट ऑफिस, रायगड अपा. पत्की, प्रधान, दगडेवाडा, नजबुदिन चाळ, इत्यादी घरे व इमारती व चर्च, कावसजी शेठ चाळ, राज लक्ष्मी, फातीमा नगर झोपडपट्टी मालधक्का, पंचशिल नगर, देशमुख लालधारी प्रॉपर्टी, जुने एस.टी.स्टॅन्ड, रेल्वे कॉटर्स भाग, दगडे हॉटेल, गुंडगे गाव. राणे चाळ, संत रोहिदास नगर, सिकंदर चाळ, गुडशेफर्ड शाळा, इत्यादी इमारती व घरे. गुंडगे गाव, समाज मंदीर, जिल्हापरिषद प्राथमिक शाळा. वन निवास, डुबरी, रेल्वे कॉटर्स, सोमजाई मंदीर, विश्वनगर, पाणी टाकी, ठाकुर वाडी.<br>उत्तर :- कर्जत स.न. १८ अ चे टेकडी वरील न. प. हद्दीपासून एस.टी.डेपोचे दक्षिण कडील कंपाऊंडने भिसेगांव गुंडगे रस्त्या पर्यंत. तेथून पुढे टेकडी पायथ्याने भिसेगांव मराठी शाळेच्या पाठी मागून मुख्य रस्त्यापर्यंत तेथून भिसेगांव जि.प.शाळा पाठी मागील टेकडी पासून भिसेगांव रेल्वे स्टेशन रस्त्याने बॉम्बे कॉलनी अंतर्गत रस्ता व पुढे चर्च पुर्वेकडील सिमेने पुढे रेल्वे लाईनपर्यत.<br>पूर्व :- रेल्वे लाईन व जुना एसटी स्टँड जवळील रेल्वे लाईनपासुन पुढे गुंडगे सर्व्हे नं.२३ ने उल्हास नदी किनाऱ्याने नगरपरिषद हद्दीपर्यंत<br>दक्षिण :- नगरपरिषद हद्द<br>पश्चिम :- नगरपरिषद हद्द | ३ |

टीप :- १) मराठी व इंग्रजी अधिसूचने मध्ये प्रभागाच्या वर्णना ध्ये तफावत असल्यास नकाशामधील हद्दी नुसार वर्णन ग्राह्य धरण्यात येईल.
२) नगरपरिषद/नगर पंचायतीच्या क्षेत्राच्या प्रभागांच्या सीमा दर्शविणारे नकाशे कार्यालयीन वेळेत पाहण्यासाठी नगरपरिषद/ नगरपंचायत कार्यालयात उपलब्ध राहतील.

ठिकाण : कर्जत
दिनांक : २६/०९/२०२५

**(तानाजी चव्हाण)**
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत, जि. रायगड**

## परिशिष्ट-१५

## अंतिम प्रभाग रचनेच्या अधिसूचनेचा नमुना (इंग्रजी)

### NOTIFICATION

Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965

No. knp/nivadanuk/karjat sarv. Nivadnuk/antim prabhag rachana/1870/ date 26/09/2025—Vibhagiya Ayukt ,kokan vibhag No. Napapra /karya-2/stha. swa.sa.Nivadnuk 2025/1967 date 25/09/2025 In exercise of the powers conferred by section 9, 10 & 341 B of The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, (Mah. Act No. XL of 1965) (hereinafter referred to as the "said Act") after carefully taking into consideration the objection & suggestion received, in response to the Draft Notification No. Napapra/Karya-2/Stha.Swa.Sa.nivadanuk 2025/1770, Date. 18 August, 2025 Fixing for the Karjat Municipal Council, Nagar Panchayat. The number and the extent of the dated fixing for the wards into which the said municipal area shall be divided is shown in the schedule to said Draft Notification. The State Government or its authorised officer, with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, hereby makes the following Notification.

2. Whereas the State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer, as specified for Karjat Municipal Council under section 9&10 of the The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965 the Number of Councilors to be elected and number of wards is as follows :-

1. Total number of councillors .. .. 21
2. Two councillors wards .. .. .. 09
3. Three councillors wards. .. .. .. 01
4. Total wards .. .. .. .. 10

3. Now, therefore, in exercise of the powers under section 9, 10&341 B of the The Maharashtra Municipal Council, Nagar Panchayat and Industrial Township Act, 1965. The State Government or its authorised officer with the Approval of the State Election Commission, Maharashtra or its authorised officer hereby fix the number and extent of the wards into which the said Municipal Council, Nagar Panchayat area shall be divided as shown in the schedule to this Notification.
4. This Notification shall take effect for the purpose of the next general election held immediately following the date of this Notification.

### SCHEDULE

| Ward No. Population | Name of the ward, if any | Extent of the Ward | Number of Councillors to be elected |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1.<br>Population<br>Total- 2829<br>SC.- 322<br>ST- 273 | | Location :- Nanamaster Nagar Part, KirtiSamyak Apartment, Gopal Co. Op, Sonavane, Dina Vaidya, Acharya etc. house buildings, Vaintey, GarudNanamaster Nagar, GayatriKripa, etc. house buildings, Gurunagar Mudre Khurdgaon, Gulmohor Rest House etc. house buildings, Swapna Nagari, Patel, Mule etc. house buildings.<br>North :- Municipal Council limits<br>East -Along the banks of the Ulhas River up to Gulmohar Rest House and Mudre Cemetery<br>South :- From Mudre Cemetery, highway road to Sarthak Lodge Road, to development plan road.<br>West :- D.P. Road and further on the road leading to MarutiMandir, crossing Murbad Road | 2 |
| 2.<br>Population<br>Total- 2701<br>SC.- 269<br>ST- 159 | | Location :- Hydro Colony, Sahakar Nagar, Sewalal Nagar, JunaTari Bangla, KrishiUptadan Bazar Samiti, Petrol Pump Yashada Mangal Office, Municipal Council Water Purification Center, etc. Houses and buildings, Sanjay Nagar, Girivan Nandanvan, ShriramInsar College, Wagh, Shedge, Sanjay Nagar part, Girivan Nandanvan, Biram, Insar, College Bagh, Roadge etc. and beyond,, Sainagar Purna, Shivaji Nagar part, Badrinath, Bavlasupari, MeghnathVaidya, Salvi, Bedekar Pickles, Dombe High School etc. Houses and buildings,, Samarth Nagar, Suyog Nagar, Pushparaj, MadhayKunj, Ahuja, Nilve, DalviKhanvilkar, BachchuSheth Rice Mill and its adjacent parts etc. Houses and buildings.<br>North :- Municipal council limits<br>East :- Municipal council limits<br>South :- From KNP Area Nallah up to Vengaon Road Bridge and from there along the main road up to Ulhas River<br>West :- Ulhas River | 2 |
| 3.<br>Population<br>Total- 2620<br>SC.- 211<br>ST- 117 | | Location :- MudreBudruk , Revenue Colony, Samyak Building, Haridwar, Shivom etc houses and buildings, part of Nanamaster Nagar, Amber, Awas, Prarthana, Vasant, Chintamani, GayatriDarshan, GayatriKripa, Ganesh Mandir etc.houses and buildings. Old ParabNatyaGriha premises, Architect Harpoda, Maratha MandalSanstha, Chandrodaya, Om Chandrodaya, Mittal, Vrindavan, Sumit, Darpan, SisuMandir School etc. buildings and houses.<br>North :- From MudreMarutiMandir Road to the highway along the municipal limits, then along D. P. Road passing through Nanamaster, along the road in front of Sarthak Lodge up to Murbad Highway Road<br>East :- Murbad road<br>South :- Take the road leading to Sumit Apartment from the road near Vishal Apartment, pass the border of MHADA behind Sumit Apartment, pass the main road with HinshuMandir School, take the main road from Om Chandrodaya to the Agricultural Improvement Center, then take the road leading to the courthouse from the southern compound of the agricultural farm.<br>West -Road and railway line leading to the tehsil | 2 |
| 4.<br>Population<br>Total- 2859<br>SC.- 469<br>ST- 61 | | Location :- Anand Nagar, Saptapadi, Hill View, Rushikesh, Tehsil Office, P.W.D. Office, and Vaze, ShivajiStatue, etc. buildings and houses, Gokul, Madhumalati, VaidyaRicemill Sawmill, Boudh Nagar , Yashodatt, Vaidya Bungalow, NanddeepArchit, Mahatma Phule, Dabhiya, Laxmi Villa, Palsetkar, Sutar, Thosar, etc. buildings and houses, Karmarkar, Patkar, Manore, Jadhav, Apte, June Ayangar, June Donde, Savali, Parimal, some buildings built by Chandan, etc. buildings, Bam Building, Ajgarali, Gangal, Durvankur, Vinayaki, Mayur, Dr.Titkare Hospital, etc. buildings and houses, ZillaParishad School No.1, Police Line, Old Padhe Wada etc. buildings and houses, KhatikaliBhag, Chandan, Mama Shelar, Post Office, Ice Factory Anusaya, VinayakiBohri Masjid etc. buildings and houses.<br>North :- Hilly area and road leading to G.P. Rest House, Krishi Kendra Compound<br>East :- Vitthalnagar internal road, Jadhav Sir to Patkar then BhausahebRautChowk to Dr.BabasahebAmbedkarChowk<br>South -Dr.BabasahebAmbedkarChowk to Post Office<br>West :- Khatikali road from Patil Ali to Railway Gate by railway line to Nagarparishad Area | 2 |
| 5.<br>Population<br>Total- 2686<br>SC.- 333<br>ST- 306 | | Location :- Part of Bhisegaon, Katkarwadi, Agricultural Center, quarters, Power House etc., buildings and other buildings in the area, Agricultural Research Center Office, Railway quaters, Kranti Nagar Slum, AmbebhawaniMandir etc., Marathi School, Part of Bhisegaon, Audumbar Society, Bartakke, Devale, S.T. Stand etc .<br>North- S.N. 54 from the west end of the N.P. Area Bhisegaon S.N. 4 from Highway in the middle of N.P. to the railway line in the heart<br>East :- Railway Line<br>South :- Railway line, from the eastern compound of the church, from his house, then Bombay Colony Road to the main road leading to bisegaon, from there to Amba Mata Mandir Road, then at the foot of the hill behind the Z.P. Primary School, S. T. Stand, till bhisegaon, Gundge Road, S. T. Depot, south side of the compound, then to the road in the development scheme,<br>West :- Western boundary of Municipal Council | 2 |
| 6.<br>Population<br>Total- 2862<br>SC.- 144<br>ST- 81<br>. | | Location :- PatilaliBhag, DattaMandir, Kapaleshwar, Prathamesh, Kadamwada, Pure, Medi, Joglekar Wada, etc. Buildings and grounds. Mayura Hotel, Mutton Fish Market, etc. Houses and buildings.<br>Municipal Council Office, Old PanchayatSamiti Office, Dharmaraj, MahavirPethPart. Kapaleshwar Temple, Bhavik, Old Davare Doctor's Hospital, Idrus, Vaidya Furniture, Chachad, Jain Temple, Laxminarayan Temple, State Bank of India, Diwadkar Railway quaters, UCO Bank Dagade Ali, Daga Building, AmbavaneGujarwada, Musale Building, Karode, Kapila, Maruti Temple, Dhapaya Temple, etc. Railway Station Area,<br>North :- From June Railway Gate, ChhatrapatiMaharaj's statue to DattaMandir, along the road leading to MarutiMandir to Khatikali Market, from there onwards from Kapaleshwar Temple to Dr.Babasaheb Ambedkar Chowk.<br>East :- Dr.BabasahebAmbedkarChowk to Ulhas River via JunaChatri Kendra Road<br>South :- South Zaverchand Pratapchand's along the river bank from near Shani Temple to Gundage S.N. 23 river bank<br>West :- From railway station and railway line near S.N. 23 to old railway gate | 2 |
| 7.<br>Population<br>Total- 2950<br>SC.- 143<br>ST- 95 | | Location :- Vitthal Nagar Part, Abhinav GyanMandir School, Civil Court, Kanyashala, etc Buildings Houses, Old otermalChawl, Old Disha Kendra Dwarka Apartment, Govermentquaters<br>Police Lines, Police Station, Government Hospital, Amira Co. Op, VidyaVikasMandir School, SirMukadam, Telephone Exchange, etc. Buildings and houses, MHADA layout and open spaces, Vishal Apartments, Phadke Hospital, Dr.Gaikwad Hospital, ShitoleChawl, etc. houses and buildings. Slum near AmraiChothya Bridge, Shivsruthi, Thakkar Property, Bhusari Building, Bahar, Sushila, PremSindhu, Dr Davre, Karjat shashanBhumi etc. houses and buildings, Bhagwan Talkies, Ugale Building, Laxmikant Library, AhartaApa, etc. houses and buildings<br>North :- Shetaki farm Nalla<br>East :- KaduChaul Road to High School Road and from there ShishuMandir, from the west, NalaDarpan, behind Sumit, MHADA Layout, old Devghare house to Vishal Apartment Road along the banks of Ulhas River to Bridge<br>South :- From Brtidge to Alankar Talkies Road, take Siddique Manzil Road, then cross Alankar Talkies Road, take the road in front of SiddiqueManzil, take Karjat Kashele Road to Old Chhatri Kendra<br>West :- From Chhatri Kendra to Dr.AmbedkarChowk, from Bhausaheb Raut Chowk, from Salokhe's house to Satyam Apartment, Vitthal Nagar Internal Road | 2 |
| 8.<br>Population<br>Total- 3072<br>SC.- 404<br>ST- 45 | | Location :- Buildings and houses in Konkan Ali area, brambanaliarea,Shri Ganesh, Lakshmi Narayan etc.. Buildings and houses in Dahivali Patil Ali, Sonar Ali area, etc. and Shivaji Nagar area, etc. Buildings and houses in Bouddha Nagar, Gurav Ali, Sonar ali area, etc. Buildings and houses in Vitthal Mandir, Maruti Mandir, Mahalakshmi Mandir, KalavatiAai Mandir, Indira Nagar area, Brahmin Ali area, etc.<br>North :- Continue along Vengaon Road along the drain until the municipal council boundary.<br>East :- Municipal Area<br>South :- Survey No. 29's heart-felt development plan by road<br>West:- Survey No. 29 VikasYojana Road, from Mr.Kharade's house, Indiranagar Road, walkuGharat's shop, Kondivade Road, VitthalMandirChowk, from there, from Architect Medi's house to Jaiganesh Apartment, Road | 2 |
| 9.<br>Population<br>Total- 2957<br>SC.- 206<br>ST- 58 | | Location :- Gothni, Indira Nagar area, Ganapati Temple, SurveProperty.SiddiqueManzil, Happy Home, BhagatChawl, Purva Apartment, Omkar, Ash Plaza, KhuleNatayGrih, English Medium School etc. Buildings and houses, Amrai slum in front of English Medium. .VithaiDarshan, MalharDattatreya, Ayodhya, Gaikar etc. Buildings and houses,, Indira Nagar part,Akurle village part ZillaParishad Primary School, Bamcha mala etc.<br>North:- Old Alankar Talkies Road and further on the foot bridge towards Dahivali Old Gram Panchayat Office Vengaon<br>East :- Vengaon road, near Kadam's house, the street coming to Vitthal Mandir Chowk, then from Shankar Mandir, then Kondivade road, then along the road in Indira Nagar, then along the western side of Kharade's house, then along D. P. road, then along the boundary of survey number 38, from the boundary of survey number 29 to the boundary of survey number 12 up to the municipal council limits.<br>South :- Municipal Area<br>West :- Western road near Ulhas River and SiddiqManzil | 2 |
| 10.<br>Population<br>Total- 4127<br>SC.- 1192<br>ST- 223 | | Location :- Forest Office, Raigad Apa., Patki Pradhan Dagde Wada, Najbudin Chawl, etc. Houses and buildings.. Church, Kavaji Sheth Chawl, Raj Laxmi, Fatima Nagar Slum.. Mal Dhak, Panchashil Nagar, Deshmukh, Laldhari Property, Old S.T. Stand, Railway, quarters, Dagde Hotel Gundge Village. Rane Chawl, Sant Rohidas Nagar, Sikandar Chawl, Good Shepherd School, etc. Buildings and houses..Samaj Mandir, Zilla Parishad Primary School, Van Niwas, Dubari, Railway quaters, Somjai Mandir... Gundge Village Area, Vishwanagar, Water Tank, Thakur Wadi.<br>North :- Karjat S.N. 18 A on the hill above N. P. Area S T Depot south side compound up to Bhisegaon Gundge road.. Hill foot Bhisegaon Marathi school behind to the main road.. Bhisegaon Z.P. School behind the hill from Bhisegaon Railway Station road to Bombay Colony internal road, further along the eastern border of the church further up to the railway line<br>East :- From the railway line near the railway line and old ST stand, Gundge Survey No. 23 along the Ulhas river bank up to the municipal council boundary.<br>South :- Municipal Area<br>West :- Municipal Area | 3 |

NOTE :- 1) In case of any discrepancy in description of ward in the Marathi and English Notification, the description as per boundaries shown in the map shall be treated as valid.
2) A map of the Municipal Council, Nagar Panchayat showing the limits of the wards is available during office hours for inspection in the office of the Municipal Council, Nagar Panchayat

place : Karjat
Date : 26/09/2025

**(Tanaji Chavan)**
**Chief Officer,**
**Karjat Municipal council ,Dist. Raigad**

## निवडक



### शारदा मंदिर शाळेच्या सहा खेळाडूंची नॅशनल स्पर्धेत निवड

**कर्जत :** दादर परेल येथे झालेल्या ओपन महाराष्ट्र स्टेट तायवाँडो चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये शारदा मंदिरच्या सहा खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या सर्व खेळाडूंनी सुवर्ण रौप्यपदक आणि कांस्यपदकांची कमाई करत खंडाळा येथे होणाऱ्या तायवाँडो चॅम्पियनशिप स्पर्धेत निवड झाली आहे. शारदा मंदिरच्या खेळाडूंनी यश प्राप्त करून स्वतःचे व शाळेचे नाव उज्वल केले असून या यशस्वी खेळाडूंच्या यशामुळेच जिल्ह्याला संपूर्ण महाराष्ट्रात प्रथम क्रमांकचे मानकरी ठरवले गेले. या यशस्वी खेळाडूंचे महाराष्ट्र तायवाँडो असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल सावंत, साटम, सावंत, सौरभ सावंत यांनी कौतुक करून राष्ट्रीय स्पर्धेत निवड झाल्याचे जाहीर केले आहे. या यशस्वी खेळाडूंच्या यशामागे सौरभ गुरव यांचे मोलाचे प्रशिक्षण लाभले आहे. विनंती खडके सुवर्णपदक, रोनक अंबावणे रौप्यपदक, प्रज्वल ठाकरे रौप्यपदक, हर्ष दाभाडे कांस्यपदक, माही चौहान कांस्यपदक, कबीर गायकवाड कांस्यपदक मिळवले. मुख्याध्यापिका अंजली किसवे, छाया नगरकर व शिक्षक वृंदांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### भारतीय महिलांची न्यूझीलंडवर मात

**बंगळूर :** आगामी महिला एक दिवसीय विश्वचषकाच्या शेवटच्या सराव सामन्यात कर्णधार हरमनप्रीतच्या (६९) नेतृत्वाखाली भारतीय संघाने न्यूझीलंडवर डकवर्थ-लुईस नियमानुसार चार गडी राखून विजय मिळवला. पहिल्या सराव सामन्यात इंग्लंडविरुद्ध झालेल्या मोठ्या पराभवातून सावरत भारताने येथे किवी संघाला सर्वच आघाड्यांवर धूळ चारली. या लढतीत न्यूझीलंडने ८ बाद २३२ धावा केल्या. त्यानंतर भारतासमोर डकवर्थ लुईस सिस्टीमनुसार, २३७ धावांचे सुधारित लक्ष्य होते. भारताने हे लक्ष्य १० चेंडू आणि ४ गडी राखून सहज पार केले. हरमनप्रीतने आपल्या खेळीत ८ चौकारांसह ८६ चेंडूंमध्ये ६९ धावांची शानदार खेळी केली. तिने हरलीन देओलसोबत तिसऱ्या विकेटसाठी १३२ धावांची भागीदारी केली. हरलीनने १० चौकारांच्या मदतीने ७९ चेंडूंमध्ये ७४ धावांची महत्त्वाची खेळी साकारली आणि नंतर ती रिटायर्ड आऊट झाली. तत्पूर्वी, भारताच्या सलामीवीर प्रतिका रावळ (१५) आणि उमा क्षेत्री (३८) यांनी ५४ धावांची भागीदारी साकारली होती.






### भारताने पटकावले 'सॅफ' विजेतेपद

**कोलंबो :** शेवटच्या क्षणापर्यंत रोमांचक ठरलेल्या अंतिम लढतीत भारतीय युवा संघाने पेनल्टी शूटआऊटमध्ये बांगलादेशचा ४-१ असा पराभव करत सातवे 'सॅफ' १९ वर्षांखालील चॅम्पियनशिप विजेतेपदावर आपली मोहोर उमटवली. सामन्याच्या मध्यंतरापर्यंत भारताने दल्लामुओन गांगटे आणि अझलान शाह केएच यांच्या गोलच्या बळावर २-१ अशी आघाडी घेतली होती. मात्र, बांगला देशने भरपाई वेळेत इहसान हबीब रिदुआनने केलेल्या गोलमुळे सामना २-२ असा बरोबरीत आणला, त्यामुळे सामन्याचा निकाल पेनल्टी शूटआऊटमध्ये लागला. पेनल्टी शूटआऊटमध्ये भारताच्या खेळाडूंनी प्रगल्भ खेळाची प्रचिती आणून दिली. दल्लामुओन गांगटे, कोरोऊ मेईतेई कोंथौजम, इंद्र राणांनी कोणतीही चूक न करता आपले किक्स यशस्वी केले. शुभम पुनियाने निर्णायक चौथा किक गोलजाळीत मारून भारताला विजय मिळवून दिला.



### तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा एस. पी. जैनच्या मुला-मुलींची बाजी

**नागोठणे :** रोहा तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा २६ व २७ सप्टेंबर रोजी सानेगाव आश्रम शाळा येथे उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेतील १९ वर्षीय वयोगटात कोकण एज्युकेशन सोसायटीच्या नागोठण्यातील बापूसाहेब देशपांडे विद्या संकुलातील श्रीमती गुलाबबाई रामनिवास अग्रवाल विद्यामंदिर व कै. एस. पी. जैन ज्युनिअर कॉलेजच्या मुलांच्या व मुलींच्या दोन्ही संघाने अंतिम विजेतेपद पटकावले. मुलांच्या संघाने द. ग. तटकरे कनिष्ठ महाविद्यालय, कोलाड या संघाचा तर मुलींच्या संघाने सानेगाव आश्रम शाळेच्या संघाचा अंतिम सामन्यात पराभव करून हे यश मिळविले. या दोन्ही संघांची जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेसाठी निवड झाली आहे. जिल्हास्तरावर निवड झालेल्या दोन्ही संघातील सहभागी सर्व विद्यार्थ्यांचे संकुलातील शाळा समितीचे अध्यक्ष नरेंद्र जैन, प्र. प्राचार्य डी. एम. पवार, संतोष गोळे, नेत-ाजी गायकवाड, रमेश जेडगे, शिंदे, अनिल तिरमळे, अबेसिंग गावित, पवन पाटील, मिसाळ, इरनक, गोळे, सुतार तसेच सर्व सेवक वृंदांचे सहकार्य लाभले. सर्व यशस्वी खेळाडूंचे संकुलाच्या वतीने कौतुक करण्यात आले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

# भारताने पाकिस्तानला लोळवले

## ॥ सलग नवव्यांदा आशिया कपचा ठरला मानकरी



**| दुबई | वृत्तसंस्था |**

**शेवटच्या क्षणापर्यंत श्वास रोखून धरायला लावलेल्या भारत पाकिस्तान या हाय होल्टेज सामन्यात पुन्हा एकदा भारताने पाकिस्तानला धुळ चारली आहे. भारताच्या तिलक वर्माने ६९ धावांची खेळी करत भारताला विजयी तिलक लावला आहे. त्याला शिवम दुबे ३३ धावा व संजू सॅमसने २४ धावांची मोलाची साथ दिली. १४७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेल्या भारतीय संघाने पाकिस्तानला दुबईच्या मैदानात लोळवण्याचे काम केले. शेवटच्या क्षणापर्यंत ही मॅच दोलायमान स्थितीत राहिली.**

शेवटच्या दोन ओव्हर राहिल्यावर पाकिस्तानने रडीचा डाव खेळला. षटक टाकायला वेळ घेत भारतीय फलंदाजांची लय तोडण्याचा प्रयत्न केला. पण तिलक वर्मा व शिवम दुबे त्यांना पुरुन उरले. व शेवटी आशिया चषकावर आपले नाव कोरले. ४१ वर्षांनंतर भारत - पाकिस्तान या मालिकेत फायनमध्ये आमने - सामने आले होते.

आशिया कप स्पर्धेत कर्णधार सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघाने सलग नवव्यांदा आशिया कप स्पर्धेच्या विजेतेपदाची मानकरी ठरला.

रोमांचक लढतीत प्रारंभी पाकिस्तानला १ बाद ११३ वरून सर्वबाद १४६ धावांवर रोखले तर प्रत्युत्तरात १९.४ षटकांत ५ बाद १५० धावांसह सनसनाटी विजय संपादन केला. विजयासाठी शेवटच्या ३ षटकांत ३० धावांची आवश्यकता असताना भारताने १८ व्या षटकात १३ धावा वसूल केल्या तर १९ व्या षटकात आणखी ७ धावांची भर घातली. निर्णायक शेवटच्या षटकात १० धावांची आवश्यकता असताना तिलक वर्माने पहिल्या ३ चेंडूंत ९ धावा वसूल करत विजयाचे दरवाजे उघडले तर रिंकूने दमदार चौकार फटकावत पाकिस्तानच्या आशा-अपेक्षांना शेवटचा सुरुंग लावला.

तत्पूर्वी, कुलदीप यादवने अवघ्या ३० चेंडूंत ४ फलंदाज गारद केल्यानंतर त्याला अक्षर पटेल व वरुण चक्रवर्ती यांची साथ लाभली. भारताने पाकिस्तानला १९.१ षटकांतच सर्वबाद १४६ धावांवर गुंडाळले. फरहान व झमान यांनी प्रारंभी सावध फलंदाजी केली. मात्र, एकदा सेट झाल्यानंतर त्यांनी चौफेर फटकेबाजी करत ९.४ षटकांत ८४ धावांची जोरदार सलामी मिळवून दिली. अखेर फरहानला वरुणने झेलबाद केले आणि त्यानंतर पाकिस्तानचा पुढील एकही फलंदाज अगदी दुहेरी धावसंख्याही गाठू शकला नाही. मोहम्मद हॅरिस (०), सलमान आगा (८), हुसेन तलत (१), नवाझ (६) एकेरी धावसंख्येवर बाद झाले तर शाहिन शाह आफ्रिदी, फहीम अश्रफ यांना भोपळाही फोडता आला नाही. हॅरिस रौफ बुमराहच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला आणि इथेच पाकिस्तानचा डाव १९.१ षटकांत सर्वबाद १४६ धावांवर संपुष्टात आला.

विजयासाठी १४७ धावांची गरज असताना भारताची एकवेळ ३ बाद २० अशी दाणादाण उडाली असताना याचवेळी संजू सॅमसन व तिलक वर्मा ही जोडी मैदानावर जमली आणि या उभयतांनी चौथ्या गड्यासाठी ५७ धावांची महत्त्वपूर्ण भागीदारी साकारली.

सॅमसननंतर १३ व्या षटकात बाद झाला, त्यावेळी भारताची ४ बाद ७७ अशी स्थिती होती. यानंतर तिलकने सर्व सूत्रे हाताशी घेत ५३ चेंडूंत ६९ धावांची आतषबाजी केली आणि पाकस्थानचे विजयाचे इरादे अक्षरश: धुळीस मिळवले. दुबेची २२ चेंडूंतील ३३ धावांची तडाखेबंद खेळीदेखील तितकीच लक्षवेधी ठरली. विजयासाठी १४७ धावांचे आव्हान असताना भारताने पहिली ४ षटके पूर्ण होण्यापूर्वीच अभिषेक शर्मा, सूर्यकुमार यादव व शुभमन गिल असे ३ बिनीचे मोहरे गमावले आणि यामुळे भारताची प्रारंभीच ३ बाद २० अशी दैना उडाली होती. पण, नंतर तिलक, सॅमसन व दुबेने पलटवार केल्यानंतर भारताला आशिया चषकातील नवव्या जेतेपदावर शिक्कामोर्तब करता आले.

### तिलक ठरला सामनावीर

तिलक वर्मा ठरला अंतिम सामन्याचा सामनावीर दरम्यान भारताच्या काही खेळाडूंनी मात्र स्पर्धेतील पारितोषिक स्वीकारली. यावेळी तिलक वर्माला अंतिम सामन्याचा सामनावीर म्हणून घोषित करण्यात आले. तर कुलदीप यादवला स्पर्धेतील मोस्ट व्हॅल्युएबल खेळाडूचा पुरस्कार देण्यात आला. यानंतर अभिषेक शर्मा हा स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरला. त्याला ट्रॉफी, बक्षिसाची रक्कम आणि कार भेट म्हणून देण्यात आली.

### असा रंगला षटकाचा थरार

शेवटच्या षटकात विजयासाठी १० धावांची आवश्यकता असताना तिलक वर्माने पहिल्या चेंडूवर २ धावा घेतल्या आणि त्यानंतर पुढील चेंडूवरच डीप स्क्वेअर लेगच्या दिशेने उत्तुंग षटकार खेचत विजय अक्षरश: आवाक्यात आणून ठेवला. यानंतर उर्वरित ४ चेंडूंत २ धावा असे समीकरण असताना त्याने एकेरी धाव घेत संघाला बरोबरीत आणले. पुढे रिंकू सिंगला फायनलपूर्वी एकही संधी न मिळालेल्या रिंकूने सणसणीत चौकार फटकावत विजय मिळवून दिला.

# बंगाल वॉरियर्सचा विजय

**| जयपूर | वृत्तसंस्था |**

देवांक दलालच्या प्रभावी खेळाच्या जोरावर बंगाल वॉरियर्स संघाने प्रो-कबड्डी लीग सामन्यात पाटणा पायरेटस् संघाचा ४८-४२ असा पराभव केला. देवांकने धारदार चढाया आणि वेळेवर मिळवलेले बोनस गुणाच्या बळावर २२ गुणांची कमाई केली. यासह त्याने सलग आठवेळा सुपर १० पूर्ण करण्याचा विक्रमही नोंदवला. वॉरियर्सने देवांकच्या चढाईने सामन्याची चमकदार सुरुवात केली. मात्र, पाटणा पायरेटस्कडून मनिंदरने लगेचच प्रत्युत्तर दिले. दोन्ही संघांमध्ये गुणांची देवाणघेवाण सुरू असतानाच मनिंदरच्या एका अव्वल आक्रमणामुळे सामन्याचे चित्र बदलले आणि पाटणाने ७-६ अशी आघाडी घेतली. त्यानंतर पाटणाच्या बचाव फळीने आपला दम दाखवला आणि अयानच्या नेतृत्वाखाली त्यांनी पहिला ऑल आऊट करत १३-७ अशी मोठी आघाडी घेतली. मध्यंतराच्या वेळेपर्यंत पायरेटस्ने ही आघाडी १६-११ पर्यंत वाढवली होती. पाटणा संघ वर्चस्व गाजवत असतानाच, देवांकने सामना फिरवला. त्याच्या अप्रतिम ङ्गसुपर रेडफ्ने १६-१४ अशी गुणांची तफावत तर कमी केली. शिवाय, त्याने आपला सुपर १० चा टप्पाही गाठला. हिमांशुने आणखी एक चढाई गुण मिळवला आणि वॉरियर्सने याचा फायदा घेत पाटणावर ऑल आऊट मिळवत १९-१९ अशी बरोबरी साधली. मध्यंतरावेळी वॉरियर्सने २५-२६ अशी माफक आघाडी घेतली. दुसर्‍या सत्रात वॉरियर्सने आपली लय कायम ठेवत आघाडी वाढवली; परंतु अयानने पायरेटस्कडून जोरदार मुसंडी मारली. एका पकडीने गुणसंख्या २७-२७ अशी समान झाली आणि उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेल्या अयानने आपला ङ्गसुपर १०फ पूर्ण करत पाटणाचे आव्हान कायम ठेवले आहे.



# अनुष्काची सुवर्णपदकावर मोहर

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**



अनुष्का ठोकूर हिने शूटिंग रेंजवर अचूक निशाणा साधत ज्युनियर विश्वकरंडक नेमबाजी या प्रतिष्ठेच्या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक पटकावले. पुरुष विभागात ड्रियन कर्माकर याने रौप्यपदकाची कमाई केली. अनुष्का हिने महिलांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशन या प्रकारात सुवर्ण लक्ष्यभेद साकारला. ड्रियन याने पुरुषांच्या ५० मीटर रायफल थ्री पोझिशनमध्ये रौप्यपदक विजेती कामगिरी केली. भारतीय नेमबाजांनी आयएसएसएफ ज्युनियर विश्वकरंडक नेमबाजांनी उल्लेखनीय कामगिरी केली. अनुष्का ठोकूर व ड्रियन कर्माकर या दोन खेळाडूंनी मिळवलेल्या पदकांमुळे भारताची एकूण पदकसंख्या १३ झाली आहे.

यामध्ये चार सुवर्ण, सहा रौप्य आणि तीन ब्राँझपदकांचा समावेश आहे. १८ वर्षीय अनुष्काने कझाकस्तान येथे झालेल्या आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्ण जिंकले होते. आता तिने आपल्याच देशात सुरू असलेल्या या स्पर्धेत शानदार कामगिरी केली. या आठवड्यातील तिचे हे दुसरे सुवर्णपदक होते. याआधी तिने ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात पदक जिंकले होते. अनुष्काने पात्रता फेरीमध्ये ५८५ गुण संपादन केले. तसेच अंतिम फेरीत तिने ४६१.० गुणांची कमाई केली आहे.

मारिया क्रुग्लोवा हिने ४४४.० गुणांसह ब्राँझपदकाची माळ आपल्या गळ्यात घातली. १२ पैकी पाच खेळाडू भारताचे पुरुष गटातील थ्री पोझिशन प्रकारात १२ खेळाडूंचा सहभाग होता. त्यामध्येही पाच भारतीय नेमबाजांचा समावेश होता. यामध्ये भारताच्या ड्रियन कर्माकर याने ४५४.८ गुणांसह रौप्यपदकाची कमाई केली. त्याने पात्रता फेरीमध्ये ५८७ गुण कमावले होते. दिमित्री पिमेनोव याने ४५९.९ गुणांसह सुवर्णपदक पटकाविले, तसेच कॅमिल नुरियाख्मेतोव याने ४४१ गुणांसह ब्राँझपदक पटकाविले. सूरज शर्मा आघाडीवर २५ मीटर रॅपिड फायर पिस्तूल प्रकारात फक्त आठ स्पर्धक होते. यामध्ये पाच भारतीय नेमबाजांचा समावेश होता. या प्रकारात भारताच्या सूरज शर्मा आणि लेक्झांडर कोवालेव या दोघांनी २८७ गुणांसह संयुक्त आघाडी घेतली. समीर गुलिया, अभिनव चौधरी, मुकेश नेलावली आणि जतीन हे अनुक्रमे तिसऱ्या ते सहाव्या स्थानावर आहेत.

# नटराजची ऐतिहासिक कामगिरी

**| अहमदाबाद | प्रतिनिधी |**

श्रीहरी नटराज याने आशियाई ॲक्टिक्स या जलतरण अजिंक्यपद स्पर्धेमध्ये ऐतिहासिक पदके पटकावताना भारताचा झेंडा दिमाखात फडकवला. त्याने पुरुषांच्या २०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण शर्यतीत रौप्यपदकाची कमाई केली. यानंतर या पठ्ठ्याने ५० मीटर बॅकस्ट्रोक प्रकारातही रौप्यपदक पटकावले. भारताला तब्बल १६ वर्षांनंतर आशियाई अजिंक्यपद स्पर्धेमध्ये पदक पटकावता आले. श्रीहरी नटराज याने २०० मीटर फ्रीस्टाइल जलतरण शर्यत एक मिनिट ४८:४७ सेकंदात पूर्ण केली व रौप्यपदक जिंकले. चीनच्या १७ वर्षीय शू हायबो याने १:४६.८३ सेकंद अशा वेळेसह शर्यत पूर्ण केली आणि सुवर्णपदकाला गवसणी घातली. जपानच्या हिनाता अँडो याने ब्राँझपदकाची माळ गळ्यात घातली. श्रीहरी नटराज याने ५० मीटर बॅकस्ट्रोक ही शर्यत २५:४६ सेकंदात पूर्ण करीत रौप्यपदकावर हक्क सांगितला.




■ **भारताला १६ वर्षांनंतर आशियाई अजिंक्यपद**

चीनच्या गुकेलाईन वँग याने २५.११ सेकंदात शर्यत पूर्ण करीत सुवर्णपदकावर नाव कोरले. दरम्यान, नटराजने टोकियो व पॅरिस या दोन ऑलिंपिकमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. त्याने याआधी जर्मनीत झालेल्या युनिव्हर्सिटी गेम्समध्ये १०० मीटर फ्रीस्टाइलमध्ये भारतासाठी राष्ट्रीय विक्रमही केला होता. साजन, देसिंगूकडून आशाभारताच्या आणखी काही खेळाडूंकडून पदकांची आशा बाळगता येणार आहे. पुरुष विभागात साजन प्रकाश याच्याकडून दमदार कामगिरीची आशा आहे. तसेच महिला विभागात धिनिधी देसिंगू आणि भावना सचदेवा यांना पदक पटकावता येऊ शकणार आहे.

## ॲटलेटिकोचा दणदणीत विजय

**| बार्सिलोना | वृत्तसंस्था |**

लिगा डर्बी सामन्यात अल्वारेझने दोन गोल करत ॲटलेटिको संघाला रियल माद्रिदवर ५-२ असा दणदणीत विजय मिळवून दिला. या लढतीत माद्रिदने २-१ अशी आघाडी घेतली असताना एम्बाप्पेनेही एक गोल केला. दुसऱ्या सत्राच्या सुरुवातीला अल्वारेझने पेनल्टीचे गोलमध्ये रूपांतर करून यजमान संघाला ३-२ अशी आघाडी मिळवून दिली. त्यानंतर त्याने एका अप्रतिम वळणदार फ्री-किकवर दुसरा गोल नोंदवला. त्यामुळे त्याचा गोल रद्द करण्यात आला होता आणि माद्रिदने चॅम्पियन्स लीगच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

**या आधी पंधरा, सतरा व एकोणीस वर्षाखालील संघात समावेश**

# रोशनीची महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड

**| रायगड | क्रीडा प्रतिनिधी |**

रायगड जिल्ह्यातील महाड गावाची रोशनी पारधी हिची महाराष्ट्राच्या वरिष्ठ गटातील महिलांच्या क्रिकेट संघात निवड करण्यात आली आहे. रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन व महाडच्या एसबीसी क्रिकेट अकॅडमीची अष्टपैलू क्रिकेट खेळाडू असणारी रोशनी रायगडच्या क्रिकेट इतिहासातील पहिली महिला क्रिकेट खेळाडू आहे, तिची निवड महाराष्ट्राच्या वरिष्ठ महिलांच्या क्रिकेट संघात करण्यात आली आहे. अवघ्या सोळा वर्षाच्या रोशनीची निवड ह्याआधी महाराष्ट्राच्या पंधरा, सतरा व एकोणीस वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट संघात झाली होती. गतवर्षी झालेल्या आंतरजिल्हा पंधरा वर्षाखालील मुलींच्या क्रिकेट स्पर्धेत रोशनी हिने लागोपाठ तीन शतके झळकावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. रोशनी ही जलदगती गोलंदाज व सलामीवीर फलंदाज म्हणून तिने सातत्याने उत्तम खेळाचे प्रदर्शन जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या संघासाठी केले आहे. तसेच महाराष्ट्राच्या कनिष्ठ वयोगटाच्या संघात खेळतांना रोशनीने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.आपल्या अष्टपैलू क्रिकेट खेळाच्या जोरावर रोशनी हिने आजवर आंतरजिल्हा क्रिकेट स्पर्धेत अनेक शतके ठोकली तसेच अनेक फलंदाज बाद केले आहेत.




> **रायगड जिल्ह्यात मुलांच्या बरोबरीने मुलींमध्ये सुद्धा चांगल्या दर्जाची गुणवत्ता आहे त्यांना योग्य संधी, प्रशिक्षण व त्यांना त्यांची गुणवत्ता दाखवण्यासाठी मोठे व्यासपीठ रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मार्फत आपण उपलब्ध करून देणार आहोत.**
> **- अनिरुद्ध पाटील**
> **अध्यक्ष रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशन**

रोशनीची निवड झाल्याबद्दल रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव प्रदिप नाईक यांनी रोशनी तिचे पालक व प्रशिक्षक आवेश चिचकर यांचे अभिनंदन केले आहे. तसेच आरडीसीएचे सर्व पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

कृषीवल गणेश दर्शन स्पर्धा २०२५



सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन

: प्रायोजक :
आरडीसीसी बँक
ISO 9001 - 2015 BANK

दिनांक : २९-०८-२०२५
प्रथम क्रमांक - अनिकेत पाटील-म्हात्रोळी,सारळ
द्वितीय क्रमांक - त्रिंबक वि. कुंटे-कुंठ्याचीगोठी
तृतीय क्रमांक - महादेव रामचंद्र दसवते-माणगांव

दिनांक : ३०-०८-२०२५
प्रथम क्रमांक - पांडुरंग घरत - लोणेरे-थळ
द्वितीय क्रमांक -संतोष र. खडतर - माणगांव
तृतीय क्रमांक - नागवेकर परिवार-अलिबाग

दिनांक : ३१-०८-२०२५
प्रथम क्रमांक - संतोष तुरे- मेढेखार अलिबाग
द्वितीय क्रमांक - रोशन शिवराम म्हसकर- पनवेल
तृतीय क्रमांक - सचिन अरुण माळी- तुडाल

दिनांक : १-०९-२०२५
प्रथम क्रमांक - ईश्वरी योगेश वावेकर- मेढेखार
द्वितीय क्रमांक -परेश प्रमोद घरत - कुरुळ
तृतीय क्रमांक - कल्पेश माळी- मुरुड

दिनांक : २-०९-२०२५
प्रथम क्रमांक - योगेश प्रकाश वार्डे- रांजणपाडा
द्वितीय क्रमांक - मोहन पाटील- सागाव अलिबाग
तृतीय क्रमांक - ह.बा. ठाकूर- चिरनेर, उरण

दिनांक : ३-०९-२०२५
प्रथम क्रमांक - रमेश बा. धुमाळ, नांगरवाडी
द्वितीय क्रमांक - तुषार गजानन कवळे - आवास
तृतीय क्रमांक - अनिल वर्तक- वरसोली

दिनांक- ४-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गणेश तांदळेकर- माणगांव
द्वितीय क्रमांक - काशिनाथ पाटील - नागाव
तृतीय क्रमांक - किशोर नाईक -बोरगाव पेण

दिनांक - ५-०९-२०२५
प्रथम क्रमांक - संकेत साईनाथ घरत - थळपालथी
द्वितीय क्रमांक - निखिल नायसाठे- मुरुड
तृतीय क्रमांक - राजेंद्र पाटील - दिवीपारंगी

दिनांक - ६-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गजानन पुळेकर- मुरुड
द्वितीय क्रमांक - वसंत धर्मा घरत- वरसोली
तृतीय क्रमांक - शिवाज्ञा शिवलकर- अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.
पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)